सप्टेंबर २०२६
वीरनिर्वाणसंवत् २५५२
वर्ष ७७वे, पुष्प २रे
श्रावण-भाद्रपद
शके १९४८

ISSN- 2395-5503
RNI No. MAH/MAR/2006/21290/27-9-07


UGC-CARE Listed Research Journal (Since-Jun2019)

बाहुबली विद्यापीठ व ब्रह्मचर्याश्रमाचे मुखपत्र

# सन्मति

मूल्य - १८ रु.










## अंगकोर वट मंदिर कंबोडिया



# श्री बाहुबली क्षेत्रावरील विविध विकास कामांचे उद्‌घाटन.... क्षणचित्रे..





**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रा स्थळ ब वर्ग अंतर्गत विविध विकास कामांच्या योजनेकरिता रुपये दीड कोटी इतकी महाराष्ट्र शासनाकडून निधी** मंजूर करण्यात आली. बाहुबली विद्यापीठाचे माजी अध्यक्ष मा. श्री. कल्लाप्पाण्णा आवाडे दादा यांच्या आशीर्वादाने व बाहुबली विद्यापीठाचे अध्यक्ष मा. श्री. प्रकाशरावजी आवाडे अण्णा यांच्या मार्गदर्शनानुसार इचलकरंजी विधानसभेचे विद्यमान आमदार डॉ. राहुल आवाडे साहेब यांच्या प्रयत्नातून हा निधी मंजूर झाला. याच्या मार्फत श्री अतिशय क्षेत्र बाहुबली येथे विविध रस्ते बांधकाम, गटार बांधकाम आणि विद्युत् रोषणाईची कामे होणार आहेत. याचा शुभारंभ करीत असताना उपस्थित मान्यवर... मा. श्री. कल्लाप्पाण्णा आवाडे दादा, मा. श्री. प्रकाशरावजी आवाडे अण्णा, डॉ. आमदार राहुल आवाडे साहेब व इतर सर्व कोल्हापूर जिल्हा परिषद, हातकणंगले पंचायत समिती व कुंभोज ग्रामपंचायतचे पदाधिकारी आणि संस्थेचे पदाधिकारी –(शनिवार, दि. ०१ ऑगस्ट २०२६)



कुंभोज येथे आचार्य १०८ श्री चंद्रप्रभसागरजी महाराज यांच्या निर्देशानुसार रविवार दि. १६ ऑगस्ट २०२६ रोजी परमपूज्य गुरुदेव श्री समंतभद्र महाराज आणि वीराचार्य बाबासाहेब कुचनुरे यांच्या पुण्यतिथी निमित्त भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये बाहुबली संस्थेकडून महामस्तकाभिषेकाचा चित्ररथ समाविष्ट होता. त्याचे हे क्षणचित्र...


## कारंजा येथे संपन्न द्विदिवसीय चर्चासत्र आणि शोधार्थी भवन व श्रुतभवन ग्रंथालयाचे उद्‌घाटन..

(विशेष वार्ता पृष्ठ क्र. ४४वर)






सत्प्रेरणा–शुभाशीर्वाद




प.पू. गुरुदेव १०८ श्री समंतभद्र महाराज

उन्नतं मानसं यस्य, भाग्यं तस्य समुन्नतम्।

# सन्मति

पो. बाहुबली, जि. कोल्हापूर
पिन–४१६ ११०

संस्थापक–संपादक



स्व. ब्र. माणिकचंद भीसीकर
एम्. ए., न्यायतीर्थ

**सप्टेंबर २०२६**

❍ वर्ष: ७७वे
❍ पुष्प २रे

❍ **कार्यकारी संपादक** ❍
❍ **डॉ. नेमिनाथ शास्त्री** ❍
एम.ए., बी.एड्., पीएच्.डी.

❍ **संपादक मंडळ** ❍
❍ **श्री. गोमटेश बेडगे,** एम.ए., बी.एड्.
❍ **सुश्री प्रज्ञाताई डोणगांवकर,** कारंजा, बी.एस्सी.
❍ **डॉ. लीना चवरे,** कारंजा, एम.ए., बी.एड्., पीएच्.डी.
❍ **श्री. प्रदीप धोतरे,** शास्त्री, एम.ए., बी.एड्.

**बँक खात्याचे विवरण –** ❑ **वार्षिक वर्गणी :**२५०/– ❑ **द्वादशवर्षीय वर्गणी :**२५००/–
Bank Name-ICICI Bank, Branch- Bahubali IFSC- ICIC0006388
Shri Bahubali Brahmacharyashram- A/C No- 638801700002 (सन्मतिसाठी वर्गणी, दानराशी Shri Bahubali Brahmacharyashram या खात्यावर पाठवा.) (80G **करपात्र सवलतीकरिता**)


(अंकातील विचाराशी सन्मति-मासिक परिवार सहमत असेलच असे नाही.)

## ⊙ अनुक्रमणिका ⊙


* संपादकीय.. दशलक्षणरूप धर्म म्हणजे मानवता धर्म – डॉ. नेमिनाथ शास्त्री ०४
* प्रवचनसार : जीवनस्वातंत्र्याची कला (लेखांक १४४) – आर्यिकारत्न शुद्धोऽहंश्री माताजी ०६
* योगसार चिंतन (पुष्प १७) – प्रियदर्शन जैन १०
* सोलहकारण भावना भाय....! (लेखांक १७) –हर्षा वेखंडे, नागपूर १३
* पट्टमहादेवी– शब्दांपलिकडील अन्वयार्थ (लेखांक ३२) –विपुल खेडकर, नागपूर १८
* पट्टमहादेवी शांतला– शब्दांपलिकडला अन्वयार्थ असा साकार झाला! २४
* माझ्या आईचा शांतलेसोबतचा प्रवास १) किमया देवलसी, अकोला २) आशय नरेश खेडकर, बंगळुरू २७
* अहिच्छत्र पार्श्वनाथ...?(उतरार्ध) – डॉ. स्वयंप्रभा पाटील, सांगली २९
* पुस्तक समीक्षण– द्रोहपर्व (लेखक :अजेय झणकर) – डॉ. समृध्दी अनंत रायबागकर, अमरावती ३४
* अंगकोर मंदिर : एक आश्चर्य – सौ. विजया संगई, अंजनगाव सूर्जी ३६
* स्व. श्री. पानाचंद खोलापुरे गुरुजी ३८
* **THE MANY NAMES OF *MOHA* :......** *-Sayyam Jain* ४०
* विशेष वार्ता ४४

## संपादकीय....

# दशलक्षणरूप धर्म म्हणजे मानवता धर्म

**डॉ. नेमिनाथ शास्त्री, बाहुबली**

श्रमण संस्कृतीमध्ये अनादी काळापासून दशलक्षण महापर्व साजरा केला जातो. हा दशलक्षणात्मक धर्म मानवीय सुप्त गुणांना वाव देणारा आहे. आत्मिक गुणांची साधना करणे, सद्गुण जोपासणे, व्यक्तीनिष्ठतेपेक्षा गुणांना पूज्यता देणे, श्रेष्ठ मानणे हा श्रमण संस्कृतीचा महत्त्वाचा पाया आहे. या सद्गुणांच्या उपासनेवरच जैन परंपरा, पद्धती टिकून आहे. येथे कोणत्याही व्यक्तीला मोठेपण दिले जात नाही तर त्यांच्याजवळील असणाऱ्या मानवीय गुणांची श्रेष्ठता अभिव्यक्त झालेली असते. त्यामुळेच त्यांना श्रेष्ठता दिली जाते. त्यांनाच पूजले जाते. नित्य त्यांचेच स्मरण-चिंतन केले जाते. तसेच त्यांच्या त्या पूर्ण प्रकट मानवीय सद्गुणांचे चिंतन-मनन-ध्यान करून ते सद्गुण आपल्या अंतरंगी प्रकट होवोत, अशी निरंतर सद्भावना बाळगली जात असते.

**मानवता धर्म व त्याची श्रेष्ठता**

ज्याप्रमाणे एक सूर्य संपूर्ण विश्वाला प्रकाशित करतो त्याप्रमाणे एक मानवता हाच धर्म सर्व जगाला व्यापून राहतो. ज्याप्रमाणे सर्व नद्या ह्या समुद्रालाच मिळतात त्याप्रमाणे सर्वधर्म एका मानवतेला जाऊन मिळतात. ज्याप्रमाणे सर्व रंग एकत्रित येऊन सौंदर्य निर्माण करतात त्याप्रमाणे जगातील सर्व धर्म-जाती एका मानवतेचीच प्रशंसा करतात. मानवता हाच धर्म सर्वश्रेष्ठ धर्म आहे; म्हणून सर्व प्राणिमात्रांमध्ये मानवाची श्रेष्ठता ही त्याच्या मानवतेमुळे आहे. यालाच खरा धर्म असेही म्हणतात. म्हणून नीतिकार म्हणतात,

**आहारनिद्राभयमैथुनं च सामान्यमेतत् पशुभिः नराणां।**
**धर्मो हि तेषां विशेषोऽधिको धर्मेण हीनाः पशुभिः समानाः।**

आहार, निद्रा, भय, मैथुन या चारही संज्ञा (इच्छा) पशू व माणसं यांच्यात समानच असतात. या दोहोंमध्ये वेगळेपण ठरते ते केवळ धर्म या सद्गुणामुळेच, म्हणून ज्या माणसाकडे धर्म नाही तो पशूच समजावा.

अशा या धर्मामुळे मानवतेचा विकास व्हावा ही अपेक्षा असते. धर्म हा शब्द अत्यंत व्यापक व सर्व समावेशक आहे, पण धर्मांधतेमुळे पूर्वग्रहदूषित हटवादी बनतो आणि विवाद निर्माण होतात. धर्मांधता ही एक कुत्सित व संकुचित मनोवृत्ती आहे. या मनोविकारामुळे परस्पर द्वेष, ईर्षा, तिरस्कार, घृणा या भावना वाढीस लागतात. या उलट धर्मामुळे शांती, सद्भावना, परस्पर मैत्री, अहिंसा व जीवदया यासोबत परस्पर सहानुभूती व सहकार्याची भावना जोपासली जाते.

मानवता हा गुणधर्म जन्मतः मिळणारा सद्गुण नाही. त्याची निरंतर उपासना करावी लागते. त्यासाठी परम पुरुषार्थ करावा लागतो. तो कोणत्याही मंदिरात, बाजारात, पहाडावर मिळत नाही. विकत देता-घेता येत नाही. त्यासाठी स्वतःहून विविध उपाय करावे लागतात. जैन संस्कृती व तत्त्वज्ञानातील दशलक्षण धर्म हा ह्या मानवतेच्या प्रकटीकरणासाठी अत्यंत जवळचा राजमार्ग आहे.

**दशलक्षण धर्मातून मानवतेची उपासना**


मानवता धर्म म्हणजे केवळ एक सद्गुण नाही, तो अनेक गुणांचा समूह आहे. अनेक सद्गुणांच्या जोपासनेतून मानवता प्रकट होत असते. मानवता या हस्तिपाद सद्गुणांमध्ये प्रामुख्याने पुढील अनेक सदगुणांचा समावेश होतो. मानवाजवळ प्रसंगानुरूप सहनशीलता, मृदुता, कोमलता असावी. सरल परिणामांनी जीवन जगताना कठीणता वाटते,

पण त्यातच खरे समाधान आहे. कपट व मायाचार या दुर्गुणामुळे मानवी मन अशांत बनते. लोभ, हवरटपणामुळे अनेक सद्‌गुण पळून जातात. या मनोविकृतीमुळे परस्पर मैत्री व प्रेमभावना नासते. क्रोध, अहंकार, चिडचिडापणा यामुळे मानसिक, शारीरिक व्याधीने माणूस पोखरला जातो. सत्य, प्रामाणिकपणा हा मानवी जीवनाचा महत्त्वाचा दागिना आहे. सर्व प्रकारची मर्यादा सर्वांना आनंदित करते. त्यागाच्या भावनेतूनच समर्पणवृत्ती जन्मते. दानधर्म म्हणजे परस्पर सहानुभूती, जीवदया व मैत्रीपर्व होय. भौतिक संसाधनेच्या मर्यादेमुळे केवळ मानवाचे कल्याण नव्हे तर संपूर्ण जीवसृष्टीचे कल्याण होते. पर्यावरणाचे संरक्षण, संवर्धन घडते. वृक्षवल्ली व सभोवतालच्या पर्यावरणाचे समतोल साधले जाते. वायुप्रदूषण, ध्वनीप्रदूषण, जल-मृतिका प्रदूषण या सर्वांचे मूळ कारण मानवाच्या अफाट व अमर्यादित इच्छाच आहेत. यांना मुरड घालण्याऐवजी मर्यादित करणे व त्यात सुख-समाधान शोधणे ही काळाची गरज आहे. म्हणून या सर्व कारणासाठी दशलक्षणात्मक धर्माची साधना पूर्वीपेक्षा अधिक महत्त्वपूर्ण ठरत आहे.

दशलक्षण धर्माच्या साधनेतून पुढील गोष्टी साध्य कराव्यात. क्षमेने क्रोधावर विजय मिळवावे. सहनशीलता वाढवावी. मार्दवाने अहंकार गळून पडावा आणि एकमेकांशी मैत्री भाव जोपासावे. आर्जवाने मायाचार, कपटवृत्ती संपवावी आणि ऋजुता, सरलतेने आनंद मिळवावे. लोभ, हावरटपणा याला शौच धर्माने दूर सारावे. सत्यधर्माने सत्यनिष्ठ व प्रामाणिकपणा बाळगावा. कारण जगात नेहमी सत्याचीच प्रशंसा केली जाते. संयमामुळे इंद्रिय व मनावर नियंत्रण ठेवावे. स्वच्छंदी व स्वैराचाराने व्यक्तीच्या स्व-पराचा घात होतो. तसेच सर्व जीवावरील परम उपकारी संयमातून विश्वमैत्री निर्माण होते. सोन्यालाही तापवावे लागते तेव्हा त्यातील शुद्धता प्रकट होते त्याप्रमाणे अनाठायी इच्छेला रोखलेच पाहिजे. फाजील व भाश्कळ इच्छेला प्रत्यक्ष तपश्चरणाचे बांध घालावे. शक्तीनुसार पैसा-संपत्ती-वेळ यांचा सदुपयोग केल्याने परस्पर सहकार्याची भावना जपली जाते. हा त्याग कधीच वाया जात नसतो. भविष्यातील सुखाचा डोलारा आजच्या त्यागातून जन्मतो. परिग्रहाची लालसा कमी करण्यासाठी आकिंचन्य धर्म आवश्यक आहे. कामविकारावर विजय मिळवून शील- सदाचारासाठी ब्रह्मचर्य धर्म अनिवार्य आहे. अशाप्रकारे दशलक्षण धर्माच्या माध्यमातून मानवातील सर्वश्रेष्ठ गुणांची उपासना-आराधना करून मानवी जीवन आनंदी बनविले पाहिजे. मानव जीवनाची सार्थकता यातच आहे की मानवीय गुण प्रकट करणे यात काही अंशाने तर का होईना पण निश्चित यश मिळेलच.

मानवता दिव्यत्व प्राप्तीचे प्रमुख साधन आहे. या दिव्यत्वाची प्रचिती दशलक्षण धर्माच्या माध्यमातून होत असते. केवळ वर्षातून एक वेळ नव्हे तर प्रति दिवस याची साधना-आराधना करावी लागते. ती आपण करावी आणि याच जन्मात दिव्यानंद, परमानंद प्राप्त करावा, हीच मनोमन कामना!

*****



## आगामी अंकाविषयी निवेदन

पुढील अंक ऑक्टोंबर-नोव्हेंबर २०२६ हा संयुक्त अंक **दीपावली विशेषांक** म्हणून प्रकाशित करीत आहोत. या विशेषांकाची विषयवस्तू परमपूज्य गुरुदेव श्री समंतभद्र महाराज यांचे **भद्रशिष्य ब्र. माणिकचंदजी चवरे (तात्या गुरुजी) आणि ब्र. माणिकचंदजी भीसीकर गुरुजी या दोन माणिकद्वयावर आधारित** कारंजा येथील द्विदिवशीय सेमिनारमधील विषयानुसार प्रकाशित होत आहे. तरी **कृतज्ञता ज्ञापन समारोह** या चर्चासत्रातील विषयांवर या विशाल हृदयी कार्यकर्त्यांच्या जीवनकार्याचा आढावा घेतला जाणार आहे.

# प्रवचनसार : जीवनस्वातंत्र्याची कला

( लेख क्र. १४४)

**आर्यिकारत्न शुद्धोऽहंश्री माताजी**

संसार-देह-भोगापासून विरक्त साधक योग्य गुरूंचा शोध घेऊन त्यांच्या चरणी समर्पित होतो. गुरु त्याला व्रतसहित क्रियांचा उपदेश देतात तो ऐकून आपल्या स्वरूपामध्ये उपस्थित होत श्रमण होतो. सर्व सावद्य योगाचा त्याग करून सामायिक संयमावर आरुढ होतो. सतत सामायिक संयमावर आरुढ होऊन श्रमण कधी छेदोपस्थापनेला ही योग्य होतो. छेदोपस्थापना चारित्र्य काय आहे, त्याचे स्वरूप काय आहे? ते या पुढील गाथेमध्ये स्पष्ट करीत आहेत.-

**वदसमिदिंदियरोधो, लोचावास्सयमचेलमण्हाणं।**
**खिदिसयणमदंतवणं ठिदिभोयणमेगभत्तं च।२०८।**
**ऐदे खलु मूलगुणा समणाणं जिणवरेहिं पण्णत्ता।**
**तेसु प्रमत्तो समणो छेदोवट्ठावगो होदि ।२०९।**

**अन्वयार्थ - (वदसमिदिंदियरोधो)** व्रत, समिती, इंद्रियनिरोध **(लोचावास्सयं)** केशलोच आवश्यक **(अचेलं)** अचेल (वस्त्ररहित) **(अण्हाणं)** अस्नान **(खिदिसयणं)** भूमीशयन **(अदंतवणं)** अदंतधोवन (दात न घासणे) **(ठिदिभोयणं)** उभे राहून भोजन **(च)** आणि **(एयभत्तं)** एक वेळ आहार **(एदे)** हे **(खलु)** खरोखर **(समणाणं)** श्रमणांचे **(मुलगुणा)** मूलगुण **(जिणवरेहिं)** जिनेन्द्र भगवंतांनी **(पण्णत्ता)** सांगितले आहेत. **(तेसु)** त्यामध्ये **(पमत्तो)** प्रमत्त **(समणो)** श्रमण **(छेदोवट्ठावगो)** छेदोपस्थापक **(होदि)** होतो.

**तात्पर्य-** मूलगुणांमध्ये प्रमाद झाल्यावर मुनी छेदोपस्थापनेला धारण करतो.

**श्रमणांचा मूलगुण निर्विकल्प सामायिक -**

मुमुक्षु श्रमण एक आपल्या स्वरूपामध्ये राहण्याची इच्छा करतो. ज्यावेळी तो संपूर्ण परिग्रहाचा त्याग करून निर्ग्रंथ दिगंबर दीक्षा धारण करतो त्यावेळी एक निर्विकल्प सामायिक संयमाची प्रतिज्ञा करतो. 'मला संपूर्ण सावद्य योगाचा त्याग असू दे' असा एकच नियम घेतो. आपल्या स्वरूपामध्ये राहण्याची प्रतिज्ञा घेतो. परंतु छोट्या अंतर मुहूर्तापेक्षा जास्त काळ स्वरूपामध्ये राहणे शक्य होत नाही कारण संज्वलन कषायरूपी डाकू घेरा घालून बसलेले आहेत. ते स्वस्थ राहू देत नाहीत. ज्याप्रमाणे घराभोवती डाकूंनी घेरा घातला असेल तर आपण आपल्या घरामध्ये स्वस्थ झोपू शकत नाही त्याप्रमाणे कषायरूपी डाकू आपले तोंड वर काढत असतील तर साधू आपल्या शुद्धात्म घरामध्ये स्वस्थ राहू शकत नाही. ते सतत पीडा देण्यात त्यांच्या वश होऊन निर्विकल्प संयमापासून च्युत होतो. स्वरूपापासून च्युत होऊन असंयमांमध्ये प्रवृत्त होऊ नये म्हणून मुनिराज भेद रूपाने संयमाला धारण करतो, अभेदरूपाने संयम पाळणे सामायिक संयम आहे व भेदरूपाने संयम पालन करणे छेदोपस्थापना संयम आहे. वास्तविक श्रमणांचा एकच मूलगुण आहे तो म्हणजे निर्विकल्प सामायिक संयम. त्या निर्विकल्प सामायिक संयमाचे भेदरूपाने २८ मूलगुण सांगितले आहेत. निर्विकल्प सामायिक संयमामध्ये अखंड एक ज्ञायकस्वभावी सहज परमात्मतत्त्वांची उपासना होते. छेदोपस्थापन संयमामध्ये अहिंसा महाव्रत, सत्य महाव्रत आदि अनेक रूपांनी संयमाचे पालन होते.

**छेदोपस्थापना संयम -**

ज्याप्रमाणे सुवर्णेच्छुक पुरुष कुंडल, अंगठी, चेन इत्यादी सोन्याच्या दागिन्यांना ग्रहण करणे हितकारक मानतो. जर त्यांनी हट्ट केला की मला रिंगा, अंगठी, चेन काहीही नको मला सुवर्ण पाहिजे. तर त्याला कधीही सुवर्णाची प्राप्ती होऊ शकणार नाही. कारण त्या भेदरूप दागिन्यामध्येच सोने आहे. त्या दागिन्यांना ग्रहण केले की सुवर्णाची प्राप्ती नियमाने होते. जेथे छेदोपस्थापना चारित्र आहे तेथे सामायिक चारित्र नियमाने असते व जेथे सामायिक चारित्र्य आहे तेथे नियमाने छेदोपस्थापना आहे. छेद म्हणजे भेद, उपस्थापना म्हणजे स्थित होणे. अशा प्रकारे संयमांमध्ये भेदरूपाने स्थापित होणे छेदोपस्थापना आहे. त्याप्रमाणे ज्याला सामायिक संयमाची इच्छा आहे तो महाव्रतादि छेदोपस्थापनारूप २८ मूलगुणांचे पालन करतो. २८ मुलगुण – ५ महाव्रत, ५ समिती, ५ इंद्रियनिरोध, ६ आवश्यक, ७ इतर गुण.

**✻ ५ महाव्रत –**

जी महान व्रते आहेत त्यास महाव्रत म्हणतात. तीर्थंकर आदि महापुरुषांच्याकडून याचे आचरण केले जाते, म्हणून यास महाव्रत म्हणतात. अथवा स्वतः मोक्षाला प्राप्त करविणारी आहेत म्हणून यास महाव्रत म्हणतात. संपूर्ण सावद्य योगाचा त्याग हे एकच महाव्रत आहे. त्या महाव्रताच्या अभिव्यक्ती पाच आहेत.

**✻ अहिंसा महाव्रत–**

प्रथम अहिंसा महाव्रत हा सर्व व्रतांचा राजा आहे. अन्य महाव्रते या अहिंसा महाव्रतालाच पुष्ट करतात. किंबहुना अहिंसा महाव्रताचाच विस्तार सत्यादी महाव्रते आहेत. हिंसेपासून पूर्णतः निवृत्ती अहिंसा महाव्रत आहे. '**प्रमत्तयोगात् प्राणव्यपरोपणं हिंसा।**' बुद्धिपूर्वक कषायसहित आत्म्याच्या परिणामास प्रमत्त म्हणतात. प्रमत्ताचा योग अर्थात कषायसहित परिणामांनी मन–वचन–कायेच्या क्रिया करणे प्रमत्तयोग आहे. प्रमत्तयोगाने दहा प्राणांचा वियोग करणे हिंसा आहे. त्या हिंसेचा त्याग करणे व सर्व जीवांवर दयाभाव करणे अहिंसा महाव्रत आहे. मन, वचन, काय व कृत–कारित–अनुमोदनेने पृथ्वीकायिक, जलकायिक, अग्निकायिक, वायुकायिक, वनस्पतिकायिक आणि त्रसकायक या षट्कायिक जीवांच्या हिंसेचा त्याग करणे अहिंसा महाव्रत होय. द्विन्द्रिय, त्रीन्द्रिय, चतुरिन्द्रिय व पंचेन्द्रिय जीवांना त्रसकायिक म्हणतात. काय, इंद्रिय, कुल, आयू आणि योनी इत्यादींमध्ये सर्व जिवांना जाणून कायोत्सर्गादी हिंसा आदींचा त्याग करणे अहिंसा महाव्रत आहे. उभे राहणे, बसणे, झोपणे, गमन करणे, आहार, हात–पाय इत्यादींचे संकोचन, प्रसारण इत्यादी क्रिया विशेषांमध्ये जीवांच्या प्राणांचा वियोग करणे अहिंसा महाव्रत आहे.

गृहस्थ फक्त त्रसकायिक जीवांच्या हिंसेचा त्याग करतो. त्याला स्थावर कायेच्या हिंसेचा त्याग होऊ शकत नाही; कारण माती खोदणे, पाण्याचा उपयोग करणे, अग्नी पेटविणे, हवा करणे, भाजी आणणे व बनविणे इत्यादी कार्य त्याला करावे लागतात. परंतु विनाकारण स्थावर जीवांशी हिंसा तो करीत नाही. त्रसहिंसेचे पण चार प्रकार आहेत. संकल्पी हिंसा, उद्यमी हिंसा, आरंभी हिंसा आणि विरोधी हिंसा. यापैकी फक्त संकल्प हिंसेचा त्यागी गृहस्थ असतो. अन्य तीन प्रकारच्या त्रसहिंसेचा पण तो त्याग करू शकत नाही. मी या जीवाला मारतो असा संकल्प करून जीवांना मारणे संकल्पी हिंसा आहे. गृहस्थाचे व्रत अत्यंत स्थूल आहे, म्हणून त्यास अहिंसा अणुव्रत म्हटले आहे.

टीकमगढ गावात घडलेली घटना आहे. राजाला कोणीतरी सांगितले की जैन लोकांना कितीही प्रलोभने दिले तरी ते कोणत्याही जीवाची हत्या करीत नाहीत किंवा कितीही भय दाखविले तरी जीवाचा वध करीत नाहीत. एक दिवस राजा बग्गीमध्ये बसून चालला होता. समोरून एक जैन श्रावक येत होता. समोरून काही बकरी जात होत्या. राजाने त्या जैन श्रावकाला सांगितले की एका

बकरीला पकडून आण. तो घेऊन आला त्याला म्हणाला की तलवार घे आणि बकरीला काप. तो म्हणाला, 'महाराज हे होऊ शकत नाही.' राजा म्हणाला, 'तुला हजार रुपये बक्षीस देतो. तो म्हणाला, 'हजार काय लाख रुपये दिले तरी हे होऊ शकत नाही.' राजाने प्राणदंडाचे भय दाखविले तरी तो म्हणाला, 'राजन माझे प्राण गेले तरी चालतील, परंतु एका मुक्या प्राण्याची हिंसा मी करणार नाही.' राजा खूश झाला व जैन धर्माची खूप प्रशंसा त्यांनी केली.

अहिंसा सर्व जीवांचे परम कल्याण करणारी परम औषधी आहे. सर्व जीवांवर समता भाव साधणारे अहिंसा महाव्रत आहे. सर्व जीवांची प्राणदायिनी संजीवनी आहे.

**※ सत्य महाव्रत –**

राग, द्वेष, मोहाद्वारे असत्य बोलण्याचा त्याग करणे आणि दुसऱ्याला ताप देणाऱ्या सत्य वचनाचा सुद्धा त्याग करणे, तसेच सूत्र आणि अर्थाचे कथन करण्यामध्ये अयथार्थ वचनांचा त्याग करणे, सत्य महाव्रत आहे. जर आचार्य सदाचार प्रवृत्तियुक्त पापभिरू असतील आणि कदाचित अर्थाचे वर्णन करताना काही अन्यथा बोलले गेले किंवा त्यांचे वचन विचलित झाले तर त्याला दोषरूप मानू नये.

ज्यामध्ये कोणत्याही जीवाचे अहित न होईल, हितच होईल अशा वचनांना सत्य वचन म्हणतात. जसे आहे तसे सांगणे याची सत्य वचनामध्ये मुख्यता नाही. परंतु ज्या वचनाने दुसऱ्याचे हित होईल असे वचन बोलणे सत्य वचन आहे.

साधूंच्या चर्येमध्ये सत्य चार ठिकाणी आले आहे. १. सत्यधर्म, २. वचनगुप्ती, ३. सत्यमहाव्रत, ४. भाषा समिति या चारीमध्ये सत्य वचनांचा संबंध आहे. या सर्वांमध्ये श्रेष्ठ वचन गुप्ती आहे. वचन गुप्ती म्हणजे पूर्ण मौन, वचन न बोलणे, बोले सो फंसे. वचन बोललेच नाहीत तर सर्व संकट समाप्त, जर वचन गुप्तीमध्ये साधू राहू शकला नाही तर भाषा समितीचा प्रयोग करा. हित, मित, प्रिय वचन बोलणे. समितीमध्ये थोडे वचन बोलायला सांगितले आहे. साधू समितीच्या पुढे गेला तर तो सत्य धर्मामध्ये येतो. येथे परिमित वचन बोलण्याचा प्रश्न नाही. आत्म्याच्या हितामध्ये प्रयोजन भूत वचन बोलणे सत्यधर्म आहे. याहूनही अधिक प्रसार करायचा असेल तर साधू महाव्रतामध्ये येतो. येथे काहीही बोलावे पण सत्य बोलावे. हे साधूचे सत्य महाव्रत आहे.

**※ अचौर्य महाव्रत –**

गाव, नगर, उद्यानादी मध्ये पडलेली, हरवलेली, विसरलेली, ठेवलेली जी छोटी किंवा मोठी वस्तू आहे आणि जे दुसऱ्यांच्या कडून ग्रहण केलेली आहे अशा परद्रव्याचे ग्रहण न करणे अदत्त परित्याग नावाचे अचौर्य महाव्रत आहे. न दिलेल्या वस्तूचे ग्रहण करण्याच्या इच्छेचा पण अभाव ज्याला आपली न करण्याचा जो अभिप्राय आहे तो अचौर्य महाव्रत आहे. न दिलेली वस्तू घेण्याचा तर गृहस्थाला पण त्याग आहे. मुनी संयम, ज्ञान व शुद्धीचे उपकरण सोडून अन्य कोणत्याही वस्तूला ग्रहण करण्याचे भाव देखील करीत नाहीत. श्रावकाच्या घरी सुद्धा विधीपूर्वक निर्दोष आहार मिळाला तरच ग्रहण करतात. भैक्ष्यशुद्धी हा सुद्धा अचौर्यव्रताचा एक प्रकार आहे. आहारात दोष असताना किंवा आहारामध्ये केस किंवा जीव आला आणि साधूंना दिसला पण श्रावकाला दिसला नाही. साधूंनी अंतराय न करता तसाच आहार घेतला तर तेथे चोरीचा दोष लागतो. शून्य घरात वास करणे, सोडून गेलेल्या घरामध्ये वास करणे, आपण जेथे राहतो तेथे दुसऱ्या साधूंना येण्यास न रोखणे या अचौर्यव्रताच्या भावना सांगितलेल्या आहेत. साधर्मींशी विसंवाद न करणे.

**※ ब्रह्मचर्य महाव्रत –**

वृद्ध, बाला व तरुण स्त्रियांना माता, पुत्री आणि बहिणी समान समजून स्त्रीकथा आदीपासून

निवृत्ति म्हणजे ब्रह्मचर्य व्रत आहे. मनुष्य, देव, तिर्यंचासंबंधी स्त्रियांचे रूप पाहून त्यापासून विरक्त होणे, चित्रांमध्ये स्त्रियांचा फोटो असेल किंवा दगडामध्ये कोरलेली स्त्रीची मूर्ती असेल त्यांना पाहून विकार उत्पन्न न होणे तसेच स्त्रियांशी कोमल वचन, त्यांचा मृदूस्पर्श, त्यांचे रूपाचे अवलोकन, नृत्य गीत, हास्य, कटाक्ष आदी मध्ये अनुराग न करणे ब्रह्मचर्य व्रत आहे.

स्त्रीपर्याय तीन गतीमध्ये प्राप्त होते म्हणून स्त्रियांचे तीन भेद केले आहेत. त्यांचे पुनः बाल, वृद्ध, युवती असे तीन भेद होतात. देवीमध्ये स्वभावतः तीन भेद नाहीत. पण विक्रीयेच्या अपेक्षेने हे भेद संभवतात. अशाप्रकारे तीन प्रकारच्या स्त्रियांचे बाल, वृद्ध, यौवन अपेक्षेने ९ भेद होतात. ९ प्रकारच्या भेदांना मन-वचन-काय व कृत-कारीत-अनुमोदनेने गुणले तर ८१ भेद होतात. ८१ भेदांना चेतन व अचेतन या दोन भेदांनी गुणले तर १६२ भेद होतात. या सर्वांचा सर्व प्रकारे त्याग करणे ब्रह्मचर्य महाव्रत आहे.

मन-वचन-काय, कृत-कारीत-अनुमोदनेने सर्व प्रकारच्या विकारांचा त्याग ब्रह्मचर्य महाव्रत आहे. ब्रह्मचर्य व्रत त्रिलोक पूज्य आहे. ब्रह्मचर्याचा महिमा अगाध आहे. ब्रह्मचर्याच्या प्रभावाने स्वर्गातील देवांचे आसन सुद्धा कंपायमान होते. ब्रह्मचारीचे रक्षण करण्यासाठी देव सुद्धा येतात.

**✻ अपरिग्रह महाव्रत –**

जीवाशी संबंधित, जीवाशी असंबंधित आणि जीवापासून उत्पन्न असे तीन प्रकारचे परिग्रह आहेत. मिथ्यात्व, क्रोध, मान, माया, लोभ, हास्य, रति, अरति, शोक, भय, जुगुप्सा, ३ वेद हे जीवाश्रित परिग्रह आहेत. जीवापासून भिन्न शेत, घर, धन, धान्य इत्यादी जीवाशी आश्रित परिग्रह आहेत. मोती, शंख, शिंप, चर्म, कंबल इत्यादी जीवापासून उत्पन्न परिग्रह आहेत. यांना ग्रहण करणे रूप मूर्च्छा परिणामाचे परिग्रह आहे. सर्व प्रकारच्या परिग्रहांचा शक्तीपूर्वक त्याग करणे, याची ग्रहण करण्याची इच्छा सुद्धा न करणे अपरिग्रह महाव्रत आहे. संयम, ज्ञान, शौचाच्या उपकरणांमध्ये सुद्धा ममत्व न करणे अपरिग्रह व्रत आहे.

✻✻✻✻✻ **(क्रमशः)**


**भारतीय सहली,**
**परदेशी सहली,**
**तीर्थयात्रा,**
**हनिमून टूर्स,**
**विमान व रेल्वे तिकीट,**
**पासपोर्ट, विसा**

# गोमटेश टूर्स अँड ट्रॅव्हल्स

**गोमटेश कॉम्प्लेक्स, मेन रोड, कुपवाड**

**✻ नवीन वर्षातील आयोजित टूर्स**
**✻ संपूर्ण देश-विदेशातील सहली आयोजित करणारी विश्वासू कंपनी**
**✻ भन्नाट धमाल, अविस्मरणीय क्षण-अनुभव गोमटेश टूर्सच्या माध्यमातून पूर्णपणे सुरक्षित.. परवडणारा दर आणि आपुलकीची सेवा ..!!**

***✻ सम्मेद शिखरजी, गुजरात, राजस्थान, नेपाळ, काश्मीर, आसाम, थ्री सिस्टर्स, अंदमान, केरळ, मध्यप्रदेश, त्रिस्थळी या सर्व यात्रेचे बुकिंग सुरू आहे.***

टीप : रेल्वे व विमानसाठी ट्रीपच्या तारखेच्या तीन महिने अगोदर बुकिंग करणे आवश्यक आहे.

**संपर्क क्रमांक – १) श्री. श्रेणिक चौगुले ९०९६६०३५१० २) श्री. रोहित चौगुले ९८३४६९१३६६**
**३) श्री. पारिसा मुळे ८२०८८ ७२८२७ ४) ऑफिस क्रमांक ७८ २० ९९२२०९**

# योगसार चिंतन

(पुष्प १६)

– **प्रियदर्शन जैन**

**वउतउसंजमुसील, निय इय सव्वइ ववहारु।**
**मोक्खह कारण एक्क, मुणि तो तइलोयहु सारु ।३३।**

**अप्पा अप्पइ जो मुणइ, जो परभाव चएइ।**
**सो पावइ सिवपुरिगमणु, जिनवर एउ भणेइ।।३४।।**

**अर्थ–** व्रत, तप, संयम, शील हे सर्व व्यवहार चारित्र आहेत. निश्चयाने मोक्षाला कारण आपला आत्माच आहे, जो तिन्ही लोकात एकमेव सारभूत आहे. ।।३३।।

**अर्थ–** जो परभावांना त्यागून आपल्या आत्म्याचा अनुभव करतो, तोच मोक्षमहली जातो; हे जिनेंद्र वचन आहे.।।३४।।

**भावार्थ–** तिन्ही लोकांतील एकमेव सार वस्तू म्हणजे एकमात्र आपले आत्मतत्त्व होय. जसे कार्य असते, तसेच कारण असते; हा नियम आहे. त्या अनुसार आत्मतत्त्वास प्राप्त करणे हे कारण आणि त्याचेकरिता त्याचे यथार्थ ज्ञान, श्रध्दान आणि त्यातच रमणता हे कार्य झाले. यालाच निश्चयाने (परमार्थाने) स्वआश्रय असे म्हणतात.

जीवास पूर्ण वीतरागी दशा आपल्या आत्मतत्त्वाच्या आश्रयानेच प्रगट होते आणि जो याचा आश्रय घेतो त्यास व्यवहार चारित्र यथार्थ रुपात प्रगट होतेच, ते जोरजबरीने प्रगट करावे लागत नाही. यथार्थ निश्चयासोबत असणारा व्यवहारच कार्यकारी असतो, हे आचार्यदेवांनी याआधीही सांगितले आहे. जसे जीवाशिवाय त्याचे शरीर निरर्थक असते, त्याचप्रमाणे चैतन्यमूर्ती आत्म्याच्या सम्यग्दर्शन आणि सम्यग्ज्ञानाशिवाय चारित्र सुद्धा अपूज्य असते. तत्त्वार्थसूत्र या ग्रंथाधिराजाचे पहिलेच सूत्र **सम्यग्दर्शनज्ञानचारित्राणि मोक्षमार्गः।** हे सांगितले आहे. यात दर्शन आणि ज्ञानानंतर चारित्र आहे, याचाच अर्थ दर्शन–ज्ञान सम्यक् असले की चारित्र सुद्धा सम्यक् असते. या स्थितीत होणाऱ्या मोक्षमार्गी जीवाच्या क्रिया या शुभ–व्यवहार या पदवीस प्राप्त होतात.

आज त्यागादि करून सुद्धा आम्हास तात्त्विक शान्तीचा लाभ का होत नाही? असा प्रश्न काही जणांच्या मनात येतो.. याचे उत्तर आचार्यदेव या गाथेत देऊ इच्छितात.– 'तीच व्यक्ती मोक्षमार्गाचा अधिकारी असते.. ज्याच्या चारित्राचा पाया सम्यक् श्रद्धा आणि ज्ञानावर आधारित असतो. या जीवाने निमित्त कारणांना प्रधान करून आपल्या उपादान असलेल्या आत्मतत्त्वास गौण केले आहे.... म्हणूनच खऱ्या धर्माचा लाभ फक्त व्यवहार चारित्राचे द्वारा होणे संभव नाही.... मोक्षलाभ होण्याकरिता निश्चय चारित्र हेच प्रमुख कारण आहे आणि निश्चय चारित्र म्हणजेच आपल्या निज आत्मतत्त्वाची सम्यक् आणि अतूट श्रद्धा..... ती ज्या जीवाजवळ असते, त्यास व्यवहार चारित्र ओझे वाटत नाही.. त्याचे पालन आपसूक होते....त्यास कोणतेही कष्ट होत नाहीत....कारण त्या जीवाची रुची आपल्या स्वभावात असते.'

आचार्य देव येथे सांगू इच्छितात की, 'हे भव्य जीवा! सम्यग्दर्शनाशिवाय मोक्षाचा मार्ग कसा प्रशस्त होणार? तुला अतींद्रिय आनंद कसा प्राप्त होणार? तुला धर्म कुठे बाहेर मिळणार नाही. ज्ञान–दर्शन स्वभावरूप तुझा आत्माच तुझा धर्म आहे....

कदापि कोणत्याही परिस्थितीत त्याचे विस्मरण करू नकोस! जर तोच नसेल तर मग फक्त व्यवहार धर्म कसा कार्यकारी ठरणार?'

अनंत सिद्धांच्या दर्शनाकरिता हा जीव शिखरजीला जातो.. अनेकवेळा गिरिराजाची वंदना करतो.. उपवास, पूजा-अनुष्ठानादि करतो. परंतु आत्मदृष्टीचा अभाव असल्याने त्यास अमूर्तिक असलेले सिद्ध प्रभू कसे दिसणार? शक्यच नाही!! याचे कारण काय तर त्याला आपल्या सिद्ध स्वरूपाचा निर्णयच नसतो.... जर निर्णय असता तर त्याला भेदविज्ञानरूपी चक्षूंच्या द्वारे सिद्ध भगवंतासोबतच आपल्या स्वभावसिद्धस्वरूपी आत्म्याचेही दर्शन नक्कीच झाले असते!!

आचार्यदेव मोठ्या करुणेने या जीवास सांगत आहेत- 'श्रद्धारूपी कल्याणपथ तुझ्याचपाशी आहे.. सोबत प्रकाश देणारा सम्यक् ज्ञानरूपी दीपकही तुझ्याचपाशी आहे आणि अशा सुंदर आत्मकल्याणकारी पथावर चारित्राने अलंकृत होऊन चालायचंही तुलाच आहे..... मग वेळ का दवडतोस? अरे वेड्या! चालायला सुरुवात तर कर....कुठेही राहिलास तरी निमित्तांची योग्यता, म्हणजेच विचार करणारे मन, निरोगता, उत्तम क्षेत्र, जैनदर्शनाविषयीची आस्था आदि सर्व कारणे निमित्त रूपाने तुझ्यापाशी उपलब्ध आहेत. यांचेद्वारेच तुझे परिणाम निर्मळ होतील. धर्मसाधनेचे प्रमुख कारण आणि साधन म्हणजेच तुझे आत्मतत्त्व! ते देखील तुझ्याच अंतरंगात विद्यमान आहे. तुझी दिशा योग्य असल्याने तुला मोक्षरूपी गंतव्य नक्कीच मिळणार यात शंका नाही....

**भावार्थ ३४-** जिनेन्द्र भगवन्त आपणास सांगत आहेत.- 'समस्त परभावांना भिन्न जाण.. सर्व विकल्पांनी रहित आपल्या निज परम शुद्ध आत्मतत्त्वाचा अनुभव कर... आत्म-अनुभव हाच धर्माचा मार्ग आहे, ज्याचेद्वारे तुझा मोक्षमहली प्रवेश निश्चित आहे. अन्य कोणताच मार्ग नाही. परभाव म्हणजे पुण्य-पाप दोन्ही! तेच आपल्याला भवसमुद्रात फिरवितात.. हे जाणून आत्मभावाद्वारे आपल्या आत्म्यास जाण.. शिवपुरी जाण्याचे तेच एकमात्र कारण आहे.

आज सर्वमान्य असलेल्या छहढाला या लघु समयसाररूपी ग्रंथाचे रचियता पंडितप्रवर कविवर पं. दौलतरामजी कापडावर ठस्यांद्वारे छपाईचे काम करीत असत. त्यांच्या या कामाच्या दरम्यान त्यांनी अनेक बहुमूल्य अमृतमयी रचना केल्या.... त्यावरून त्यांना प्राप्त असलेल्या सम्यग्दर्शन-ज्ञानरूपी रत्नांची प्रचीती आपल्याला येते. आजही या रचनांनी जनसामान्य तत्त्वांची पारायणे करतात. या ग्रंथात ते सांगतात की,

**लाख बात की बात, यही निश्चय उर लाओ।**
**तोरि सकल जग द्वंद्व, फंद निज आतम ध्याओ।।**

ज्या चैतन्य रत्नाकरात अनंत सुख, आनंद, शांती आदि अनंतानंत गुण भरलेले आहेत अशा आत्मस्वभावाची श्रद्धा कर, त्यालाच आपल्या ज्ञानात धारण करून त्यातच स्थिर हो! यामुळेच मुक्तीची प्राप्ती होते, अन्य कोणताच मार्ग नाही. याकरिता भेदविज्ञानाची कास धरावी लागेल. याला आगमात मोक्षाचे बीज म्हटले आहे.... त्याने समयासमयाला परपदार्थांपासून आपल्या आत्म-तत्त्वाला भिन्न करावे लागेल.. समस्त व्यवहार आचरीत असतानासुद्धा ज्ञानी जीव आपल्या दृष्टीमध्ये भेदविज्ञान आणि वीतरागता यांनाच मुख्य करतात.

संसार-भोग तर या जीवाला अनंत वेळा मिळाले आहेत, पण अजूनपर्यंत मोक्षमार्गाची प्राप्ती झाली नाही.. याचे कारण सांगताना आचार्यदेव सांगतात.- 'सुख-दुःखाचे मूळ कारण जीवाद्वारे उपार्जित पुण्य- पापरूपी कर्मबंधच आहे.. बाकी सर्व निमित्तमात्र आहेत. या पुण्य-पापाच्या फळामध्ये हा जीव जितका गुंतत जातो, तितके राग-द्वेषरूपी परिणाम वाढत जातात; ज्यामुळे पुन्हा कर्मबंध होतो.. काही जीव पुण्यबंधालाच मोक्षमार्ग

समजतात आणि खऱ्या धर्मापासून विमुख होतात.. यामुळे हे संसारचक्र असेच सुरू राहाते.. यातून सुटका मिळविण्याकरिता सर्वप्रथम हवी वस्तु-स्वरूपरूपी सत्यधर्माची खरी ओळख आणि समज! आपल्या ज्ञानस्वभावाच्या आश्रयाने हा जीव जितका-जितका आपल्या स्वभावाच्या सान्निध्यात राहील, तितका-तितका तो कर्मबंधनापासून दूर राहील.... अत: हे भव्य जीवा! तू आपल्या आत्मशक्तीच्या विकासाकडे लक्ष दे..!'

या जीवाला कोणताच जड किंवा चेतन पदार्थ सुखी-दु:खी करू शकत नाही आणि कोणीही याचे भले अथवा वाईटही करू शकत नाही. परपदार्थ इष्ट किंवा अनिष्ट नसतात.... जेव्हा-जेव्हा जीव स्वतःच कषाय करून सुखी-दुःखी होतो, तेव्हा कषायाचे उत्तरदायित्व त्याचेच असते.. तोच त्या कषायांचा कर्ता असतो.. परंतु जे जीव परमार्थाने स्वतःला पराचा किंवा परभावांचा कर्ता मानतात.. त्यांनाच आपला स्वभाव मानतात, त्यांना समजविण्याकरिता आगम सांगते की, हे जीवा! द्रव्यदृष्टीने तू या सर्वांचा कर्ता नाहीस.. जर तू कर्ता बनलास तर तो तुझा स्वभाव बनेल आणि जर पर्यायदृष्टीने स्वतःच्या परिणामांचा कर्ता स्वतःला मानले नाही, तर मग त्याचा कर्ता असण्याचा आरोप अन्य द्रव्यावर येईल.. जे असंभव आहे.. येथे दोन अपेक्षांनी किती सुंदररीत्या तत्त्व कथन केले आहे! ते प्रथम समजावून घेतले पाहिजे.... म्हणूनच सम्यग्दृष्टी जीवाला जर काही कारणामुळे क्रोध आला तर, तो त्याला स्वतःचा मानतो..त्याचा दोष दुसऱ्याला देत नाही..आणि समताभाव धारण करून पुन्हा आपल्या स्वभावात स्थिर होण्याचा पुरुषार्थ करतो.. स्वच्छंदी होत नाही.. असा परमार्थाचा आणि व्यवहाराचा ताळ-मेळ त्याच्या जीवनात दिसून येतो.

हे आपण एका उदाहरणाद्वारे बघू- जर कोणी समोरच्याला अपशब्दांचा वापर करून बोलले.. तर हे परिणमन त्या जीवाचे होय.... आणि समोरचा व्यक्ती जर ते ऐकून क्रोधित किंवा दुःखी झाला तर ते परिणमन त्याचे स्वतःचे होय.. आणि जर तो आपल्या स्वभावाचा आश्रय घेऊन शांत राहिला तर, तेही परिणमन त्याचेच होय.. म्हणूनच प्रत्येक जीव आपल्या आपल्या परिणामांचा कर्ता आहे, हे आगम वचन आहे.

यावरून आपण हे समजले पाहिजे की, अज्ञानी जीव प्रथम शरीरास आपले मानतो.. त्याचे संबंधित अन्य पदार्थांमध्ये इष्ट-अनिष्ट बुद्धी करतो. त्याचे फलस्वरूप राग-द्वेषरूपी परिणमित होऊन सुखी-दुःखी होतो....जितके जास्त कषाय तेव्हढे जास्त दुःख! सम्यग्दृष्टी जीवाची मान्यता याउलट असते.. त्याला तत्त्वाची जाण असते, म्हणून तो विपरीत प्रसंगातही विचलित होत नाही. आणि जर आकुलित झालाच, तर दोष दुसऱ्याला देत नाही.. तो दोष स्वतःचा मानून प्रतिक्रमण करतो नि लगेचच आपल्या स्वभावाचा आश्रय घेऊन त्या दोषांपासून मुक्त होतो.

म्हणूनच आचार्यदेव सांगतात.-'आपल्या आत्म्याला समस्त परद्रव्यांपासून भिन्न जाणून त्याचा अनुभव करा. आत्मभावाद्वारे आत्म्याला जाणा.. म्हणजे ज्ञानाद्वारेच ज्ञानाला जाणा. हेच ज्ञान आनंद-शांती-सुख-वीर्य आदि गुणांचे निवासस्थान आहे.. तेच मुक्तिपुरीला जाण्याचे एकमेव कारण आहे.. दुसरे कोणतेच कारण नाही.. आणि ते ज्ञान म्हणजे दुसरे-तिसरे कोणी नसून परमात्मस्वरूपाने युक्त असे आपलेच आत्मतत्त्व होय.'

***** (क्रमशः)

सुजाण वाचकांना नम्र निवेदन आहे की,
आता **सन्मति मासिक हे ऑनलाईन** वाचण्यास उपलब्ध आहे. एकवेळ खालील वेबसाईटला अवश्य भेट द्या.
**www.sanmatimasik.com**

# ‘सोलहकारण भावना भाय....!’

(लेखांक १५)

**हर्षा वेखंडे, नागपूर,९८२२६९०८६०**

**✽ आवश्यकापरिहाणी भावना (भाग २)**

आजींचं संध्याकाळचं प्रतिक्रमण आटोपलं. त्यांनी डोळे उघडले तर, समोर सक्षम, संवेग आणि घरातली इतर मंडळी शांतपणे त्यांची वाट बघत बसलेले आढळले. डोळे उघडताच सक्षम म्हणाला ‘आजी, आतापर्यंत मला वाटायचं की, अभ्यास सर्वात महत्त्वाचा आणि नंतर आपल्या घरात सर्वांना मदत करणं. पण आता लक्षात आलय की अत्यंत गरजेचं आहे ते आपल्या शुद्ध आत्म्याला समजणं आणि त्यासाठी आहेत षटआवश्यके. देवपूजा, गुरूंची उपासना, स्वाध्याय, संयम, तप आणि दान या साधनांशिवाय मला आत्मा नाही कळणार.....!’

संवेग म्हणाला- ‘अगदी बरोबर बोलतो आहेस तू सक्षम! किती गंमत आहे की, आपण सर्व बाह्य गोष्टी समजण्याचा प्रयत्न करतो पण स्वतः वास्तवात कोण आहोत इकडे आमचे लक्षच जात नाही. आजी, तुम्ही सांगितलं तेव्हा लक्षात आलं आम्हाला करण्यासारखं काय आहे ते....!’

‘हो ना! मुनीराजांचा आत्मानुभूतीचा पुरुषार्थ सतत सुरू असतो. ध्यानात रमणारे ते.. जेव्हा ध्यानातून बाहेर येतात तेव्हा नेमकं काय काय करतात, हे पण आपल्याला समजणं महत्त्वाचं आहे...’ चेतना म्हणाली.

‘हो हो आजी! आम्हाला सांगा ना महाराजांची आवश्यक कार्यं....’ सक्षमने दुजोरा दिला.

आजी म्हणाल्या- ‘चला तर, बघू या ‘अवश्यक’ अर्थात अवश्य करण्यायोग्य क्रिया. आवश्यक क्रिया आहेत. सामायिक, स्तवन, वंदना, प्रतिक्रमण, प्रत्याख्यान आणि कायोत्सर्ग.

**१) सामायिक :-** पहिलं आवश्यक आहे सामायिक. मुलांनो, तुम्हाला माहिती आहे ना ‘समय’ म्हटलं जातं आत्म्याला. देहापासून भिन्न, ज्ञानच ज्याचं शरीर आहे अशा शुद्धात्मस्वरूपाचं एकाग्रतापूर्वक ध्यान करणं म्हणजे सामायिक. दोन घडी म्हणजे ४८ मिनिटे हा सामायिकाचा अवधी. तसेच समता भाव प्रगट व्हावा, यासाठी सामायिकाची विधी सांगितली आहे, सामायिक पाठ म्हटला जातो, हे सारे कशासाठी? तर समता भावात प्रस्थापित होण्यासाठी. सामायिक करणाऱ्या जीवाच्या परिणामांमध्ये जर समता नाही आली तर, ते सामायिक नाही!

छहढाला या ग्रंथात मुनींचं वर्णन करतेवेळी मुनींच्या समताभावाविषयी जे बोल आहेत, ते सामायिकाचे स्वरूप नीट समजावून सांगतात.

**अरि मित्र महल मसान कंचन कांच निंदा थुती करन।**
**अर्घ्यावतारण असिप्रहारन में सदा समता धरन।**

शत्रू-मित्र, महाल- स्मशान, पाषाण असो वा रत्न, जीवन किंवा मरण.... यांच्यामध्ये जे साम्यभावाला धारण करतात ते मुनिराज होत. ना कोणा प्रति आसक्ती न कोणा प्रति द्वेष....!

मुनीअवस्थेत असतानाही जीवाला अनुकूल प्रतिकूल संयोग येतातच. यशोधर मुनीराजांची कथा माहिती आहे ना तुम्हाला? श्रेणिक राजाने उपसर्ग करून मेलेला साप त्यांच्या गळ्यात टाकला; ज्या कारणाने असंख्य मुंग्यांच्या दंशांचा सामना उपसर्गरूपाने मुनींना करावा लागला. नंतर चेलना राणीने येऊन उपसर्ग दूर करून पूजन केलं. दूषण आणि भूषण दोन्ही अवस्थांमध्ये साम्य

भावाला प्राप्त झालेल्या मुनिराजांकडून दोघांनाही सारखाच आशीर्वाद दिला गेला. हा समता भाव सामायिकातून निष्पन्न होतो.

आपण सर्वसाधारण श्रावक! आपल्या आयुष्यातही अनेक घडामोडी घडतात. काही आपल्याला उंच घेऊन जाणाऱ्या घटना तर काही काही संकटांच्या खाईत ढकलणाऱ्या.. दोन्ही परिस्थितीत समतोल राखणं हे महत्त्वाचं. कोणी मित्र म्हणून खूप सख्य नको तर कोणी शत्रू बनून आला तरी द्वेष नको, कारण त्याला उपस्थित माझ्या पूर्वबद्ध कर्मांनी केला आहे. ते कर्म माझ्या पूर्वीच्या चुकीच्या परिणामांनी बांधलं गेलं. त्यांचे फळ देण्यामध्ये अजून किती गुंतायचं आणि कर्मांचा गुंता वाढवायचा.... हा विचार सतत असावा. इथून पाय काढता घेऊन आपल्या ज्ञान स्वभावाशी मैत्री करू या. कारण जो स्वतःशी मैत्री करतो, त्याचा सर्व प्राणिमात्रांशी मैत्री भाव जागतो. त्याचं वागणं बोलणं चालणं सर्वसृष्टीला हितावह ठरतं. सामायिक करणारा जीव आत्मकल्याणासोबत विश्वकल्याण ही साधतो, ही आहे सामायिकाचा महिमा!'

'हो बरोबर आजी! मेरी भावनेत आपण म्हणतो ना..

**मैत्री भाव जगत मे मेरा सब जीवों से नित्य रहें**

**दिन दुखी जीवों पर मेरे उरसे करुणा स्रोत बहे..**'

संवेग म्हणाला.

आजी म्हणाल्या, 'हो, अगदी बरोबर!'

मुलांनो मुनींचं दुसरं आवश्यक आहे स्तवन.

**२) स्तवन :–** जिनेन्द्र देवांची स्तुती करणे म्हणजेच स्तवन. तुम्हाला वाटेल स्तुती केल्याने काय होतं? तर विचार करा.. स्तुती कोण करेल? जो तीर्थंकर भगवंतांच्या, परमेष्ठींच्या गुणांने अतिशय भारावून झुकेल.. भक्तिभावाने स्तुती केल्याने जीवात विनम्रता येते. विनयशील व्यक्ती स्वतःच्या कल्याणासोबत इतरांच्या कल्याणामध्ये निमित्त बनतो. अहंकारी जीव ना स्वतःचं कल्याण करू शकतो, ना इतरांचं!

स्तवन सहा प्रकारांनी केलं जातं बरं का. चोवीस तीर्थंकरांचं अर्थ सहित १००८ नावांद्वारे स्तवन करणे, ते **नामस्तवन** आहे. तर तीर्थंकरांच्या अनेक कृत्रिम–अकृत्रिम प्रतिबिंबांचं स्तवन करणे, ते **स्थापनास्तवन** आहे. समवशरणामध्ये स्थित अरहंत भगवंतांचे देह आभा, प्रातिहार्य आदि सहित स्तवन करणे, म्हणजे **द्रव्यस्तवन** आहे. सम्मेदगिरी, गिरनार, पावापुरी, चंपापुरी आदि निर्वाण क्षेत्र तसेच जिथे जिथे समवशरण गेलं, जिथे उपदेश दिला जातो अशा क्षेत्रांचं स्तवन, ते **क्षेत्रस्तवन** आहे. ज्या काळात गर्भ, जन्म, दीक्षा, ज्ञान, मोक्ष कल्याणक झाले, त्या त्या काळाचं स्तवन, **कालस्तवन** आहे. तीर्थंकरांच्या केवलज्ञानादी चतुष्टय भावांचं स्तवन, ते **भावस्तवन** आहे. अशा प्रकारे **स्तवनाचे सहा भेद** सांगितले आहेत.

सक्षम म्हणाला, 'आजी, म्हणजे आपण स्तवन कधीही करू शकतो. पंच परमेष्ठींपैकी कोणाचंही किंवा सर्वांचं भक्ती पूर्वक स्मरण करणे हे करण्यायोग्य आहे. किती किती प्रकाराने स्तवन होऊ शकतं ते कळलं बरं!'

संवेग पटकन म्हणाला, 'सक्षम! तुला दर्शन पाठ आठवतो ना..

**अपवित्रः पवित्रो वा सर्वावस्थां गतोऽपि वा।**

**यः स्मरेत् परमात्मानां स बाह्याभ्यन्तरे शुचिः।।**

याचा अर्थ पाच परमेष्ठींचं स्तवन करण्यासाठी कुठली मर्यादा नाही.'

आजी म्हणाल्या, 'चला मुलांनो, आता वंदना बघूया. हे तिसरं आवश्यक आहे.

**३) वंदना :–** २४ तीर्थंकरांपैकी कुठल्याही एका तीर्थंकरांची किंवा पाच परमेष्ठींमधील कुठल्यातरी एका परमेष्ठीला मुख्य करून त्यांची स्तुती करणे हे वंदना आवश्यक आहे.

मुलांनो, तुम्ही म्हणाल स्तवन करण्यात तर २४ तीर्थंकराचं स्तवन केलं जातं मग परत एका एका तीर्थंकरांचं किंवा एका एका परमेष्ठींचं वेगवेगळं स्तवन करण्याची काय गरज आहे..?

आहे बरं.. आम्हाला परमेष्ठींचं गुणगान करताना कुठे ना कुठे तर विनयाचा भाव यावा अशी

ही कडेकोट व्यवस्था आहे.

श्री प्रवचनसार या शास्त्राच्या मंगलाचरणात कुंदकुंदाचार्यांनी प्रथम महावीर भगवंतांचं शासन असल्याकारणाने महावीर भगवंतांना नमस्कार केला, त्यानंतर पाच परमेष्ठींना समूह रूपाने नमस्कार केला (हे स्तवन) आणि प्रत्येक समूहातील एकेक अरहंत सिद्ध आदिंना स्वतंत्र स्वतंत्र नमस्कार केला. (ही वंदना) केवढा विनय हा!

विनयशीलतेने ओथंबलेला जीव मोक्षाचा अधिकारी होतो. स्वतः आत्मकल्याण करतो आणि त्यांना बघून त्यांच्याकडून प्रेरणा घेऊन इतर जीवही मोक्षमार्गाकडे वळतात.

वंदना देखील सहा प्रकाराने केली जाते बरं! तीर्थंकर, सिद्ध, आचार्य, उपाध्याय, साधू यांच्यापैकी एकेकाचं नाव घेऊन वंदना करणे, ती **नामवंदना** होय. अरहंत-सिद्ध यांपैकी एका एका प्रतिबिंबाची वंदना करणे, म्हणजे प्रतिमेची वंदना करणे, ती **स्थापनावंदना** आहे. अरहंत आदिंच्या शरीराची वंदना करणे, **द्रव्यवंदना** आहे. अरहंत आदिंनी व्याप्त असलेल्या क्षेत्राची वंदना करणे, ती **क्षेत्रवंदना** आहे. अरहंतादी भगवान ज्या काळात झाले, त्यांचे कल्याणक ज्या काळात झाले, त्या काळाची वंदना करणे, ती **कालवंदना** आहे; तर अरहंत-सिद्ध-आचार्य-उपाध्याय-साधू यांच्या गुणांची वंदना करणे ती **भाववंदना** होय. अशा प्रकारे वंदनेचेही सहा प्रकार आहेत.'

संवेग म्हणाला, 'आजी, मला आता लक्षात आलं की बरेचदा तुम्ही 'जय देवा पार्श्वनाथा...' असं म्हणता, ही नामवंदना आहे. आपण शिखरजीच्या पहाडाला नमस्कार करतो, त्याची महिमा गातो; ती क्षेत्रवंदना आहे. आणि ज्या दिवशी ज्या भगवंताचे कल्याणक झाले त्या दिवशी त्यांची स्तुती करतो-पूजा करतो, ती कालवंदना आहे. तीर्थंकर भगवंतांचे शरीर अत्यंत कांतिमय असतं-तेजस्वी असतं, असं बोलून तीर्थंकरांची वंदना करतो ती द्रव्यवंदना आहे, तर त्यांच्या गुणांचं स्मरण करतो, ती भाववंदना आहे.'

'सक्षम! अगदी बरोबर!! पण ही वंदना फक्त बोलून नव्हे तर भावपूर्ण व्हायला हवी बरं का!!.' आजी उत्तरल्या.

'प्रतिक्रमण :- पुढील आवश्यक आहे प्रतिक्रमण. १४ प्रकीर्णकांमधील 'प्रतिक्रमण' प्रकीर्णकाचं वर्णन आपण 'बहुश्रुत भक्ती' भावनेमध्ये बघितलं आहे.

**४) प्रतिक्रमण :-** प्रतिक्रमण म्हणजे निर्दोष होऊन जीवन जगणं. दोषी जीव स्वतःचं आयुष्य बिघडवतो आणि दुसऱ्यांना पण तसाच उपदेश देतो. आपण दैवसिक प्रतिक्रमण, रात्रिक प्रतिक्रमण असे प्रतिक्रमणाचे प्रकार बघितले होते. आता एका दिवसात कुठले कुठले दोष लागू शकतात ते बघू या.. संपूर्ण दिवसात प्रमादाच्या कारणाने म्हणा किंवा कषायांच्या कारणाने, पाच इंद्रियांच्या विषयांमध्ये रागीद्वेषी होऊन समजा कुठल्या जीवाचा घात झाला असेल, भोजनामध्ये दोष लागले असतील, निष्कारण कुठल्या क्रिया झाल्या असतील, कर्कश कठोर मिथ्या वचन बोलण्यात आले असतील, कोणाची निंदा-बदनामी झाली असेल, आपणच आपल्या गुणांची प्रशंसा केली असेल, चार विकथांमध्ये लक्ष लागलं असेल, कोणाच्या धनावर वासना गेली असेल......असे जे जे खोटे परिणाम झाले असतील तर, अशा परिणामांनी जीवांना धर्मापासून दूर जातील असे कर्म बंध होतात. असे पाप परिणाम मिथ्या व्हावे यासाठी प्रतिक्रमण केलं जातं.

दिवसाच्या शेवटी किती जमा आणि किती खर्च झाला याचा हिशोब करतो ना आपण.... आणि खर्च कमी व्हावा यासाठी प्रयत्नही करतो.. अगदी तसेच झालेल्या पाप परिणामांवर लक्ष रोखून त्यांची शहानिशा करून.. आत्म्याच्या हितासाठी निरंतर उद्यमी राहणे म्हणजे प्रतिक्रमण!

**प्रतिक्रमणाचेही सहा प्रकार** सांगितले आहेत.

धर्मसंबंधी अर्थात देव-शास्त्र-गुरुसंबंधी नावांच्या अयोग्य उच्चारणामुळे जे दोष उत्पन्न

होतात, त्यांचं निवारण करण्यासाठी प्रतिक्रमण करणे ते **नामप्रतिक्रमण** आहे. शुभ-अशुभ स्थापनेच्या निमित्ताने मन-वचन-कायेचे जे दोष उत्पन्न होतात त्यातून निवृत्तीसाठी **स्थापना प्रतिक्रमण** केलं जातं. आहार-पुस्तक-औषधी आदिंच्या निमित्ताने मन-वचन-कायेने उत्पन्न दोषांच्या निराकरणासाठी प्रतिक्रमण करणे, ते **द्रव्य प्रतिक्रमण** आहे. कुठल्या क्षेत्रात गमन करणे आदिंच्या निमित्ताने अशुभ परिणामांनी जे दोष लागतात त्यांच्या निराकरणासाठी प्रतिक्रमण करणे, हे **क्षेत्र प्रतिक्रमण** आहे. दिवस-रात्र, पक्ष, ऋतू, शीत, उष्ण, वर्षाकाळ यांच्या निमित्ताने जे अतीचार होतात, त्यांना दूर करण्यासाठी प्रतिक्रमण करणे, ते **काल प्रतिक्रमण** आहे. एवढेच नव्हे तर राग-द्वेष भावांची उत्पत्ती झाल्याकारणाने जे दोष उत्पन्न होतात, त्यांच्या नाशासाठी प्रतिक्रमण करणे, ते **भाव प्रतिक्रमण** आहे.

मुनिराज अवश्य रूपाने प्रतिक्रमण करतात. स्वतःचं जीवन निर्दोष बनवतात आणि दुसऱ्यांनाही निर्दोषतेचा मार्ग दाखवतात. देवासमोर अत्यंत अत्यंत सरळ निर्मळ अंतकरणाने आपल्या दोषांचा पाढा वाचणे म्हणजे प्रतिक्रमण.. झालेले दोष निघून जावेत अशी भावना ठेवणे म्हणजे प्रतिक्रमण....!

प्रतिक्रमणामुळे आत्मशुद्धी होते, कषाय कमी होतात आणि संयम, नम्रता, क्षमा व आत्मपरीक्षणाची भावना दृढ होते. या आवश्यकांमुळे आपल्या दैनंदिन आचरणाचे परीक्षण करण्याची सवय लागते आणि आध्यात्मिक प्रगतीचा मार्ग सुकर होतो.'

'आजी, आपला जैन धर्म सजगतेचा आणि जागरूकतेचा धर्म आहे. आपल्यालाही शांती देतो आणि इतरांनाही आपल्याकडून कुठलाही त्रास होऊ नये झाला असेल तर त्यांना क्षमा मागावी ही सरलता शिकवतो.. मला खूप अभिमान वाटतो आपण हा धर्म पाळतो याचा..' संवेग अभिमानाने म्हणाला.

आजींच्या चेहऱ्यावर समाधान उमटलं, त्या म्हणाल्या, 'अगदी बरोबर. चला पुढलं आवश्यक आहे प्रत्याख्यान, समजून घेऊ या...'

**५) प्रत्याख्यान :-** भविष्यकाळातील पापांची त्यागरूप भावना म्हणजे प्रत्याख्यान आवश्यक. आगामी काळात पाप परिणाम होऊ नये म्हणून त्यांचा आस्रव थांबवण्यासाठी अशी भावना करणे की मी भविष्यकाळात अमुक अमुक पापभाव मन-वचन-कायेने करणार नाही हे प्रत्याख्यान नावाचे आवश्यक आहे. अनावश्यक गोष्टींना दूर करण्यामध्ये सदैव तत्पर राहणं ते प्रत्याख्यान आहे. मोक्षमार्गी जीव आपल्या भविष्यकालीन परिणामांसंबंधीही किती सजग राहतो.. हे प्रत्याख्यान आवश्यक समजून घेते वेळी लक्षात येतं. मोक्षमार्ग खरोखर विवेकाचा रस्ता आहे. भविष्यकालीन कर्मबंधासंबंधी कुठल्या कुठल्या परिणामांबाबत आम्ही कशा पद्धतीने सजग रहावं हे प्रत्याख्यान आवश्यक समजावून सांगतं.

**प्रत्याख्यानाचे सहा भेद आहेत.**

ज्याच्या कारणाने पाप होईल त्या नावांचे उच्चारण करण्याचाही त्याग करणे ते नाम प्रत्याख्यान आहे. ज्याच्या कारणाने मिथ्यात्व पुष्ट होईल अशा स्थापना करण्याचा त्याग करणे हे स्थापना प्रत्याखान आहे. पापबंधाचं कारण असणारे सदोष द्रव्य आणि तपाचं निमित्त निर्दोष द्रव्य त्यांचाही मन-वचन-कायपूर्वक त्याग करणे ते द्रव्य प्रत्याख्यान आहे. ज्या क्षेत्राच्या निमित्ताने असंयमाचे भाव होतात त्या क्षेत्राचा त्याग करणे, हे क्षेत्र प्रत्याख्यान आहे. ज्या काळ-वेळेच्या निमित्ताने जीव असंयमाकडे वळतो, त्याचाही त्याग करणे काल प्रत्याख्यान होय. मिथ्यात्व, असंयम, कषायादी भावांचा त्याग करणे भाव प्रत्याख्यान आहे.

**६) कायोत्सर्ग :-** पुढचं आवश्यक कार्य आहे कायोत्सर्ग.'

'आजी.. आजी.. मला माहिती आहे कायोत्सर्ग काय आहे ते! पूजा झाली की सगळे कायोत्सर्ग करतात...म्हणजे नऊ वेळा णमोकार मंत्र म्हणायचा...' सक्षम तत्परतेने म्हणाला.

आजी हसल्या, म्हणाल्या, 'नऊ वेळा णमोकार मंत्र हे वास्तवात सांगण्याचा कायोत्सर्ग आहे. खरं तर तितका वेळ शरीराचं ममत्व सोडणे हा वास्तविक कायोत्सर्ग आहे. आपण दिवसाचे चोवीस तास शरीराच्या सेवेत लागलेलो असतो. माझं शरीर पुष्ट व्हावं, स्वस्थ राहावं, कार्यशील राहावं.... आता माझं शरीर थकलं, काळजी घ्यावी लागेल, अमुक खावे लागेल, तमुक सोडावं लागेल अशा पद्धतीने शरीराची साधना सतत सुरू असते. वास्तविक साधना व्हायला हवी, ही शरीराचे ममत्व सोडण्याची. कारण शरीर माझं स्वरूप नाही. आत्म्याचा शरीराशी वास्तविक संबंध नाही. हे जाणून दृष्टी सम्यक् व्हावी, राहावी, शरीररूपी परद्रव्याचे ममत्व सुटावे म्हणून कायोत्सर्ग केला जातो.

'सक्षम, कायोत्सर्गाची विधी आहे बरं का! कसातरी णमोकार मंत्र म्हणून टाकायचा म्हणजे कायोत्सर्ग नव्हे! चार बोटांचं अंतर दोन्ही पायांमध्ये ठेवून, दोन्ही हातांना खाली लांब सोडून, देहाची ममता त्यागून, देहापासून भिन्न शुद्ध आत्म्याची भावना करणे म्हणजे कायोत्सर्ग होय. कायोत्सर्ग पद्मासनामध्येही केला जातो. दोन्ही अवस्थांमध्ये आत्म्याचं ध्यान व्हावं हा वास्तविक सफल कायोत्सर्ग!

कायोत्सर्गाचे पण सहा भेद आहेत. कठोर वचनपूर्वक नावादिकांनी उत्पन्न दोषांना दूर करण्यासाठी कायोत्सर्ग करणे, तो **नाम कायोत्सर्ग** होय. मिथ्या पापरूप स्थापनेद्वारा अतीचार लागतो त्याला दूर करण्यासाठी कायोत्सर्ग करणे **स्थापना कायोत्सर्ग** आहे. सदोष द्रव्यांचे सेवन तथा सदोष क्षेत्र-काळाच्या सेवनाने उत्पन्न दोषांना दूर करण्यासाठी कायोत्सर्ग करणे, **द्रव्य-क्षेत्र-काल कायोत्सर्ग** आहे. मिथ्यात्व-असंयम अशा भावांद्वारे दोष लागतात, त्यासाठी कायोत्सर्ग करणे **भाव कायोत्सर्ग** आहे. अशा प्रकारे कायोत्सर्गाच्या सहा प्रकारांचं वर्णन केलं आहे.'

चेतना म्हणाली- 'म्हणजे सोलहकारण भावनांमधील 'आवश्यकापरिहाणी' ही भावना आपल्याला धर्माच्या पायथ्याशी जोडून तीर्थंकररूपी वैभवाच्या शिखरापर्यंत पोहोचवते. **आत्म-कल्याणाचा मार्ग म्हणजे जागरूकता आणि त्या जागरूकतेचा श्वास म्हणजे आवश्यक.**'

आजी म्हणाल्या, 'अगदी बरोबर हो चेतना! संसाराच्या 'हे करायचे... ते करायचे..' असा जप करत क्षणिक सुखांच्या मृगजळामागे धावताना हा आवश्यकांचा कल्याणकारी मार्ग हरवू नये, आपण श्रावकांनी श्रावकांची आवश्यकं सजगतेने पाळावीत आणि कधीतरी मुनी अवस्था धारण करून मुनींची आवश्यकं पाळण्याची भावना ठेवावी. सावधान! असा सावधतेचा इशारा आवश्यकापरिहाणी भावना देते.'

कुठलीही परिस्थिती आली तरी ही 'आवश्यके' सुटू नयेत, हा मंत्र जणू मुलांच्या कोमल हृदयावर अंकित होत होता. **( क्रमशः )**

## मागील अंकाविषयी अभिप्राय....

जय जिनेंद्र प्रज्ञाताई,

सन्मतिचा अंक अत्यंत वाचनीय, मननीय आहे. अभ्यासपपूर्ण लेखांनी सजला आहे. अहिच्छत्र पार्श्वनाथ - डॉ. स्वयंप्रभा पाटील यांचा लेख मिथ्यात्वी लोकांच्या डोळ्यात अंजन घालणारा आहे. अशा रितीने मिथ्यात्वाचा परिहार केलाच पाहिजे, त्यांच्या लेखाच्या पुढील भागाची वाट पहात आहे. तसेच डॉ. बोडे यांचा विचारांचे जीवाणु व विषाणु हा लेख खूप बोलका आहे, मी med microbiologist असल्याने मनाला खूप भावला. सूक्ष्मदर्शकाने दिलेला धडा खूप काही शिकवून जातो.... जणू धर्माच्या क्षमादि लक्षणांचे आचरण करा असे सांगणारा आहे.

दिवास्वप्न या पुस्तकाची माहिती सुंदर. असे नेहमीच ज्ञानात भर टाकणारे सन्मति इतके अभ्यासू आणि विचारवंत लेखक आपण कुठे आणि कसे शोधता???? कौतुक वाटते. मनःपूर्वक अभिनंदन! **-डॉ. सरिता कोठाडिया**

# पट्टमहादेवी– शब्दांपलिकडील अन्वयार्थ

(लेखांक – ३२)

**विपुल खेडकर,** नागपूर

पट्टमहादेवींच्या पत्राला सन्निधानांनी दिलेल्या उत्तराने समाधान वाटून त्या शिवरात्री महोत्सवाकरिता शिवगंगेकडे निघाल्या. आता पुढे सन्निधान उत्सवासाठी येतात की नाही, काही अघटित घडणार आहे का.... ते बघू या भागात.....!

**संकल्पपूर्तीच्या दिशेने ?**

यंदाच्या शिवरात्रीला पट्टमहादेवी आपल्या परिवारासोबत शिवगंगेला उपस्थित राहणार ही बातमी कर्णोपकर्णी त्या प्रांतात व्यापकतेने पसरली . फलस्वरूप अतोनात गर्दी होणार याचा ठोकताळा बांधला होताच. त्यादृष्टीने राजपरिवार आणि इतर महत्त्वाच्या व्यक्तींसाठी निवास, भक्तांना राहण्यासाठी जागा आदि विशेष व्यवस्था करायची होती. प्रधानमंत्री गंगराज आणि मादिराज यांनी भरपूर खाद्यसामग्री, आवश्यक सेवकवर्ग, रक्षकदल आणि गुप्तहेर वगैरे व्यवस्था चोख ठेवली होती. आजूबाजूच्या मोठ्या गावागावांतून लोक उत्स्फूर्ततेने धान्य आदि पाठवीत होते.

माघ वद्य दशमीला पट्टमहादेवी आपल्या आई माचिकब्बे आणि वडिल मारसिंगय्या, राजपुत्र विनयादित्य यांच्यासोबत शिवगंगेत दाखल झाल्या. मामा परिवारातून सिंगीमय्या सहकुटुंब येणार होते. थोरल्या तिघी राण्या देखील सकाळीच आल्या होत्या.

शिवरात्रीच्या दिवशी मारसिंगय्यांचा निर्जल उपवास असायचा. त्यामुळे स्नान–ध्यान आटोपून ते मंदिरात आले. थोड्याच वेळात शान्तलादेवी आपल्या आई आणि इतर परिवारासोबत मंदिरात प्रवेशल्या. दिवसाची पूजापाठ–अर्चना संपतासंपता सायंकाळ होत आली तर, लगेचच रात्रीची अर्चना प्रारंभ झाली. पूजा आणि मंत्रोच्चारांमध्ये शांतलादेवींनी सहभाग घेतला. पट्टमहादेवी देखील पित्याप्रमाणे निराहार राहिल्या होत्या. मंदिराच्या पुजाऱ्यांच्या नेत्री आश्चर्य, तर मुखावर संतोषाचे मिश्रित भाव झळकत होते.

पूजेची समाप्ती होता होता पूर्व क्षितिजावर सोनेरी केशरी छटा पसरायला सुरुवात झाली. पहाटेच्या त्या प्रसन्न वातावरणाचा उत्साह सगळ्यांना नवी चेतना प्रदान करू लागला. पूजेचे सगळेच विधी समाप्त झाल्यामुळे प्रसाद वितरणाने सांगता झाली.

त्याच दिवशी सायंकाळी एका छोट्या सभेचे आयोजन केले गेले. जवळपासच्या अनेक छोट्या गावांचे ग्रामाधिकारी, व्यापारी, धनवान श्रेष्ठी यात उपस्थित होते. मंदिराचे धर्माधिकारी सर्वांना आपली योजना सांगू लागले. –

'उपस्थित सज्जनवृंद! यंदाचे हे संवत्सर या क्षेत्राच्या इतिहासात असाधारण संवत्सर आहे, कारण या क्षेत्राच्या उदयापासून आज पहिल्यांदाच पट्टमहादेवींनी राजपरिवारासोबत उपस्थित राहून आपल्या वडिलांविषयीचा आदर द्विगुणित केला आहे. महादेवी केवळ सम्मिलितच झाल्या नाहीत, तर आपल्या शुद्ध मंत्रोच्चाराने सगळ्यांना स्वर्गीय आनंद दिला आहे. याप्रसंगी या पवित्र क्षेत्री ज्ञानार्जनाचे उपयुक्त अध्ययन केंद्र होण्यासाठी शारदा देवीची स्थापना व्हावी अशी पट्टमहादेवींची इच्छा आहे. केवळ शारदा देवीची स्थापना हा आमचा मनसुबा होता, परंतु शारदा देवीची स्थापना म्हणजेच ज्ञानार्जनाचे केंद्र व्हावे, ही महादेवींची अभिलाषा!

म्हणून लवकरच येथे हे कार्य संपन्न होत आहे. आपण सर्वांनी या कार्याकरिता आपला पूर्ण सहयोग द्यावा अशी माझी विनंती आहे.'

सभेत असणाऱ्या जंकणाचार्यांनी उठून निवेदन केले, 'या शुभकार्याकरिता अपेक्षित मंदिर आणि भवनाची निर्मिती करण्याची जबाबदारी मी घेतो.' आणि नंतर थोड्याच अवकाशात प्रत्येकाने या कार्याकरिता आपापला वाटा सांगितला.

दुसऱ्या दिवशी पट्टमहादेवींनी जंकणाचार्यांना विचारले, 'या मंदिराच्या निर्माणाला किती वेळ लागेल ? येथे जास्त कलाकुसर होण्याऐवजी एखादे साधे शारदा मंदिर होणे आवश्यक आहे.... आपण आपली सारी कला शारदेच्या मूर्तीत प्रस्फुटित करावी.....'

'पुरेसे कारागीर आणि सामग्री प्राप्त झाली तर, गर्भगृह आणि मूर्ती निर्माण कार्य एक महिन्यात होऊ शकते..' आणि पुढे थोडा विचार आणि आकडेमोड करून ते म्हणाले, 'चैत्र शुद्ध द्वितीया... शुक्रवारला शारदामाईचा प्रतिष्ठापना सोहळा होऊ शकतो..!'

'असे जर असेल तर उत्तम ! आम्ही तोपर्यंत येथेच राहू...! ..कदाचित सन्निधान देखील तोपर्यंत पोहोचतील.' पट्टमहादेवी म्हणाल्या.

**ना कळे कोणासही मनी काय जाहले....**

जंकणाचार्य आपल्या कामाला लागले आणि पट्टमहादेवी....! त्या तर विचारपूर्वकच येथे आल्या होत्या. गेल्या वर्षभरापासून त्यांची तयारी सुरु होती... कोणालाही कसलाही संशय येऊ नये, म्हणून तर त्यांनी शिवगंगा हे स्थान निश्चित केले होते... आपल्यामुळे एका सेविकेची झालेली हत्या त्यांच्या मनाला विलक्षण पीळ देऊन गेली होती आणि आपल्या निर्णयावर त्यांनी मनोमन शिक्कामोर्तब केले होते. चातुर्मासाच्या कालावधीत व्रतवैकल्याच्या निमित्ताने एकभुक्ता राहणे आणि स्वाध्याय या दोहोंच्या आधारे शरीर आणि कषाय यांचे लेखन सुरु झालेच होते.... आचार्य प्रभाचंद्रस्वामींकडून सल्लेखनेचा विस्तारपूर्वक अभ्यास आणि मनोमन नियम सल्लेखनेचा अंगीकार देखील केला होता.

मध्येच मंत्रीमहोदयांना कुणकुण लागली तर, त्यांनी सहज शब्दांत त्यांना समजावून सांगितले होते....पण मनाचा थांगपत्ता न लागू देता आपल्या संकल्पाची तयारी पुढे सुरूच ठेवली होती. मधूनच त्यांच्या बोलण्यातून एखादेवेळी एखादा शब्द बाहेर पडे, पण लगेच त्या सांभाळून घेत असत!

शिवगंगा हे शिवमूर्ती असणारे उंचावरील स्थान ! पहाडाचे वैशिष्ट्य असे की चार बाजूंनी वेगवेगळ्या आकारात भासमान होणारा पहाड..... जणू कोण्या शिल्पकाराने पहाडाची निर्मिती केली असावी... पूर्वेकडून नंदीरूपात, उत्तरेकडून लिंगरूपात, पश्चिमेकडून कुमार गणपती रूपात तर दक्षिणेकडून नागराज रूपात...! जणू शंकराची विविध रूपे ! निसर्गाची कृपा ओसंडून वाहणारी...पहाडाच्या सभोवताल दाट जंगल, मधून वाहणारी अंतरगंगा ! चढण्यास अत्यंत कठीण असणारा सरळसोट चढ असणारा डोंगर ! एवढ्या उंचीवर संक्रांतीच्या दिवशी जलोद्भव होणारा तीर्थस्तंभ! पहाडावर एका निमुळत्या शिखरावर असणारा विशालकाय नंदी.... ज्याच्या परिक्रमेत प्राणांचा मोह त्यागला जातो....!

जैनतत्त्वांवर विश्वास असणाऱ्या पट्टमहादेवींनी कटवप्र सोडून या क्षेत्राची निवड करण्याचे एकमेव कारण म्हणजे आपल्या भावना कोणाच्या लक्षात न येऊ देता आपले इच्छित पूर्णत्वाला नेणे.. ....! शिवाय पित्याच्या भावनांप्रति आदर दर्शविणे....! महादेवींची जीवनशैली जिनधर्मावर आधारित असली तरी, प्रत्येक धर्माचा, प्रत्येक व्यक्तीचा आदर, सन्मान सोलहकारण भावना मनात खोलवर रुजल्याची प्रतीती देणाराच होता !

जंकणाचार्य आपल्या कामाला भिडले,

ताबडतोब पुत्र डंकणला पाठवून शिल्पकार आणि सामग्री मागविली. चार दिवसांत सर्व येऊन पोहोचेस्तोवर स्थानिक लोकांच्या मदतीने पायाभरणी आणि शंकूस्थापना झाली होती. कामाला वेगाने आकार मिळत होता. इकडे पट्टमहादेवींनी एक पत्रवाहक श्रवणबेळगोळला तर एक सन्निधानांकडे रवाना केला. बेळगोळाहून कवी बोकिमय्या आलेत. त्यांच्याशी विचार विमर्श करून नवीन अध्ययन केंद्रात कोणकोणते प्रशिक्षण द्यायचे याचा आराखडा तयार केला.

**संकल्पाच्या पूर्णत्वाकडे**

शिवरात्रीला आलेला भक्तवृंद परत गेला होता. राजपुत्र विनयादित्यही परतले होते. शांतलादेवींनी या प्राणप्रतिष्ठेसाठी व्यापक रूपात आमंत्रण देण्यास नकार दिल्यामुळे केवळ देणगीदातार आणि मंदिराशी संबंधित लोक, गावातील काही मंडळी उपस्थित होती. शिवरात्रीला पोहोचू न शकणारे मामा सिंगिमय्या मामी आणि परिवारासोबत आले होते. शांतलादेवींचा संदेश प्राप्त झाल्याने युवराज- युवराज्ञी, मधले छोटे बिट्टीदेव आणि धाकटे विनयादित्य देखील पोहोचले होते. हरियल देवींना पट्टमहादेवींनी सोबतच आणले होते... त्यामुळे आता प्रतीक्षा केवळ सन्निधान आणि बम्मलदेवी-राजलदेवींची होती. शांतलादेवी त्यांच्या आगमनाची आतुरतेने वाट बघत होत्या.... पण...!

क्षेत्राच्या धर्मदर्शींनी विचारले सुद्धा, 'सन्निधानांच्या प्रतीक्षेत मुहूर्तात थोडा बदल करायचा का?'

'युद्ध क्षेत्रात काय अडचणी असतील याचा अंदाज इथे बसून लावणे कठीण आहे. निश्चित कार्य निश्चित वेळेत संपन्न होणे आवश्यक असते. येथे उपस्थित झालेल्या लोकांना वाट बघायला लावणे उचित ठरणार नाही, म्हणून ठरल्याप्रमाणे सगळे होऊ द्या... कदाचित या महोत्सवात सहभागी होणे त्यांच्या भाग्यात नसेल.... आपण सर्वच काळाच्या गतीच्या अधीन आहोत ना? जेव्हा बोलवणे येईल तेव्हा येथे असणाऱ्यांची प्रतीक्षा केली जाते कां? जे कार्य करायचे आहे अथवा जे कार्य घडायचे आहे ते कोणी येवो वा ना येवो, आपल्या नियत समयी घडतेच... त्यामुळे तुम्ही तुमचे कार्य सुरू करावे.'

चैत्र शुद्ध द्वितीयेला शुक्रवार दिवशी निश्चित मुहूर्तावर शारदा देवीची स्थापना झाली. प्रतिष्ठेच्या दुसऱ्या दिवशी शनिवारी थाटामाटात पूजा-अर्चना संपन्न झाली. रविवारला बऱ्याच भक्तांनी निरोप घेतला. पंचमीला सोमवार दिवशी देखील दिवसभर वापस जाणारे जात होते. सायंकाळी शारदादेवीच्या मंदिरासमोरील मंडपात सर्व स्थानापन्न होते.

शांतलादेवींनी सर्वत्र दृष्टी टाकली आणि म्हणाल्या, 'सगळे आले आहेत फक्त सन्निधानांना सोडून....! राणी बम्मलदेवी आणि राजलदेवी जरी आल्या असत्या तरी आमच्या मनाला आनंद वाटला असता... असो ! कोणत्याही धर्माचे अनुयायी असोत, चांगले मानव बनण्याची प्रज्ञा निर्माण करण्याचे कार्य, विवेकविचार उत्पन्न करण्याचे साधन-निमित्त शारदा देवीचे अर्थात ग्रंथांचे आहे. सगळ्याच धर्माच्या अनुयायांमध्ये शारदामाता ज्ञानप्रदात्री अधिष्ठात्री देवी आहे.. तिच्या समोर कोणताही भेदाभेद नाही. याचा आशयच हा आहे की, आम्ही देखील तिच्या प्रमाणे भेदभावरहित जीवनयापन करायला हवे. मी माझ्या जीवनात कोणत्याही भेदभावांशिवाय सगळ्या धर्मांच्या देवतांच्या स्थापनेत सहभाग घेतला. बरोबर चौदा वर्षांपूर्वी आजच्याच दिवशी वेलापुरीत चेन्नकेशव स्थापन झाले, त्यानंतर चार वर्षांनी संक्रांतीच्या मुहुर्तावर दोरसमुद्रमधे युगल शिवालयांची स्थापना केली. त्यानंतर दोन वर्षांनी बेळगोळमधे भगवान शांतिनाथांची प्रतिष्ठा केली. आज येथे शारदादेवीची प्रतिष्ठापना करून अशी प्रार्थना करते की, हे देवीमाते! द्वेषभावाला दूर करून परस्पर मैत्री भावाने सहजीवन व्यतीत होईल, अशी सदबुद्धी सर्वांना प्राप्त होवो....

आज इथे शारदादेवीच्या सान्निध्यात मी माझी नृत्यसेवा आणि गानसेवा समर्पित करते आहे.'

'महादेवी, गानसेवा ठीक आहे....पण नृत्यसेवा ? आपण गेले वर्षभर एकभुक्ता, गेला महिनाभर केवळ एक पेला दूध आणि एक केळे घेऊन आहात आणि गेल्या पाच दिवसांपासून तर निराहार आहात....' चट्टलदेवी म्हणाल्या.

'महिनाभर केवळ दूध आणि केळे.... आणि पाच दिवसांपासून निराहार ? अम्माजी, हे खरे का....?' शांतलादेवींच्या आईने म्हणजेच माचिकब्बेंनी काळजीने विचारले.

'बस.... आजची रात्र आई ! माता शारदेचे ध्यान करण्याचा आजचा शेवटचा दिवस.... यानंतर मी कोणत्याच व्रतात वा नियमाच्या बंधनात राहणार नाही...!' शांतलादेवी पायात घुंगरू बांधतच बोलल्या .

आणि घुंगरू शांत झाले......

महादेवींनी नृत्यसेवेला सुरुवात केली. त्यांच्या पदलालित्याने मंदिर स्पंदित व्हायला लागले, जनसमूह थिरकायला लागला. एक मुहूर्तपर्यंत नृत्य सुरु होते. नृत्य संपते न संपते तोच थोडी विश्रांती घेऊन शांतलादेवी पद्मासनात स्थिर झाल्या. दक्षिणेला तोंड करून त्यांनी बैठक घेतली आणि गायनास सुरुवात केली. त्यांच्या कंठातून निघणाऱ्या सुरांनी वातावरणाला भारून टाकले...सूर समोरच्या पहाडावर आदळून त्यांचे प्रतिध्वनी उमटू लागले.....त्या रसमाधुर्यात सर्वच आकंठ बुडाले! गाता गाता त्यांनी पंचनमस्कार पाठ सुरु केला. उपस्थित सर्वचजण णमोकारमंत्र स्वरात म्हणू लागले. पट्टमहादेवींनी आरोहण सर्वांत उंच स्वरापर्यंत नेले.... आणि... एकदम थांबले....! उपस्थित सर्वजण जणू एकदम जागे झाले!!

शांतलादेवी डोळे मिटून एका स्तंभाला टेकून बसलेल्या होत्या. त्यांच्या चेहऱ्यावर एक शांतिपूर्ण समाधान दिसत होते... नादमाधुर्य थांबले होते...पदलालित्याने होणारे स्पंदन, थिरकणारी पाऊले स्तब्ध झाली होती.... सतत चौफेर लक्ष ठेवून असणारे नेत्र विसावले होते... अखंड वाहत असणारा उत्साहाचा झरा आटला होता..... सततची प्रवाहित ज्ञानधारा खंडित झाली होती.... प्राणपखेरू हा देह सोडून पुढच्या प्रवासाला निघून गेले होते....!

युवराजांनी शांतलादेवीना उठवण्याचा प्रयत्न केला तर, त्यांची मान एकीकडे लवंडली... पायांना स्पर्श करून बघितला तर ते थंड पडले होते....

काय घडले याची कल्पना येऊन ते मोठ्या आवाजात म्हणाले, 'आई, हे काय झाले, कां इतकी घाई केलीत....' धीरोदात्त युवराजांना अश्रू आवरले नाहीत...

हरियलदेवी तर आईचा असा देहत्याग बघून धक्क्याने ग्लानीत गेल्या. त्यामुळे सगळ्यांचीच थोडी पळापळ झाली. पाण्याच्या शिडकाव्याने त्यांना सचेतता आली.... पण त्यांचा आक्रोश सगळ्यांच्याच हृदयाला पीळ पाडत होता.

मधले छोटे बिट्टीदेव सारासार विचाराने वागणारे, एकदम व्यक्त न होणारे, ते आईच्या चरणाशी मूक आक्रोश करीत अस्वस्थ होत म्हणाले,- 'आई, आमच्यावर विश्वास नव्हता का? आम्ही परिस्थिती सावरून सगळे हातात हात घालूनच नांदणार होतो ! तुमच्या इच्छेबाहेर आम्ही वागणार नव्हतो..... कां आम्हाला पोरके केलेत ? आम्ही आता कोणाकडे बघून स्फूर्ती घ्यायची? कोणाजवळ मन मोकळे करायचे ? कां? कां सर्वांचा असा त्याग केलात....?'

शेंडेफळ धाकटे विनयादित्य, ज्यांना शेवटपर्यंत आईचा सहवास लाभला, त्यांच्या दुःखाला तर पारावार नव्हता.... आईच्या सर्वांशी सारख्या वागणुकीचा अनेकदा त्यांना त्रास व्हायचा, त्यावरून ते वाद घालायचे, हे सर्व आठवून ते म्हणाले, 'आई, नाही ना मी वाद करणार... कां मला ही शिक्षा दिलीत.. मी आपणाशिवाय कसा

राहू? आई ! बोला ना.... माझा राग आला का? कां आम्हाला सोडून निघून गेलात ? कां.....?'

मोठ्या तिन्ही राण्या पद्मलदेवी, चामलदेवी आणि बोप्पदेवी दुःखातिरेकात शोक करीत होत्या. राणी पद्मलदेवी म्हणाल्या,

'मी माझ्या वागणुकीने किती त्रास दिला, पण तरी मला सदैव जवळ केले, मागचा प्रवासही सोबत केला, आता सुद्धा गेल्या महिनाभरापासून एकत्र होतो, पण मनाचा थांगपत्ता लागू दिला नाही.... सगळ्यांची मने समजून घेणाऱ्या आपण, आपणाला समजण्यात आम्ही कमी पडलो.... आम्ही कमी पडलो.....!'

'बेटा शांतला !' म्हणत वडील मारसिंगय्या आपल्या जागेवरून उठून दोन पावले पुढे गेले आणि त्यांची पावले अडखळली. ते पडणारच, तोच विनयादित्यांनी त्यांना आपल्या मजबूत बाहूंमध्ये त्यांना सावरले... मात्र त्यांनी विनयादित्यांच्या खांद्यावरच मान टाकली... जणू आपल्या लाडक्या लेकीचा विरह सहन न झाल्याने निघून गेले तिच्या पाठोपाठ ....!

आपली लेक आणि पाठोपाठ पती दोघांनीही असे सहज परलोक गमन केलेले पाहून माचिकव्वेंचा तोल ढळला...त्या आक्रोश करु लागल्या, 'यासाठीच म्हटले होते कां अम्माजी तुम्ही, फक्त आजच ध्यान करायचे आहे म्हणून....! नेहमीच तुम्ही बापलेक एका बाजूला राहता..... मला सोडून पुढे जाता.... ते काही नाही.... मला देखील यायचे.....हेच बघण्यासाठी मी जिवंत राहिले कां?... मला आत्ताच बेळगोळला जायचे आणि सल्लेखना धारण करून देह त्याग करायचा....!' आणि माचिकव्वे मौन झाल्या. संपूर्ण मंडपात भयानक शांतता पसरली.

तेव्हाच दुरून घोड्यांच्या टापांचा आवाज ऐकू आला. लोकांचे कान आवाजाकडे लागले तर डोळे अश्रूंनी भरून आले, आसवांच्या धारा वाहू लागल्या.

महाराज बिट्टीदेव घोड्यावरून उतरले. रथातून बम्मलदेवी आणि राजलदेवी उतरल्या. समोरचा शांत 'आक्रोशित जनसमूह बघून महाराजांनी विचारले, पट्टमहादेवी कोठे आहेत? त्या समोर कां नाही आल्यात ?'

युवराज अश्रुपूरित नयनांनी बोलले, 'आपली खूप .... खूप वाट बघितली पिताजी...... गेल्या तीन दिवसांपासून तर त्यांचे लक्ष केवळ तुमच्या पदचापांची चाहूल घेत होते .......' आणि त्यांचा गळा भरून आला .

'आता देवी कुठे आहेत ?'

सगळेच मौनाने आत वळले... तेथील देवींची पद्मासनस्थ शांत मुद्रा बघून महाराज क्षणभर आश्चर्याने स्तब्ध झाले.....मग दुःखाचा बांध फुटला...

'देवी, आम्ही विजयश्री मिळवून आलो, परंतु तुम्ही आमच्या स्वागताला आल्या नाहीत, तर विजय मिळविण्याला काय अर्थ ? याच शिवगंगेला आपण एकमेकांना मूक वचन दिले होते ना आयुष्यभर साथ निभावण्याचे...... आणि आता याच शिवगंगेमधे आम्ही येईपर्यंत आपण थांबला नाहीत.... आपण आमच्या भाग्यलक्ष्मी ! आमचे भाग्यच आम्हाला सोडून गेले..... आम्ही आमच्या भाग्यलक्ष्मीला मुकलो, आम्ही आमच्या हृदयालाच काढून फेकले... आम्ही चुकलो.... आम्ही खूप उशीर केला.....खूप खूप उशीर केला देवी.... आम्हाला माफ करा... ऊठा ना देवी.... ऊठा ना....!' आणि ते गदगदून रडू लागले. बाकीच्यांनाही शोक आवरणे कठीण झाले. सगळा परिसर रूदनाने गंभीर झाला .

एव्हाना बातमी सर्वदूर पोहोचली होती. साऱ्या राज्यावर शोककळा पसरली. जनाजनात, मनामनात आपल्या पट्टमहादेवींवर असणारे प्रेम, भक्ती शांतपणे व्यक्त होत होती. स्वतः सन्निधान, युवराज हजर असल्याने सगळी व्यवस्था चोख होती. दुसऱ्या दिवशी सकाळी दोन्ही दहनक्रिया सोबतच

पार पडल्या. तिसऱ्या दिवशी रक्षाविसर्जन करून राजपरिवार दुःखीकष्टी अंतःकरणाने राजधानीत परतला.

पट्टमहादेवी परतल्या नाहीत, त्या थेट दैवी प्रवासाला गेल्यात यावर विश्वास ठेवायला प्रजाजन तयार नव्हते.... कारण महादेवी सर्वसामान्यांमधे मिसळत होत्या, त्यांच्या सुखदुःखात सहभागी होत होत्या.... या पहिल्याच राणी होत्या, ज्यांनी जनसंपर्क, राज्यकारभारात लक्ष घातले होते. विविध कला, अभ्यास, नृत्यनाट्यशाळा, शिल्पविद्यालये, मुलींच्या शिक्षण-प्रशिक्षणाची केंद्रे उभी केली आणि यशस्वी रीत्या चालवली. शिक्षण देण्यापासून तर अर्थव्यवस्थेपर्यंत संपूर्ण विभागांवर बारकाईने नजर ठेवली होती. त्यांच्या अखत्यारीतून न्यायशास्त्रदेखील सुटले नव्हते. स्वत:च्या धर्माला त्यांनी सोडले नव्हतेच, तर प्राणपणाने धर्माचरण-धर्माभ्यास करूनही इतर धर्मांचा सुद्धा तेवढाच आदर आणि सन्मान केला होता. युद्धक्षेत्र देखील त्यांना वर्ज्य नव्हते! रणांगणावर तलवार चालविण्यात त्या तरबेज होत्याच, सोबतच युद्धनीती आखणे, युद्ध तयारी, शस्त्रात्रांचे कारखाने काढणे, सतत नव्या दमाचे प्रशिक्षित तरुण तयार करणे, गुप्तहेर खाते मजबूत करणे ही राज्याशी संबंधित कामे त्या स्वतः हाताळत असल्याने सन्निधान महिनो न् महिने राज्यविस्ताराच्या कामांवर निश्चिंतपणे जाऊ शकत होते.

अबोध वयात युवराज बिट्टिदेव आणि देवी शांतला हे एक दुसऱ्यात हरवले होते... आणाभाका घेतल्या नसल्या, तरी मनोमन त्यांनी एकमेकांना वरले होते. बिट्टिदेव हे प्रथम पुत्र नसल्याने राजपदाशिवायच्या साध्यासरळ जीवनाची अपेक्षा दोघांनीही बाळगली होती. मात्र त्यांच्या लग्नाकरिताच अनेक अडचणी उभ्या ठाकल्यात... विनाकारण शांतलादेवींना पाण्यात बघण्यात आले... तरीदेखील कोणताही कटुपणा न बाळगता सगळ्या परिवाराला एकत्र जोडून ठेवण्यात त्या यशस्वी झाल्या.

नंतर स्वतःच्याच जीवनात सवतसुभा मांडावा लागला... तो पण मान्य केला. वयाच्या अवघ्या एकोणतिसाव्या वर्षी, संसारात सवतींच्या पदार्पणापासून त्यांनी ब्रह्मचर्यव्रताचे पालन केले, सर्व सवतींना धाकट्या बहिणींप्रमाणे वागणूक दिली.... सतत सवतीमत्सराला बळी पडूनही एका अवाक्षराने तक्रार केली नाही..... सवतीच्या पुत्राचे स्वागतही तितक्याच आपुलकीने केले.

सर्वात मोठे तुटून जाणे तर सन्निधानांच्या धर्मपरिवर्तनामुळे वाट्याला आले होते... जीवतोड प्रयत्न करून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला होता परंतु...... अपयश आले, तेही हसतमुखाने स्वीकारले. मात्र तेथूनच अंतर्मुखता वाढली होती... कदाचित जीवनदिशा ठरली होती. धर्मपरिवर्तना-साठी दबाव आला होता... जिच्या प्रत्येक कृतीत, प्रत्येक कार्यात धर्म व्यापून होता, ती स्वतःचा धर्म कसा त्यागू शकणार होती? शेवटपर्यंत जैनत्वाशी एकनिष्ठ राहून राजकार्यात उणीव केली नाही...दोन्ही मुलांची सोयरीक जैन कुटुंबातच जुळविली... धाकट्या दोघांनाही धर्माचे, परिस्थितीचे संस्कार दिले.

असे सर्व कर्तव्य पार पाडून, मुले जाणती झाल्यानंतर आता आपले जीवन कोणी जबरदस्तीने संपविण्यापेक्षा, स्वतः होऊन पुढे जाऊन अभ्यासपूर्ण रीतीने, परिणामांची शांती आणि विशुद्धी गाठत सल्लेखनापूर्वक संपविले! महादेवी मृत्युंजय ठरल्या...!!

एका दूरदृष्टी, धोरणी, सुसंस्कृत, सरस्वती व लक्ष्मीचे एकत्रित रूप अशा सर्वगुणसंपन्न व्यक्तिमत्त्वाला होयसळ राज्याने कायमचे गमावले....!

**लेखमाला समाप्त**

✻✻✻✻✻

# पट्टमहादेवी शांतला— शब्दांपलिकडला अन्वयार्थ असा साकार झाला!

प्रिय वाचकहो,

गत पावणेतीन वर्षांपासून सन्मति मासिकात प्रकाशित होत असलेल्या पट्टमहादेवी शांतला या सुदीर्घ लेखमालेची या अंकात सांगता होत आहे. लेखिका नागपूर निवासी श्रीमती विपुल खेडकर यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक हे ऐतिहासिक कथानक वाचकांसमोर प्रस्तुत केले आहे. अनेक वाचकांनी फोन किंवा पत्रांद्वारे या मालिकेला आपली पसंतीची प्रतिक्रिया कळवली आहे.

मूळ कन्नड व नंतर भाषांतरित हिंदी कादंबरीचा ऐवज चांगला ऐसपैस २००० पानांचा! चार खंडांत प्रसिद्ध झालेला!! त्याचा मराठीत संक्षिप्त अनुवाद करणे.... सलग नव्हे तर, लेखमालेच्या रूपात करणे... कथानकाचा रसभंग न होता दर्जा, प्रवाहीपणा व उत्सुकता टिकवून ठेवणे....मासिकासाठी वेळेची मर्यादा काटेकोरपणे पाळणे... इत्यादी बाबी अशक्य कोटीतील नसल्या, तरी कष्टसाध्य नक्कीच म्हणाव्या लागतील! विशेषतः एका गृहिणीसाठी!! या लेखन कौशल्यासाठी व अथक मेहनतीसाठी विपुलताईचे मन:पूर्वक अभिनंदन! पुढील लेखन संकल्पांच्या सिद्धीसाठी अनेक हार्दिक शुभेच्छा!!

या ऐतिहासिक लेखन प्रवासाविषयी विशेष माहिती देण्याची आमची विनंती मान्य करून विपुलताई व त्यांच्या मुलांनी आपले जे हृद्य मनोगत व्यक्त केले आहे, ते येथे प्रस्तुत करीत आहोत......

---संपादक

# शांतलेच्या पाऊलखुणा आणि माझी लेखनवाट!

गेल्या पाच वर्षात माझ्या मनाला व्यापून टाकणारी एक मोठी व्यक्तिरेखा म्हणजे पट्टमहादेवी शांतला ! सर्वप्रथम शांतलादेवींची ओळख झाली, प. पू. मुनिश्री प्रशमसागर महाराजांकडून, एक न्यायशास्त्र पारंगत जैन राणी म्हणून ! नंतर ती विस्मरणात जाणार तोच आद. श्री. चंद्रमोहनदादा शहा (सोलापूर) यांनी पट्टमहादेवी शांतला या हिंदी महाकादंबरीचे संपूर्ण चारही भाग पाठविले. वाचनात रमणाऱ्या मला या पुस्तकांनी मोहित केले. हिंदी साहित्याचे फारसे वाचन नसणारी मी, या अवजड आणि शब्दबोजड असणाऱ्या पुस्तकांमधे रमून गेले. एकदा वाचून समाधान वाटले नाही तर काही भाग पुन्हा पुन्हा वाचला आणि माझ्याकडून ज्याला त्याला ही पुस्तके वाचनाकरिता सुचविली जाऊ लागली. माझ्यासारखीच या पुस्तकांची मोहिनी ऐंशी पार असलेल्या माझ्या आईवर पण पडली....आणि आता मला शांतलेला मराठी भाषेत प्रस्तुत करण्याचे स्वप्न पडू लागले. दोन हजार पानेस कन्नड प्रचुर नावे व शब्दावली, चार पिढ्यांची उलगडत जाणारी कथा...! ही केवळ गोष्टच नाही, तर एक उभरते राज्य, जैन धर्माची उंच फडकती पताका, याच धर्माला पुढे लागलेली ओहोटी, त्याकरिता निर्माण झालेली/केलेली परिस्थिती...इ. सर्व मुद्दे आपल्याला योग्य रीतीने, योग्य शब्दांत हाताळता येईल कां?....मन शंकेने ग्रसित होते. परंतु आद. चंद्रमोहन दादांचे प्रोत्साहनपर पत्र/फोन, तसेच आद. प्रज्ञाताई डोणगांवकर, कारंजा लाड (सन्मति मासिकाच्या संपादक मंडळाच्या सदस्या) यांचे पाठबळ आणि विश्वासपूर्ण शब्द जादू करायचे! मन म्हणायचे, करून तर बघू या प्रयत्न....!!

|| न धर्मो धार्मिकैर्विना || || तं गोम्मटेसं पणमामि णिच्चं || || उन्नतं मानसं यस्य भाग्यं तस्य समुन्नतं ||

ज्ञानेन पुंसां सकलार्थसिद्धिः।

# श्री बाहुबली ब्रह्मचर्याश्रम व विद्यापीठ, बाहुबली (कुंभोज)

ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

## श्री १००८ भ. बाहुबली महामूर्ती

# महामस्तकाभिषेक

## तथा नंदीश्वरद्वीप प्रतिष्ठा महोत्सव २०२७

**पौष शुद्ध १, शुक्रवार दि. ०८ जनवरी २०२७ से**
**पौष शुद्ध ५, बुधवार दि. १३ जनवरी २०२७**



## अग्रिम निवेदन पत्रिका

मंगल प्रेरणास्थान



चारित्रचक्रवर्ती आचार्य
१०८ श्री शांतिसागरजी महाराज

* शुभाशीर्वाद *




गुरुदेव समंतभद्र महाराजजी के दीक्षागुरू मुनिराज श्री १०८
श्री वर्धमानसागर महाराज

श्वेतपिच्छाचार्य १०८
श्री विद्यानंद महाराज

संतशिरोमणी आचार्य १०८
श्री विद्यासागर महाराज

प.पू. शांतमूर्ति वात्सल्यरत्नाकर आचार्य १०८
श्री सन्मतिसागरजी महाराज

गुरुकुल संस्थापक



प. पू. गुरुदेव १०८
श्री समंतभद्रजी महाराज




कुशल नेतृत्व

युवासम्राट, क्रांतीरत्न, प्रवचन केसरी, संतवात्सल्यनिधि,
जिनवाणी कंठभूषण, सम्यक् रत्नाकर, ज्ञान दिवाकर प.पू. १०८
**आचार्य श्री चंद्रप्रभसागरजी महाराज**



मंगल निर्देशन

प.पू. स्वस्तिश्री जिनसेन भट्टारक
पट्टाचार्य महास्वामीजी, नांदणी मठ



मंगल निर्देशन

प.पू. स्वस्तिश्री लक्ष्मीसेन भट्टारक
पट्टाचार्य महास्वामीजी, कोल्हापूर मठ

**शुभ स्थान :** श्री अतिशय क्षेत्र बाहुबली (कुंभोज) जि. कोल्हापुर (महाराष्ट्र) इस पावन तीर्थभूमि पर

सद्धर्मप्रेमी श्रावक-श्राविका, सादर जय जिनेन्द्र !

बीसवीं सदी के प्रथमाचार्य चारित्रचक्रवर्ती आचार्य १०८ श्री शांतिसागरजी महाराजजी की शुभआज्ञा से प्रात:स्मरणीय परमपूज्य गुरुदेव १०८ श्री समंतभद्रजी महाराजजी ने सन १९६३ में २८ फिट उंचाईवाली विशालकाय भगवान बाहुबली की बृहन्मूर्ति प्रतिष्ठापित करवाई। आज उसे ६३ वर्ष पुरे हो रहे है। साथ ही श्री अतिशय क्षेत्र बाहुबली इस पावन तीर्थधरा पर आषाढ शुद्ध द्वितीया, दि. १३ जुलै १९३४ से प्रचलित गुरुकुल शिक्षा संस्था को ९२ वर्ष पूर्ण हो चुके है।

प्रतिद्वादश वर्ष में होनेवाला इस बृहन्मूर्तीका महामस्तकाभिषेक जनवरी २०२७ में किया जा रहा है। इससे पूर्व फरवरी १९६३, फरवरी १९७०, अप्रैल १९८९, फरवरी २००१ तथा फरवरी २०१५ में महामस्तकाभिषेक संपन्न हुए है। अब आगे जनवरी २०२७ का महामस्तकाभिषेक अनेक आचार्य के ससंघ तथा अनेक भट्टारक स्वामीजी के आशीर्वाद और सानिध्य में संपन्न होने जा रहा है। अत: आप सबसे अनुरोध है कि, इस महन्मंगल भव्य एवं दिव्य महामस्तकाभिषेक में सम्मिलित होकर पुण्योपार्जन करके मानव जन्म को सार्थक किजिए, ऐसी मंगल शुभकामना....!!

## प्रायोजित मांगलिक कार्यक्रम की रूपरेषा

पौष शुद्ध १, शुक्रवार दि. ८ जनवरी २०२७ – धर्मध्वजारोहण, मंडप उद्घाटन
पंच परमेष्ठी विधान (आश्रम मळा मंदिर), यागमंडल विधान

पौष शुद्ध २, शनिवार दि. ९ जनवरी २०२७ – नंदीश्वर विधान

पौष शुद्ध ३, रविवार दि. १०जनवरी २०२७ – पंचमेरु विधान तथा नंदीश्वर द्वीप प्रतिष्ठा, मौजीबंधन

पौष शुद्ध ३, सोमवार दि. ११ जनवरी २०२७ – आदिनाथ विधान प्रथम दिवसीय महामस्तकाभिषेक

पौष शुद्ध ४, मंगलवार दि. १२ जनवरी २०२७ – श्रुतस्कंध विधान द्वितीय दिवसीय महामस्तकाभिषेक

पौष शुद्ध ५, बुधवार दि. १३ जनवरी २०२७ – गणधर वलय विधान तृतीय दिवसीय महामस्तकाभिषेक

(प्रतिदिन प्रात:काल भ. बाहुबली का चरणाभिषेक, मध्याह्न में विविध चर्चासत्र व त्यागीयों का उपदेश तथा रात्री में सांस्कृतिक कार्यक्रम होंगे।)

## महामस्तकाभिषेक के कलश

| कलश का नाम | पहिला दिन : (११/०१/२०२७) श्रावक मर्यादा (७) | दुसरा दिन : (१२/०१/२०२७) श्रावक मर्यादा (७) | तिसरा दिन : (१३/०१/२०२७) श्रावक मर्यादा (७) |
|---|---|---|---|
| ०१) नारियल अभिषेक | ७५,०००/- | ५१,०००/- | ५१,०००/- |
| ०२) ईक्षुरसाभिषेक | १,२५,०००/- | १,०८,०००/- | १,०८,०००/- |
| ०३) घृताभिषेक | ७५,०००/- | ५१,०००/- | ५१,०००/- |
| ०४) दुग्धाभिषेक | १,५१,०००/- | १,२५,०००/- | १,२५,०००/- |
| ०५) सर्वौषधी अभिषेक | ७५,०००/- | ५१,०००/- | ५१,०००/- |
| ०६) कल्कचूर्ण अभिषेक | ७५,०००/- | ५१,०००/- | ५१,०००/- |
| ०७) कषायचूर्ण अभिषेक | ७५,०००/- | ५१,०००/- | ५१,०००/- |
| ०८) हरिद्राभिषेक | ७५,०००/- | ५१,०००/- | ५१,०००/- |
| ०९) कुंकुम अभिषेक | ७५,०००/- | ५१,०००/- | ५१,०००/- |
| १०) श्वेतचंदनाभिषेक | १,५१,०००/- | १,२५,०००/- | १,२५,०००/- |
| ११) पुष्पवृष्टी | ५१,०००/- | ५१,०००/- | ५१,०००/- |
| १२) शांतिधारा | १,५१,०००/- | १,२५,०००/- | १,२५,०००/- |

# जलाभिषेक कलश की सद्दानराशी


| कलश का नाम | निश्चित दानराशी | कलश संख्या | श्रावक मर्यादा |
|---|---|---|---|
| १) द्वादश वर्षीय कलश | ११,११,१११/- | ३ | २० |
| २) पंच परमेष्ठी कलश | ५,००,१११/- | ६ | १५ |
| ३) रत्नत्रय कलश | २,५१,१११/- | ९ | १२ |
| ४) अमृत कलश | १,११,१११/- | १२ | १० |
| ५) सुवर्ण कलश | ७५,१११/- | १५ | ८ |
| ६) रजत कलश | ५१,१११/- | १८ | ७ |
| ७) पद्म कलश | २५,१११/- | २१ | ६ |
| ८) शांतिकलश | ११,१११/- | २४ | ५ |
| ९) भद्र कलश | ५,१११/- | - | ४ |
| १०) मंगल कलश | २,५११/- | - | ३ |
| ११) समृद्धी कलश | १,१११/- | - | २ |

## * प्रमुखपात्र *

| | |
|---|---|
| * प्रथम दिवस मुख्य ध्वजारोहण | १,०८,०००/- |
| * प्रतिदिवस ध्वजारोहण | ५१,०००/- |
| * प्रथम तीन दिन के दीपप्रज्वलनकर्ता | ५१,०००/- |
| * प्रथम तीन दिन के मंगलकलश स्थापना | ५१,०००/- |
| * उपनयन संस्कार (मौजी बंधन) | २,१००/- |
| * प्रतिविधान | १,५००/- |
| **नंदीश्वर प्राण प्रतिष्ठा-** | |
| * सौधर्म इंद्र-इंद्राणी- | ७,००,०००/- |
| * ईशान इंद्र - | ५,००,०००/- |
| * सुवर्ण सौभाग्यवती- | २,५१,०००/- |
| * महायज्ञनायक - | २,५१,०००/- |
| * अष्टकुमारिका - | ५१,०००/- |
| * आश्रम मळा मंदिर इंद्र-इंद्राणी- | १,००,०००/- |

## भावी योजनाऐं

### नूतन छात्रावास





### नूतन यात्रीनिवास व्ही.आय.पी.



### नूतन यात्रीनिवास


Proposed Yatri Sankul, for Bahubali Brahmacharyashram, Bahubali.

### अहिंसा उद्यान



**विशेष सूचना :-**

१) बाहर से पधारनेवाले श्रावकों की आवास एवं शुद्ध भोजन की समुचित व्यवस्था क्षेत्र पर है।
२) मस्तकाभिषेक तथा विधानकर्ताओं को शुद्ध वस्त्र परिधान करना अनिवार्य है।

इस धर्म-ज्ञानयज्ञ में आप सादर आमंत्रित हैं। आपकी गरिमामयी उपस्थिति इस देव-शास्त्र-गुरु के यज्ञ को अलंकृत करेगी। परमपूज्य गुरुदेव श्री समंतभद्र महाराजजी ने १९३४ में अत्यंत प्रतिकूल भौगोलिक परिस्थितियाँ, आर्थिक विषमताऐं होते हुए भी बाहुबली ब्रह्मचर्याश्रम इस गुरुकुल की संस्थापना की तथा चारित्रचक्रवर्ती आचार्य श्री शांतिसागरजी महाराजजी के शुभसंकल्प की सिद्धी हेतु भगवान बाहुबली की भव्य-दिव्य प्रतिमा की प्रतिष्ठापना की। ऐसे संस्कारों की पवित्र परंपरा को आगे बढाने के लिए आयोजित इस धर्मयज्ञ में आप सभी तन-मन-धन से सहयोग प्रदान करे। अतः आपसे अनुरोध है कि, इस भक्तिगंगा में पधारकर पुण्योपार्जन करते हुए अपना मानव जन्म सार्थक करे।

## बँक विवरण

Mahamastakabhishek Mahotsav
SCAN TO PAY

**Bank Account Details :**
Name : Bhagawan Bahubali Mahamastakabhishek Mahotsav 2027
Bank Name : Kallappanna Awade Ichalkaranji Janta Sahakari Bank Ltd.
Current A/c No. : 042002300000013
IFSC Code : KAIJ0000042
Mob No. 9049473434

* संपर्क : ब्र. अस्मिता दीदी : ९९२२३४१००८
* प्रतिष्ठाचार्य श्री. सम्मेद उपाध्ये : ९९२२७०१००८
* डॉ. नेमिनाथ शास्त्री : ९४२०७७६६३१

## निवेदक

**अरविंदजी दोशी**
विश्वस्त-अध्यक्ष,
श्री बाहुबली ब्रह्मचर्याश्रम व विद्यापीठ

**प्रकाशराव आवाडे**
अध्यक्ष,
श्री बाहुबली विद्यापीठ

**सनत्कुमार आरवाडे**
अध्यक्ष,
श्री बाहुबली ब्रह्मचर्याश्रम

**धनराज बाकलीवाल**
उपाध्यक्ष,
श्री बाहुबली ब्रह्मचर्याश्रम

**डी. सी. पाटील**
महामंत्री,
श्री बाहुबली ब्रह्मचर्याश्रम व विद्यापीठ

**गोमटेश बेडगे**
संचालक,
श्री बाहुबली ब्रह्मचर्याश्रम व विद्यापीठ

**बाबासाहेब पाटील**
कोषाध्यक्ष,
श्री बाहुबली विद्यापीठ

**डॉ. बाळासाहेब चोपडे**
कोषाध्यक्ष,
श्री बाहुबली ब्रह्मचर्याश्रम

श्री बाहुबली विद्यापीठ, बाहुबली — शील ज्ञान व्यवस्था सेवा प्रेम — ज्ञानेन पुंसां सकलार्थसिद्धिः।

**समस्त पदाधिकारी व सदस्य, विश्वस्त व कार्यकारी मंडळ,**
**श्री बाहुबली ब्रह्मचर्याश्रम व विद्यापीठ, बाहुबली**
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर (महाराष्ट्र), मो.नं. : +९१ ९०४९४७३४३४
E-Mail - bahubalividyapeeth1963@gmail.com, Website : www.bahubalividyapeeth.org

## पत्रिका सौजन्य


माणसांच्या मनांना विणणारी बँक
**कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता सहकारी बँक लि.,**
मल्टीस्टेट शेड्युल्ड बँक

शुभाशीर्वाद — आमची प्रेरणा — चेअरमन



आदरणीय कल्लाप्पाण्णा आवाडे (दादा), माजी खासदार व उद्योग मंत्री, महाराष्ट्र राज्य
आमदार प्रकाशआण्णा आवाडे, माजी वस्त्रोद्योग मंत्री, महाराष्ट्र राज्य
श्री. स्वप्निलदादा आवाडे

कोल्हापूर जिल्ह्यातील अर्बन को-ऑप. बँकातील अग्रेसर बँक
**KAIJS BANK**

**प्रधानमंत्री रोजगार निर्मिती योजना (PMEGP)**
नव उद्योग व नव व्यवसाईकांसाठी व्याजदर
कर्जमर्यादा
उत्पादन क्षेत्राकरीता रु. ५० लाखापर्यंतच्या प्रकल्पाकरिता
सेवा क्षेत्राकरीता रु. २० लाखापर्यंतच्या प्रकल्पाकरिता
शैक्षणिक पात्रता ८ वी पास । १८ वर्षांवरील स्त्री पुरुषांकरिता
परतफेडीची मुदत ३ ते ७ वर्षापर्यंत । कुटुंबातील फक्त एकाच व्यक्तीसाठी

शासकीय अनुदान (सबसिडी)

| विभाग | जनरल | महिला/अनुसुचित जातीजमाती/अपंग/अल्पसंख्यांक/इतर मागासवर्गीय |
|---|---|---|
| ग्रामीण | २५% | ३५% |
| शहरी | १५% | [illegible] |



बँकेच्या विविध कर्ज योजना
'सावली' गृह कर्ज योजना
शेती कर्ज योजना
'ज्ञानसाधना' शैक्षणिक कर्ज योजना
डॉ.,सीए, इंजि. व्यावसाईक कर्ज योजना
आण्णासाहेब पाटील महामंडळ कर्ज योजना
सोने तारण कर्ज योजना
ठेवीवर आकर्षक व्याजदराच्या विविध योजना
'ॲग्री सावली' कर्ज योजना
'पुष्पक' वाहन कर्ज योजना
'गृहसजावट' कर्ज योजना
'प्रधानमंत्री' रोजगार निर्मिती कर्ज योजना
स्थावर व मशिनरी तारण कर्ज योजना
महाराष्ट्र राज्य इतर मागास. वित्त आणि विकास महामंडळ
महाराष्ट्र व कर्नाटक राज्यात ५५ शाखांसह कार्यरत

अगदी सुरुवातीला, दुसराच भाग प्रकाशित झाला, त्यावेळी कोल्हापूरहून एक फोन आला.. स्वतःचा फोन नसणारी एक वयस्क व्यक्ती नातवाच्या फोनवरून बोलत पट्टमहादेव लेखनाचे कौतुक करीत होती, त्यानंतर त्यांचा कॉलेजमध्ये शिकणारा नातूही बोलला. त्याने देखील लेख आवडल्याचे आणि सन्मतिचा नियमित वाचक असल्याचे सांगितले आणि मला मी निवडलेल्या विषयाची पोचपावती मिळाली!

**सी. के. नागराजराव** हे कन्नड साहित्य अकादमीचे दोन वेळा पुरस्कार प्राप्त श्रेष्ठ साहित्यकार! रंगमंच अभिनेता, निर्देशक आणि चित्रपटांचे पटकथालेखक देखील! भारतीय ज्ञानपीठद्वारा 'मूर्तिदेवी पुरस्काराने' सन्मानित! पट्टमहादेवी शांतला या चार भागांत असणाऱ्या प्रदीर्घ कादंबरीचे बीज त्यांच्या मनात रोवून पूर्ण फलित होऊन, वृक्ष होऊन डोलू लागायला तब्बल पन्नास वर्षांहून अधिक काळ लागला! बरेच परिश्रम त्यांनी घेतले, ऐतिहासिक तथ्ये तपासली, त्यात स्वतःची कल्पकता मिसळली तेव्हा ही कादंबरी अनेक अडचणींना मागे टाकत वाचकांच्या हाती आली. कर्नाटकची जनता त्याची अक्षरशः पारायणे करू लागली, भाषांतरकारांच्या उड्या पडू लागल्या.

**श्रवणबेळगोळाचे तत्कालीन भट्टारक श्री. चारुकीर्ती स्वामीजींची अचूक पारखी नजर या ग्रंथावर पडली आणि त्याचे हिंदी भाषांतर पी. वेंकटाचल शर्मा यांच्याद्वारे करवून दानवीर श्री. साहू श्रेयांसप्रसादजी द्वारा भारतीय ज्ञानपीठाद्वारे याचे प्रकाशन केले.**

एका इतिहास प्रसिद्ध व्यक्तीचे कार्यकर्तृत्व लोकांसमोर आणतांना कादंबरीवर पूर्ण विसंबायचे का, हा एक मोठा प्रश्न माझ्यासमोर होता. तसे माझे गुगल द्वारे शोधकार्य सुरूच होते. याच सुमारास छ. संभाजीनगर येथील इतिहासाचे प्रोफेसर श्री. रुपेश मडकर सरांशी परिचय झाला. त्यांनी या विषयाशी संबंधित इतिहास परिषदांमधे मान्यता प्राप्त संशोधन पेपर्स आणि लिंक्स मला पाठवल्या. इंग्रजीशी फारसं सख्य नसतांना या मावशीशी मी भाचीचे नाते जोडून बऱ्याच गोष्टी त्यातून शिकले. कादंबरीतील प्रसंग आणि पेपर्स मधील संशोधन यांचा मेळ घालण्याचा प्रयत्न करून सत्यांश तेवढा माझ्या भाषेत लेखात आणण्याचा प्रयत्न केला. शब्दविस्ताराला प्रथमपासूनच आटोक्यात ठेवले.

लेखक अन्यधर्मीय असल्या कारणाने कादंबरीत शांतलादेवींचे विचार म्हणून दर्शविण्यात येणाऱ्या बाबी मला विशेष खटकत असत. जैन न्यायशास्त्राचा सखोल अभ्यास असणारी, आ. प्रभाचंद्र सिद्धांतीदेवांची शिष्या असा विचार नक्कीच करणार नाही हे जाणवायचे....म्हणूनच मला अस्वस्थता जास्त वाटायची!

कादंबरीकार स्वतःचे विचार पात्रांच्या मार्फत व्यक्त करण्यास स्वतंत्र असतो, परंतु त्याद्वारे अन्य धर्मीय विचार चुकीचे प्रसारित होतात, याची कदाचित जाणीव होत नसावी. जसे की- सगळ्यांचा कर्ता-हर्ता ईश्वर आहे, तोच तारणहार आहे, सृजनहार आहे इ.

मराठी भाषेत शांतलादेवींबद्दल चार पुस्तके प्रसिद्ध आहेत. ती बहुतांशी कन्नड साहित्याचा अनुवाद असणारी आहेत. त्यातील एक मी वाचले. या पुस्तकामधे शांतलादेवींनी आत्महत्या केली आणि त्या संतानविरहित होत्या असे वर्णन आढळते. मात्र अनेक रिसर्च पेपर्समध्ये याला चुकीचे ठरवून त्यांना चार मुले (तीन मुले व एक मुलगी) होती, हे सिद्ध केले आहे. तसेच त्यांनी आत्महत्या केल्याचेही चुकीचे असल्याचे सांगितले आहे.

कन्नड कवी बोकिमय्या यांचे होयसळ घराण्यावरील आणि विशेषतः शांतलादेवींच्या सल्लेखनापूर्वक मरणाबद्दलचे विस्तृत काव्य श्रवणबेळगोळ येथील चंद्रगिरी पहाडावर शांतिनाथ बसदिच्या बाजूला असणाऱ्या स्तंभावर पूर्व आणि दक्षिण बाजूने कोरले आहे. यात शेवटी लिहिले

आहे. – ‘शक वर्ष १०५० मूरेनेय विरोधि कृत्संवत्सरद चैत्र शुद्ध पंचमी सोमवारदंदु सिवगंगेय तीर्त्थ दलु मुडि पि स्वर्गतेयावळु ।’ अर्थात आधी सहा श्लोकांमधे शांतलादेवींचे वर्णन करून कवी शेवटी लिहितात, ‘शक वर्ष १०५० विरोधिकृत संवत्सर मधे चैत्र शुद्ध पंचमी सोमवार दिवशी शिवगंगा क्षेत्रामध्ये देहाचा त्याग करून स्वर्गाला प्राप्त झाली.’ यात उल्लेख केल्याप्रमाणे ‘देह त्यागकर’, तसेच ‘स्वर्ग’ या शब्दांतून तिने आत्महत्या केली नसून सल्लेखनापूर्वक देह त्यागला आहे, हे स्पष्ट होते.

कदाचित या काही कारणांमुळे मला या विषयावर लेखन करण्याची उर्मी टाळता आली नसावी. या अगोदरही मी तीन मोठ्या ग्रंथांना (पद्मपुराण, चारित्रचक्रवर्ती, सोलहकारण भावना) आजच्या सोप्या भाषेत सर्वांसमोर मांडण्याचा यशस्वी प्रयोग केला होता. म्हणूनही परत एकदा यात उतरण्याचा निश्चय झाला असावा. मात्र यावेळी माध्यम बदलले होते. मासिक सन्मतिसारख्या विशिष्ट दर्जा प्राप्त मासिकात लेखन करताना आपल्या लेखनाची पातळी ती उंची गाठेल कां याबद्दल मनात साशंकता होती... मात्र आ. प्रज्ञाताई पाठीशी असल्यावर आपोआपच लेखणी तशीच लिहू लागली, हे पूर्णपणे त्यांचे श्रेय मी त्यांना अर्पण करू इच्छिते.

आणखी एक, **मासिक सन्मतिचे संस्थापक संपादक श्रद्धेय श्री. माणिकचंदजी भिसीकर गुरुजी (माझ्या आईचे काका)** यांच्या सहवासात फारच थोडा काळ का होईना, राहण्याचा योग मला माझ्या आईमुळे प्राप्त झाला होता. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे, भाषेचे, ज्ञानाचे तेजोवलय मी अनुभवले होते. त्यामुळे सन्मतिमध्ये मला लिहिण्याची मिळालेल्या संधीमुळे ही लेखमाला माझ्याकडून पूर्णत्वाला जाईल, असा विश्वासही वाटत होता.

होयसळ साम्राज्याचा विस्तार करण्यात महाराज बिट्टीदेव म्हणजेच विष्णुवर्धन यांचे मोठे योगदान ! राज्यविस्तार तर अनेकजण करतात, परंतु साम्राज्य त्यांचेच टिकते जे सुव्यवस्थित व्यवस्थापनावर कार्यरत असते, सर्वसामान्य माणसाला जेव्हा राज्याबद्दल आस्था असते. न्याय, अर्थ, शांतता, महिलांना स्वातंत्र्य, शिक्षण, शेती, उद्योग, तरुण हातांना काम मिळते, तेव्हा राज्य प्रदीर्घ काळ टिकते. सखोल विचार करून राज्यकारभार सांभाळणाऱ्या राणी शांतलादेवी ज्ञानी, दूरदृष्टी होत्या, कामाची घडी बसवण्यात त्यांचा हातखंडा होता. वैयक्तिक जीवन आणि राजकारण या दोन्ही ठिकाणी त्या सहजतेने वावरू शकत होत्या.

आयुष्यात अनेक कटू प्रसंगांना सामोरे जावे लागले तरी त्यांची स्थितप्रज्ञता भंगली नाही. संसाराची सुरुवात तर प्रेमविवाहाने झाली, पण नंतर सवतींसोबत तडजोड करावी लागली. ज्या धर्मावर स्वतःच्या प्राणांपेक्षा जास्त विश्वास, त्या धर्मापासून पतीला विमुख होतांना बघून त्यांच्या मनाला किती यातना झाल्या असतील?.... तरी राज्याची घडी बिघडू न देता मुलांना तयार करणे, सर्व व्यवस्था हाती असतांना त्यातून निर्मोही मनाने स्वतःला अलिप्त करणे, मनुष्य जन्माचे अंतिम ध्येय साधणे... तेही वयाच्या अवघ्या चाळीशीत....हे आणि असे भुरळ घालणारे शांतलादेवींच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक कंगोरे मला भावले, इतर राण्यांपेक्षा वेगळे वाटले म्हणून ही लेखमाला साकार झाली.

सन्मति मासिकाचे मुख्य संपादक डॉ. नेमिनाथ बाळीकाई शास्त्री आणि संपादक मंडळ यांनी मला लिहिण्याची संधी दिली, याबद्दल सर्वांना धन्यवाद देते. तसेच विविध अभिप्रायांनी प्रोत्साहित करणाऱ्या वाचकांना धन्यवाद देते आणि या मालिकेला विराम देते.

**– विपुल नरेश खेडकर,**
नागपूर

# माझ्या आईचा शांतलेसोबतचा प्रवास

**१)**

चार-पाच वर्षांपूर्वीची गोष्ट! आईचा नेहमीप्रमाणे फोन आला आणि मला सांगायला लागली, 'अगं, आज मी एक खूप सुंदर चरित्र वाचले!' कोणते पुस्तक याची चौकशी केल्यानंतर तिच्या नेहमीच्या सवयीप्रमाणे तिने मला पूर्ण गोष्ट सांगितली. कहाणी होती दक्षिण भारतातल्या एका असामान्य राणीची, शांतलादेवीची!

रोजच्या स्वाध्यायात वाचलेल्या, प्रवचनात ऐकलेल्या, तिला आवडलेल्या गोष्टी लहानपणा-पासूनच आम्हा दोघाही भावंडांना रात्री झोपताना रंगवून सांगण्याची तिला संवय होती.

गोष्ट सांगण्याचा हा प्रवास लॉकडाऊनमध्ये काहीसा बदलला. गोष्ट सांगण्याऐवजी तिचा हात आता लिहिता झाला होता. फेसबुकवर आता ती लिहायला लागली होती. प्रथमानुयोगातील अनेक गोष्टी लेखमालेच्या रूपात तिच्या पेजवर आल्यात.

असं म्हणतात ना की, वेळ आल्याशिवाय लेखक जन्माला येत नाही. आपल्याला माहित असलेली एखादी गोष्ट कुणाला तरी सांगण्याची प्रबळ उर्मी जेव्हा दाटून येते, त्यावेळीच त्या व्यक्तीकडून उत्तम लिखाण होत असते.

याच लिखाणाच्या कालखंडामध्ये तिच्या हातात शांतलेची चरित्र-कादंबरी आली....आणि तोवर क्वचितच झालेल्या नामोल्लेखाने शांततेला ओळखणारी आई तिच्या अफाट कर्तृत्वाने जणू भारावून गेली! शांतलेचे हे चरित्र म्हणजे जवळजवळ २००० पानांची हिंदीतील कादंबरी होती. हिंदी वाचन फारसे न करणारी आई, पण या कादंबरीच्या आणि शांतलेच्या प्रेमातच पडली! ती कहाणी आम्हा हक्काच्या श्रोत्यांना सांगून झाली, आजीला पुस्तक वाचायला लावले... तरीदेखील तिच्याकडे दोन अंगुळे काहीतरी उरतच होते.....मग तिने ही गोष्ट तिच्या शब्दांत लिहायला सुरुवात केली!

मला असं वाटतं की, शांतला तिला इतकी जास्त भावली, याचे कारण शांतलेचे कणखर व्यक्तिमत्त्व! आयुष्यात सिंड्रेला स्टोरी असावी, त्याप्रमाणे चक्क राजकुमाराने प्रेमात पडून सगळ्यांच्या विरोधाला डावलून तिच्याशी लग्न करणे असो... आपल्या हुशारीने-कर्तृत्वाने छोट्याशा राज्याचे साम्राज्यात रूपांतर करणे असो.... त्या वैभवशाली साम्राज्याची राणी म्हणून राहतानाच कधीकाळी तिचा प्रियकर असलेल्या पतीने दुसरे विवाह करणे असो.... नवऱ्याकडून झालेली प्रतारणा एका बाजूला ठेवून राज्याप्रति असलेले आपले महाराणी पदाचे कर्तव्य, राज्यकर्त्यांचे कर्तव्य तिने कधीच बाजूला सारले नाही!

जिनधर्माची आराधना कधी आपल्या जीवनातून वगळली नाही.... जीवनातील सुख-दुःखांच्या प्रसंगी आपल्या आचरणात तिने कधीही खोट आणली नाही. शांतलेचे राज्यकार्य, धर्मकार्य आणि तिचे जीवन हा सगळाच अचंबित करणारा प्रवास आहे.

लिखाणाला सुरुवात केल्यानंतर लक्षात आले की, केवळ एका कादंबरीवर भिस्त ठेवून हे लिखाण होणे नाही! शांतलेच्या संदर्भातील ऐतिहासिक तथ्ये पडताळून बघण्यासाठी चक्क तिने इंग्रजी भाषेतील कॉन्फरन्सेस ऑनलाइन अटेंड केल्या. एकाच्या संदर्भाने दुसरी... मग तिसरी अशी आधी झालेली चर्चासत्रे ऐकली, सारांश वाचले. संशोधनाशी आधी कधीही संबंध न आलेली आई आता चक्क शोधनिबंध, त्यांचे सारांश वाचायला लागली होती.....!

बरे एव्हढी तयारी करून एव्हढी मोठी कथा

मालिका आपण लिहू शकू का, ही शंका होतीच.... कारण कथामालिकेचा कालखंड सुरुवातीच्या अंदाजाप्रमाणे दोन वर्षांचा होता आणि मुलाचे लग्न समोर होते. वेळेचे नियोजन ही महत्त्वाची बाब आईने आत्मसात केली. आता मुलाचे लग्न आहे का, मग पुढील तीन महिन्यांचे लेख आधीच लिहून तयार ठेवायचे! मुलगी नातींसह माहेरपणाला येणार का, मग लेख वेळेच्या आधीच पाठवून द्यायचा वगैरे....!!

आता इतके लिहायचे म्हणजे बराच वेळ बैठक घालून बसणे आलेच.... परंतु गृहिणीला एवढा सलग वेळ कसा मिळणार? त्यामुळे मग लिखाणासाठी ब्राह्ममुहूर्तावर उठणे आणि सलग लिहिणे सुरू केले!

प्रसिद्ध लेखक श्री विजय तेंडुलकर म्हणायचे, 'लिखाण म्हणजे केवळ पेनाने कागदावर उतरवणे नसते, ते आधी लेखकाच्या मनात जन्मावे लागते, त्यावर विचार करावा लागतो, योग्य शब्द शोधावे लागतात. त्यानंतर कागदावर उतरवणे ही तर केवळ एक यांत्रिक क्रिया असते.'

येथे फरक एवढाच की, आई कागदावर न उतरवता मोबाईल- टॅब्लेटवर टाइप किंवा व्हॉईस रेकॉर्ड करत होती. याच तीन वर्षांच्या लिखाणाच्या कालखंडात माझा भाऊ आशय बेंगलोरला राहायला गेला आणि शांतलेचे कार्यक्षेत्र आईला प्रत्यक्ष बघता आले. श्रवणबेळगोळमध्ये शांतलादेवीने बांधलेल्या मंदिरात जाऊन प्रत्येक शिलालेखाचा-प्रशस्तीचा 'काढ ग हा फोटो!' हा आग्रह ऐकून माझी धाकटी मुलगी शेवटी म्हणालीच- 'आजी, आपण आपले फोटो काढण्याऐवजी फक्त हे दगडांचे फोटो का काढत आहोत?' त्यावर उत्साहाने पुन्हा त्या पाच वर्षांच्या चिमुरडीला समजेल अशा भाषेत शांतलेची गोष्ट सांगणे सुरु !

मासिक सन्मति आणि प्रज्ञाकाकूंनी आईवर विश्वास ठेवून तिला ही संधी दिली, त्यासाठी विशेष आभार!

**ले.- किमया देवलसी,** अकोला
M.Sc. Biotech
(SET, Life Sciences)
Mob.- ९३७२०३३३३९

********

## २)

आईने सांगितलेल्या गोष्टी ऐकतच मी मोठा झालो आहे. आईने शांतला कथा मालिका लिहिताना मला सर्वात जास्त आनंद झाला ते आईला लिखाणाची डेडलाईन पाळताना बघून! इंजीनियरिंगला असताना मला सबमिशन वेळेवर न केल्याबद्दल किंवा आदल्या दिवशी रात्री जागून लिखाण केल्याबद्दल ओरडणारी आई आता स्वतः रात्री जागून किंवा सकाळी उठून लिहिताना बघून मी म्हणायचो, 'कर्मा रिटर्न्स!'

विनोदाचा भाग सोडा, परंतु या दोन वर्षात घरी अनेक वेळा शांतलेबद्दल चर्चा झाल्या, आईसोबत आम्हीही शांतलेने काय राज्य निर्माण केले असेल याची चर्चा करण्यात व्यस्त व्हायचो.

आणि आता बेंगलोरला राहत असल्यामुळे श्रवणबेळगोळमधील चंद्रगिरीवरचे राणी शांतलेने बांधलेले मंदिर बघताना तिच्या डोळ्यात आलेले हलकेच पाणी.... आणि तिला टोकले, तेव्हा खणखणीत आवाजात 'आशय, मला या मंदिराचा असा असा फोटो हवा आहे..., ही प्रशस्ती-हा शिलालेख यांचा फोटो जरा नीट काढ'.... अशा तिच्या सूचना....! आपल्या लेखन विषयाशी तिची ही तन्मयता....खूप काही शिकवून जाणारी आहे!!

**ले.- आशय नरेश खेडकर,** बंगळुरू
B.E. (Computer Science)

*****

**वर्गणीदारांना विनंती...**
**कृपया वार्षिक व आजीवन वर्गणीदारांनी आपली वर्गणी पाठवून सहकार्य करावे..**

# अहिच्छत्र पार्श्वनाथ... ?

**( उतरार्ध)**

**डॉ. स्वयंप्रभा पिरगौडा पाटील,** विश्रामबाग, सांगली.

१२. अज्ञानी लोक मुख्यत: फण्याच्या आकाराकडे पाहूनच पार्श्वनाथांची अतिशयकारीता ठरवितात. फणा व अतिशय यांचा काही एक संबंध नाही. अतिशय हे दैवी देवकृत असतात. जन्मत: निसर्गत: प्राप्त असतात. खरे देव हे अतिशयकारी नाही, अतिशयधारी असतात. सर्व अतिशय भगवंताच्या सोबत येतात व त्यांच्याच सोबत निघूनही जातात. पारस-पाषाण तर लोखंडाचे फक्त सोनेच बनवितो. स्वत:सारखे पारस बनवत नाही. मात्र वीतरागी प्रभूंच्या सान्निध्याचीच असा काही महिमा आहे की, भक्त तेथे भगवानच (त्यांच्या समान) बनतो.

**तुहि कल्पवृक्ष तुही कामधेनु,**
**तुही दिव्य चिंतामणी नाग एन।**
**पशु नर्क के दु:खतैं तू छुडावै,**
**महास्वर्ग में मुक्ति में तू बसावै।।**
**करे लोह को हेमपाषाण नामी,**
**रटै नाम सो क्यों न हो मोक्षगामी।**
**करै सेव ताकी करै देव सेवा,**
**सुनै वैन सोही लहै ज्ञान मेवा।।**

१३. कोणत्याही घटनेला अतिशय म्हणता येत नाही. उदाहरणार्थ- कार्यक्रम सुरू असतांना पाऊस नाही आला निर्विघ्नपणे सांगता झाली, अचानक धनप्राप्ती झाली ... अशा गोष्टींना अतिशय म्हणता येत नाही. यासाठी जैनागमामध्ये वर्णित ३४ अतिशयांचा अभ्यास करावा.

१४. अतिशय या संस्कृत शद्बाचा अर्थ अत्यधिकता/ उत्कृष्टता/श्रेष्ठता असा होतो. या संसारात उपलब्ध असणाऱ्या कोणत्याही गोष्टीपेक्षा अत्यधिक (सर्वश्रेष्ठ) असे वीतराग-विज्ञानच आहे किंवा दोष व आवरण यांची विशेषरूपाने हानी होणे, हेच एक मोठे अतिशय आहे-असे अतिशय सर्वच अरिहंत परमेष्ठींना प्राप्त असते. शिवाय तीर्थंकर भगवानांचे ३४ अतिशय शास्त्रात सांगितले आहेत. ते फक्त पार्श्वनाथांचे आहेत, असे नाही तर सर्वच तीर्थंकरांना प्राप्त असतात.

१५. अज्ञानीचा नमस्कार चमत्काराला असतो, ज्ञानींचा नमस्कार वीतरागता, सर्वज्ञता इत्यादी सर्व गुणांना व गुणप्राप्तीच्या हेतूने केलेला असतो.-

**मोक्षमार्गस्य नेतारं, भेत्तारं कर्मभूभृताम्।**
**ज्ञातारं विश्वतत्त्वानां, वन्दे तद्‌गुणलब्धये।।**

१६. जैनधर्म स्वाधीन स्वतंत्र वस्तुव्यवस्थेचा पुरस्कर्ता आहे. अन्यकर्तृत्व वा परकर्तृत्वास वा ईश्वरकर्तृत्वास जैनसिद्धांतात थारा दिलेला नाही. याबद्दलचा विस्ताराने खुलासा कोल्हापूर नगरीचे ख्यातनाम ॲड. नानासाहेब नांद्रेकरांनी 'जैनदर्शनातील सृष्टि-अकर्तृत्व विचार' या आपल्या निबंधात दिला आहे. जिज्ञासू पाठकांसाठी तो संपूर्णच वाचनीय आहे.

पंचफणी, सप्तफणी किंवा सहस्रफणीमुळे पार्श्वनाथांच्या प्रतिमेला प्रसिद्धी मिळत असेल तर हे परकर्तृत्व आहे. त्याचे सर्वस्वी श्रेय नागाच्या रूपात आलेल्या धरणेंद्रांना जाईल. यामध्ये पार्श्वनाथांचे कोणते ते वैशिष्ट्य? पुनश्च जैन तत्त्वज्ञानानुसार सर्व जीव स्वत:च स्वत:चा कर्ता-भोक्ता आहेत. त्यामुळे कोणी कोणाचे दु:ख दूर करण्यास/सुख देण्यास समर्थ नाही. वीतरागी भगवानांपासून तर आपल्या मनोकामना पूर्ण करवून घेण्याच्या भानगडीतच कोणी पडू नये. भगवान असे दुसऱ्याचे काहीही करीत

नसतात. म्हटलेच आहे,- **तुम पर के कर्त्ता नहीं नाथ, ज्ञाता हो सब के एक साथ।**

१७. पार्श्वनाथांच्या जीवास उपसर्ग झाला तो मुनी अवस्थेत, मुनी अवस्था ही अंतरात्म्याची अवस्था आहे. परमात्म्याची नव्हे. त्यामुळे अहिछत्रप्रतिमा मुनी-पार्श्वनाथांची सिद्ध होईल. भगवान पार्श्वनाथांची अशी प्रतिमा असूच शकणार नाही. आपल्याला मंदिरामध्ये मुनीजीवनाचे प्रतीक असलेली प्रतिमा विराजमान करता येणार नाही. कारण आपल्या मंदिराच्या/ट्रस्टच्या नामकरणामध्ये आपण स्पष्ट उल्लेख केलेला असतो की-श्री १००८ भगवान पार्श्वनाथ जिनालय -याची ही नोंद सर्वांनी विशेषरूपाने घ्यावी.

१८. मूळात फणा असणे हे उपसर्गाचे (संकटे असण्याचे) प्रतीक आहे. संकट तर केव्हाचे टळून गेले; तरीही प्रतिमेवर फणा ठेवल्यास असा भास होऊ लागतो संकटांनी भगवंतांना आज सुद्धा घेरलेलेच आहे. जैनागमानुसार ज्यांची सर्व कर्मे (संकटे) नष्ट झालेली असतात तेच परमात्मा (संसारातून मुक्त) होतात. ज्याच्यावर संकटे कोसळत आहेत. त्याचा संसार अजून शिल्लक आहे. तो परमात्मा नसतोच मुळी.

१९. जैनसंस्कृतीने केवलज्ञानी जीवांनाच भगवान मानले आहे. आणि केवलज्ञान होताच त्या जीवांना दहा अतिशय प्राप्त होतात. केवलज्ञानाचे १० अतिशय -१) ज्या ठिकाणी केवली भगवान असतात. त्यांच्या चारी बाजूला शंभर योजन पर्यंत सुभिक्ष असणे, २) आकाशातून अधर गमन होणे, ३) चारी बाजूला मुख (चेहरा) दिसणे, ४) दयावान असणे, ५) उपसर्ग न होणे, ६) कवल (ग्रास) आहार न घेणे, ७) सर्वविद्यांचे स्वामी, ८) नख व केस न वाढणे, ९) डोळ्यांच्या पापण्या न लवणे, १०) शरीराची छाया न पडणे. यामध्ये स्पष्ट या गोष्टीचा उल्लेख आहे की - केवलज्ञान होता क्षणीच परमपूज्य भगवंतांच्या ठिकाणी कोणताच उपसर्ग राहत नसतो. आपण जिनमंदिरात केवलज्ञानाने सहित असलेल्या भगवान पार्श्वनाथांची प्रतिमा विराजमान करण्याचा संकल्प केला आहे. त्यामुळे प्रतिमेवर फणा ठेवता येणार नाही.

यासंदर्भात आपली खंत प्रगट करताना 'तीर्थंकर पार्श्वनाथ : कुछ विचारणीय बिंदु' या आपल्या निबंधात पंडित उदयचंद्र जैन म्हणतात,-

'संवर देव के द्वारा पार्श्वनाथ के चरणों में नमस्कार करने और अपने अपराधों की क्षमायाचना करने के बाद धरणेंद्र ने पार्श्वनाथ के ऊपर से स्वनिर्मित फणामंडप को भी हटा लिया होगा। उसी के बाद फणामंडप रहित अवस्था में पार्श्वनाथ को केवलज्ञान उत्पन्न हुआ था । अत: केवलज्ञान सहित अथवा अर्हंत अवस्था को प्राप्त पार्श्वनाथ की मूर्ति में फणामंडप युक्त मूर्ति की प्रतिष्ठा नहीं होनी चाहिए। लेकिन फणामंडप में आसक्ति के कारण जो परंपरा प्रचलित हो गई सो हो गई । अब उसमें सुधार की गुंजाइश ही कहाँ है ?'

काही लोकांनी आपला हट्ट पोसण्यासाठी उपसर्ग निवारणाची वेला व केवलज्ञान-उत्पत्तीची वेला (काळ) एकच आहे (समान आहे) हे सिद्ध करण्याचा प्रयत्न केलेला आहे; पण त्यांनी देखील केवलज्ञानानंतर उपसर्ग राहत नाही हे मान्य केलेलेच आहे. किंबहुना सर्वांना हे मान्य करावेच लागते.

२०. सामान्य केवली असोत किंवा तीर्थंकर केवली असोत/तीर्थंकरामध्ये देखील पार्श्वनाथ असोत किंवा आदिनाथ असोत. सर्वजण अरिहंतच आहेत. सर्वजण सारखेच; पण या फण्याने पार्श्वनाथांना मात्र बाजूला केले. भेदभाव केला आहे. हा भेदभाव जैनशासनास मान्य नाही.

२१. श्री पार्श्वनाथ चालीसा-

**पद्मावतिने फन फैलाया, उस पर स्वामी को बैठाया।**
**धरणेंद्र ने फन फैलाया, प्रभु के सर पर छत्र बनाया।।**

उपर्युक्त 'श्री पार्श्वनाथ चालीसा' यामधील काव्याला अनुसरून कोठे कोठे देवी पद्मावतीच्या

विग्रहास लागूनच (स्पर्श करूनच) सर्पफणा उभा करून त्यावर भगवान पार्श्वनाथांची प्रतिमा विराजमान करण्याची अतिप्राचीन तर नव्हे; पण अलीकडीलच एक प्रथा जैनसमाजात रूढ झालेली आहे. दुसरे म्हणजे पार्श्वप्रभूंची प्रतिमा ज्या फण्यावर विराजित आहे ती म्हणे नागिन आहे. व ज्याचे छत्र बनले आहे, तो नाग आहे अशी जनश्रुती देखील आहे.

या प्रथेला पुष्टी देणारी कविवर वृंदावनदासजींची एक कविता (वृंदावन विलास, पृष्ठ नं ६०, पदावली नंबर ११) देखील आहे

**प्रभूपर कमठ कोप करि आयो। प्रभूपर...।।टेक।।**
**पूरबवैर विचारि अधम वह, विपुल उपल बरसायो।**
**भूत प्रेत वेताल व्याल विकराल महादरसायो।।१।।**
**घनघमंड ब्रह्मंड मंडि जहँ, जलअखंड झर लायो।**
**पारस मेरुसमान ध्यानमें मगन न कछु दुख पायो।।२।।**
**पदमावति धरनेसुरको तब, आसन सहज चलायो।**
**तबहि आन पद्मावति प्रभुको निजशिर धरि गुन गायो।।३।।**
**धरनिंदर फणिमंडप कीनो, सब उपसर्ग नसायो।।४।।**
**केवलज्ञान भयो तब प्रभुको इंद्रसहित सुर आयो।**
**समवसरन रचना भइ तब ही देखत पाप नसायो।।५।।**
**कमठ आय शिरनाय प्रभूको, निज अपराध छिमायो।**
**त्रिभुवन जनहितहेत तहाँ प्रभु परमधरम दरसायो।।६।।**
**द्वादश सभा श्रवन करि सो धुनि निजआतमनिधि पायो।**
**प्रभुविहार करि भविकवृंदहित शिवमग प्रगय दिखायो।।७।।**
**आठों करम नाशि पारसप्रभु, आठोंगुन निज पायो।**
**देवी नमत समेदाचलतैं जिन अविचलपद पायो।।८।।**

पण ही प्रथा किती चूकीची आहे. कारण सर्व जिनेंद्र भगवान हे सर्व स्त्रीसंगविमुक्तच असतात. विशेष म्हणजे भगवान पार्श्वनाथ हे बालयती होते. हे सर्वांना माहीतच आहे. जीवनभर ब्रह्मचारी राहून त्यांनी घोर तपस्या केलेली होती. अशा परम पवित्र परमात्म्याची प्रतिमा एखाद्या महिला देवतेच्या डोक्यावर असलेल्या फण्यावर विराजमान करणे कितपत योग्य आहे? याचा जरूर विचार करावा. प्रत्युत हे एक मोठे दुष्कृत्यच समजावे लागेल. अशा जागी आकाराने देखील देवीची प्रतिमा मोठी व पार्श्वनाथांची मूर्ती अतिशय छोटी असते. हा ही अनादरच समजावा.

२२. भगवान पार्श्वनाथांनी आपली सर्व कर्मे (उपसर्ग ) स्वत:च्या परम पुरुषार्थाने/तपश्चर्येने दूर केली होती. पूर्वाश्रमी फक्त म्हणजे फक्त एका संकटसमयी(सदा सर्वकाळ नव्हे) धरणेंद्र (सर्प बनून आलेले देवगतीचे जीव) संरक्षणामध्ये क्षणिक निमित्तमात्र बनले होते. या ही प्रसंगी पार्श्वनाथ मुनींनी/जीवांनी ज्या शरीरावर उपसर्ग होत होता त्यावर मोह न ठेवता समताभाव धारण केला होता. आपल्या आत्म्यामध्येच लीन राहिले होते. व परम पुरूषार्थ केला होता. स्वबळावर संपूर्ण कर्मांचा नाश करून अनंत जन्ममरणातून मुक्त ही झाले होते. असे असताना त्यांना अहिछत्र लावून प्रस्तुत करणे म्हणजे त्यांना दुबळाच समजल्यासारखे होणार नाही का?

२३. एखाद्याचे रक्षण करण्यासाठी अथवा एखाद्याला भीती दाखविण्याच्या उद्देशानेच नाग आपला फणा वर काढत असतो. या दोन्ही क्रिया राग आणि द्वेषभावास व्यक्त करणाऱ्या आहेत. राग व द्वेषास सूचक कोणतीच चिह्ने वीतरागी खऱ्या देवाच्या आसपास देखील असत नाहीत जर असतील तर ते खरे आप्त देव होत नाहीत. याप्रमाणे येथे वीतरागमुद्रेचा नाश होऊन महान दोष निर्माण होत आहेत.

२४. परमात्मे हे श्रेष्ठ अतुल बलधारी अनंत वीर्यधारी बनलेले असतात, म्हणून त्यांना या सुरक्षाछत्राची मुळीच गरजच नसते.

कल्याणमंदिर स्तोत्रामध्ये म्हटलेच आहे.-

**प्राग्भारसम्भृतनभांसि रजांसि,**
**रोषादुत्थापितानि कमठेन शठेन यानि।**
**छायापि तैस्तव न नाथ हता हताशो,**
**ग्रस्तस्त्वमीभिरयमेव परं दुरात्मा।।**

अर्थात्- हे नाथ! दुष्ट कमठाने रागाच्या भरात आसमंतास व्यापून टाकणारी जी धूळ आपल्यावर उडविली तिने आपल्या सावलीला

देखील धक्का पोहचला नाही. उलट त्यामुळे हा दुष्टच निराश होऊन त्या कर्म धुलीने स्वत: मात्र बद्ध झाला.

अरिहंत–अवस्थेतही सापाचे सहकार्य लागत असेल तर त्यांना अनंतवीर्य या गुणांनी रहितच मानावे लागेल. अहिछत्रप्रतिमेमुळे अनंत बलरहित अनंतज्ञानरहित प्रतिमा विराजमान करून आपण तिचे दर्शन करीत आहोत, हे आपल्या लक्षात तरी येते का?

२५. ज्या भक्तांनी आपली श्रद्धा सम्यक् करून घेतली आहे. जे फक्त खरे देव–गुरू–शास्त्राची भक्ती करतात त्यांना अशा प्रतिमेकरिता अनुमोदना देखील देता येणार नाही, कारण अहिछत्र हे धरणेंद्र पद्मावती यांचेच दुसरे रूप आहे, प्रतीक आहे. यामध्ये वीतरागतेचा अंश देखील नाही.

मी म्हणत आहे म्हणून नाही तर सर्वांनीच फणाधारी प्रतिमेची प्रतिष्ठापना करताना अवश्य पुन्हा एकदा स्वत:ही विचार करून पहावा की– प्रस्तुत फणा हा तथाकथित देवतेचेच प्रतीक आहे की नाही? आणि आपला साष्टांग/पंचांग नमस्कार त्या लोकप्रचलित देवतेसमोरच होत आहे की नाही?

२६. सरागता व वीतरागता या दोन विरूद्ध गोष्टी आहेत त्यांना एकत्र विराजमान करणे हा एक प्रकारचा अवर्णवाद आहे.

२७. जिनमंदिर हे समवशरणाच्या प्रतीकरूपाने बनवले जाते. तीर्थंकर हे स्वत:च शासननायक (देव) असतात. (अंतिम शासननायक भगवान महावीर आहेत.) चतुर्थकाळात प्रत्यक्ष तीर्थंकर भगवान या भूलोकावर असतात तेव्हा ते समवशरणामध्ये अधर विराजमान असतात तेथे ही भगवानाच्या आसपास, अथवा मस्तकावर नागासारखा तिर्यंच जीव असणे अथवा इतर शासन देवता असणे–संभवतच नाही. याचे ही आगमप्रमाण आपल्याकडे उपलब्ध आहेत. इतर देवतांना शासन देवता मानून त्यांच्याजवळ विराजमान करणे हा तीर्थंकरांचा केलेला अपमानच आहे.

२८. आपले नवीन मंदिर आर्षपरंपरेला धरून निर्माण करण्याच्या उद्देशाने काम करावे. वरील सर्व मुद्दे लक्षात घेतल्यास तसेच (फक्त) सर्प–(आपला फणा वर काढलेला साप नाही) हे पार्श्वनाथांचे लांछन सांगितले आहे. म्हणून बाकीच्या तीर्थंकरांच्या प्रतिमेप्रमाणे आपल्या मंदिरात विराजमान होणाऱ्या प्रतिमेच्या पायथ्याशी फक्त ते छोटेखानी चित्ररूपात अंकित करता येईल, पण विशाल सर्पफणा प्रतिमेबरोबर कधीही विराजमान करता येणार नाही. अनेक गुणांनी युक्त असलेल्या प्रभूंची ओळख मात्र सर्पफणामुळे व्हावी याहून मोठे दुर्भाग्य ते कोणते?.

२९. २४ तीर्थंकरांपैकी कितीतरी तीर्थंकरांना मुनी अवस्थेत कष्ट सोसावे लागलेत; पण त्यांच्या प्रतिमा अशा सरागरूपात तयार करण्यात येत नाहीत. धूर्त व स्वार्थी लोकांना त्यात यश मिळाले नाही. फक्त ते पार्श्वनाथांची प्रतिमा या फणाधारीरूपात आणण्यात सफल झाले. निदान ज्ञानी लोकांनी तरी याचे अनुकरण करू नये. पुन्हा एकदा ज्ञानाची मशाल हाती घेऊन विशुद्ध परंपरा रूढ करून त्याचे महत्त्व जगाला दाखवून द्यावे. ही आपली नैतिक जबाबदारीच आहे.

३०. हा हुंडावसर्पिणी पंचमकाळाचाच प्रभाव मानावा लागेल की– आपण प्रस्तुत अज्ञानाचे निवारण करू शकत नाही. याबाबतीत आपला पुण्यप्रभाव क्षीण आहे; पण व्यक्तिगत पातळीवर नक्कीच आपली श्रद्धा सम्यक् करू शकतो. वीतरागतेचा आग्रह धरू शकतो.

३१. धर्मानुचरणामध्ये फक्त प्राचीनता पाहून चालणार नाही तर प्रामाणिकता ही पहावी लागेल. महावीरापेक्षा मारीची पुरातन आहेत; पण मारीचीचे शासन प्रचलित नाही. पुनश्च फक्त पुरावे शोधून चालणार नाहीत तर खरे पुरावे शोधावे लागतील. शोधाल तर नक्कीच सापडतील. **माझ्या या लेखनाचा मुख्य आधार समवशरणामध्ये विराजमान साक्षात पार्श्वनाथ भगवान आहेत.** अज्ञानी लोक

आपल्याला पाषाण, धातूंच्या मूर्तींवरती अहिछत्र लावलेले पुरावे दाखवतील तर आपण त्यांना आधीचा म्हणजे मूर्तीकला विकसित होण्यापूर्वीचा साक्षात समवशरणाचाच पुरावा देऊ.

बहुतेक ठिकाणी भगवान पार्श्वनाथांचे मानस्तंभ व समवशरण निर्माण करून त्यामध्ये चतुर्मुख अहिछत्र प्रतिमा विराजमान केल्या जात नाहीत. (केल्या तर हास्यास्पद ठरतील) कारण चारी दिशेला मुख दिसणे- या अतिशयचा प्रभाव फक्त वीतरागी जिनमुद्रेवर असतो. सर्पाकृतीवर कदापि नाही. म्हणून साक्षात समवशरणामध्ये किंवा मानस्तंभावर जे चतुर्मुखजिनबिंब विराजमान करतात ते पूर्णपणे वीतरागीच असतात. पुनश्च समवशरणाहून आधीचा पुरावा कोणाकडे केणताच असणार नाही. पुनश्च जरी येथे कोणी बहुमताचे कारण दिले तरीही कधीही यत्र तत्र सर्वत्र बहुमत व प्राचीन पुरावे याहून **विवेकच धार्मिकक्षेत्रात श्रेष्ठ समजला जातो. सारासार विचार करून आपली श्रद्धा सम्यक् करून घ्यावी.**

आचार्य कुमुदचंद्र यांचे संस्कृतमधून वसंततिलका छंदामध्ये लिहिलेले 'कल्याणमंदिर स्तोत्र' नावाचे सर्वप्रसिद्ध पार्श्वनाथस्तोत्र आहे. सर्व जैन श्रावक-श्राविका-मुनी-आर्यिका या स्तोत्रांचे नित्य पठन करीत असतात; पण यामध्ये कोठेही अहिछत्राचे महात्म्य वर्णिलेले नाही. हिंदीमध्ये कवीवर भूधरदासजींनी जनम जलधिजान ... अशी किंवा इतर अनेक कवींनी- तुमसे लागी लगन..., पारस नाम... इत्यादी अनेक सुंदर सुंदर हिंदी, मराठी भाषेत यासंबंधी भजन-भक्तीकाव्याची रचना केलल्या आहेत. त्यामध्ये ही अशा प्रतिमेचा कोणताच उल्लेख केलेला दिसत नाही. तेव्हा भावनेच्या भरात नको त्या गोष्टीला, नको तितके महत्त्व दिले जाऊ नये. ज्या कवींनी याचा उल्लेख केला आहे. **'गतानुगतिको लोकः'।** ( मनुष्य हा पुढे जाणाऱ्याच्या मागून जाणारा असतो.) त्यांनी प्रचलित परंपरेचे मात्र अनुकरण केलेले असते. त्यांनी देखील फक्त उल्लेख केला आहे. प्रामाणिक समर्थन केलेले नाही.

यासंदर्भात काही प्रमाणात आज जैनसमाज जागृत झालेला ही आहे. **अनेक ठिकाणी पार्श्वनाथांच्या वीतरागी प्रतिमा विराजमान होऊ लागल्या आहेत.** सांगली जिल्ह्यात कुपवाड (मूलनायक), चिंतामणीनगर (मूलनायक), कुंडल (सहनायक) अशा अनेक ठिकाणी भारतभर भगवान पार्श्वनाथांच्या फणाविरहित-वीतरागी प्रतिमा विराजमान होऊन श्रद्धेने, भक्तीने त्यांचे पूजनही केले जात आहे. हे कौतुकास्पद व अनुकरणीय आहे. आणखीनही समाजप्रबोधन होणे आवश्यक आहे. ही वीतरागी संस्कृती जोपासली तरच जैनेतर संस्कृतीची परंपरा मोडीत जाईल. त्यांचे आक्रमण रोखले जाईल. व जैन संस्कृती पुन्हा एकदा रुजू होईल. या दृष्टीने प्रयत्न झाले पाहिजेत. प्रोत्साहन मिळाले पाहिजे. प्रभु पार्श्वनाथांना फणासहितच पाहण्याची आपली मानसिकता बदलून घेतली पाहिजे. अज्ञानाने भावनावश होऊन आतापर्यंत जे झाले ते झाले या पुढे तरी अहिछत्रविरहित वीतरागी पार्श्वप्रभूंची प्रतिमा विराजित करणे आपले कर्तव्य समजून हीच परंपरा सुरू व्हावी ही भावना.

( समाप्त)


पश्चिम महाराष्ट्रातील जैन सत्साहित्य मिळण्याचे एकमेव ठिकाण......

**भरतेश ग्रंथ भांडार**

मु. पो. बाहुबली, ता. हातकणंगले,


जि. कोल्हापूर ४१६ ११०

**संपर्क :** श्री बाबगोंडा पाटील

८७६७५४१७१०

# वाचू आनंदे, लिहू नेटके!

## पुस्तक समीक्षण...




(राजहंस प्रकाशन)

**लेखक– अजेय झणकर**

# द्रोहपर्व

**डॉ. समृध्दी अनंत रायबागकर,** अमरावती ८२७५३ १२००५

राज्य शासनाचा पुरस्कार प्राप्त, अतिशय गाजलेली, हॉलिवूडने दखल घेतलेली (singularity नावाचा हॉलिवूडपट ज्यावर आधारित आहे) पहिली मराठी कादंबरी म्हणजे– द्रोहपर्व..!

ऐतिहासिक पार्श्वभूमीवर कल्पनाविस्ताराचं स्वातंत्र्य घेत अजेय झणकरांनी खरंच कमाल केली आहे. 'द्रोहपर्व' म्हणजे कहाणी मराठ्यांच्या अदम्य पराक्रमाची यशोगाथा असलेली 'वडगावच्या लढाई'ची! जी इंग्रजांनी स्वार्थासाठी ऐतिहासिक दस्तऐवजात सर्वसामान्य जनतेपासून लपवून ठेवली. 'द्रोहपर्व' कहाणी आहे सत्तालोलुप इंग्रजांच्या कपटी करस्थानाची अन् मन हेलावून टाकणाऱ्या 'इष्टुर फाकड्या'ची!

कादंबरीचा १७७३ ते १७७९ हा पेशवेकालीन कालखंड. तत्कालीन सत्य ऐतिहासिक घटनांना काही काल्पनिक पात्रांची जोड देऊन झणकरांनी मराठी साम्राज्यातील कलह, शनिवारवाड्यातील अंतःस्थ राजकारण, शह-प्रतिशह आणि मराठ्यांचा अतुल्य पराक्रम अक्षरशः जिवंत उभे केले आहेत.

इतिहास वाचताना अनेकदा आपल्या डोळ्यांसमोर रणांगण उभे राहते. तलवारींची खणखण, घोड्यांच्या टापांचा आवाज, पराक्रम गाजवणारे वीर आणि शत्रूवर मिळवलेले विजय म्हणजेच इतिहास असे वाटायला लागते.

पण इतिहास केवळ युद्धांनी घडत नाही. इतिहास घडतो तो राजकारणाने, महत्त्वाकांक्षांनी, निष्ठांनी आणि अनेकदा विश्वासघाताने. अेय झणकर यांची 'द्रोहपर्व' ही कादंबरी याच गुंतागुंतीच्या वास्तवाचा वेध घेते.

मराठा इतिहासात अनेक पराक्रमांच्या कथा आहेत; मात्र त्या पराक्रमांच्या सावलीत राहिलेल्या फितुरीच्या, अंतर्गत संघर्षांच्या आणि सत्तास्पर्धेच्या कथा फारशा सांगितल्या जात नाहीत.

'द्रोहपर्व' ही त्या दुर्लक्षित बाजूला उजेडात आणणारी कादंबरी आहे.

लेखकाने इतिहासातील घटना केवळ नोंदवल्या नाहीत, तर त्या काळातील वातावरण, व्यक्तींची मानसिकता आणि सत्तेच्या खेळाचे बारकावे जिवंत केले आहेत. पात्रनिर्मिती हा या कादंबरीचा आणखी एक महत्त्वाचा पैलू आहे.

इतिहासातील व्यक्तीरेखा येथे केवळ नायक किंवा खलनायक म्हणून येत नाहीत. त्यांचे निर्णय, त्यांची महत्त्वाकांक्षा, त्यांची भीती आणि त्यांच्या मर्यादा यांचे वास्तववादी चित्रण करण्यात आले आहे. त्यामुळे वाचक त्या व्यक्तींना समजून घेण्याचा प्रयत्न करतो.

अनेक प्रसंगी एखाद्या पात्राचा निर्णय चुकीचा वाटत असला तरी त्या परिस्थितीत तो का घेतला गेला असेल, याचा विचार वाचक करू लागतो.

'द्रोहपर्व' मधील इष्टुर फाकड्या ही व्यक्तिरेखा कादंबरीच्या आत्म्यासारखी वाटते. इतिहासाच्या भव्य पटावर फिरणाऱ्या राजकीय आणि लष्करी घडामोडींना तो जमिनीवर आणतो.

त्याच्या नजरेतून पाहिलेला इतिहास अधिक जिवंत, अधिक मानवी आणि अधिक

विश्वासार्ह वाटतो. म्हणूनच कादंबरी संपल्यानंतरही अनेक पात्रांपेक्षा इष्टुर फाकड्याची आठवण वाचकाच्या मनात रेंगाळत राहते.

**मर्यादा :**

इतिहासाची विस्तृत पार्श्वभूमी आणि अनेक व्यक्तीरेखा यांमुळे सुरुवातीच्या काही प्रकरणांमध्ये सामान्य वाचकाला लक्ष केंद्रित करावे लागते.

काही ठिकाणी तपशीलांची संख्या अधिक वाटू शकते. परंतु इतिहासाची आवड असणाऱ्या वाचकांसाठी हेच तपशील कादंबरी अधिक समृद्ध करतात.

कधी कधी काल्पनिक विस्तार खटकतोही पण कादंबरीची रंजकता वाढवणे आणि कथानकाला समोर नेण्यासाठीची त्यामागची अपरिहार्यता पण लक्षात घ्यावीच लागते.

**का वाचावी :**

ऐतिहासिक पार्श्वभूमी असली तरी कुठेही जड, बोजड भाषा नाही, भारंभार संदर्भ नाहीत किंवा इसवी सन वा तारखांचा रतीबही नाही आणि त्यामुळेच 'कादंबरी' (ऐतिहासिक ग्रंथ नव्हे!) वाचनाचाच feel शेवटपर्यंत कायम राहतो.

साध्या बोलीभाषेत जरी लिहिलेली असली तरी त्यांच्या भाषेला एक भारदस्तपणा आहे, जो कादंबरीची ऐतिहासिक किनार ठळकपणे अधोरेखित करतो. कुठेही रटाळपणा नाही, कंटाळवाणी वाटत नाही हेच लेखकाचं यश.

प्रत्येक शब्दातून झणकरांची मेहनत, अतिशय अभ्यास पूर्ण लिखाण याचा प्रत्यय येत राहतो. जो नक्कीच मनाला भावून जातो.

युद्धप्रसंगांचे वर्णन ही कादंबरीची आणखी एक जमेची बाजू आहे. लेखकाने रणांगणातील तणाव, डावपेच, अनिश्चितता आणि वीरतेचे क्षण अत्यंत प्रभावीपणे रंगवले आहेत. मात्र ही कादंबरी युद्धाच्या वर्णनात रमून राहत नाही. युद्धाच्या मागे चालणारे राजकारण, मुत्सद्देगिरी आणि सत्तेचे खेळ यांनाही तेवढेच महत्त्व दिले आहे.

कादंबरीतील सर्वात प्रभावी विषय अर्थातच 'द्रोह' हा आहे. बाहेरचा शत्रू ओळखणे सोपे असते; पण आपल्या माणसांच्या मनात काय सुरू आहे हे ओळखणे कठीण असते. इतिहासातील अनेक निर्णायक पराभव आणि विजय हे रणांगणावर नव्हे, तर बंद दाराआड झालेल्या निर्णयांमुळे ठरले आहेत. लेखकाने हा मुद्दा अत्यंत प्रभावीपणे मांडला आहे. त्यामुळे **द्रोहपर्व वाचताना वाचकाला वारंवार वर्तमानाची आठवण होते. काळ बदलला, चेहरे बदलले, सत्तेची साधने बदलली; पण स्वार्थ, महत्त्वाकांक्षा आणि विश्वासघाताचे स्वरूप मात्र तसेच राहिले आहे.**

एकंदरीत, **'द्रोहपर्व' ही केवळ ऐतिहासिक कादंबरी नाही. ती सत्तेच्या खेळांची, मानवी स्वभावातील गुंतागुंतीची, निष्ठा आणि स्वार्थ यांच्या संघर्षाची कथा आहे.**

इतिहासातील एका पर्वाचे चित्रण करताना ती प्रत्येक काळासाठी लागू पडणारे सत्य सांगते. म्हणूनच ही कादंबरी वाचून संपल्यावर **केवळ इतिहास समजत नाही; तर माणूस आणि सत्ता यांचे नातेही नव्याने समजू लागते.**

इतिहासप्रेमी, राजकारणात रस असणारे वाचक आणि गंभीर साहित्य आवडणाऱ्यांसाठी द्रोहपर्व हा एक समृद्ध वाचनानुभव आहे. कादंबरी केवळ वाचायची नसते, तर तिच्यावर विचार करायचा असतो. आणि नेमके त्यातच तिचे यश दडलेले आहे.

निधड्या छातीच्या मराठ्यांनी इंग्रजांना भुईसपाट केल्यावरच संपलेलं हे 'द्रोहपर्व' अवघ्या ५०० पानात चितारण्याचं शिवधनुष्य झणकरांनी अगदी लिलया पेललेलं आहे.

इतिहासापासून धडा घेतला तरच भविष्याचा डोळस वेध घेता येतो हे मनांवर बिंबवणारी--'द्रोहपर्व!'

# अंगकोर मंदिर : एक आश्चर्य

सौ. विजया संगई, अंजनगाव सूर्जी

कंबोडिया देश! सीम रिप नदी! अंगकोर वाट! जगातील सर्वात मोठे वारसा जपणारे धार्मिक स्थळ! युनेस्कोची विश्व प्रसिद्ध धरोहर, म्हणून ज्याला मान्यता प्राप्त झाली आहे. हे सुरुवातीला विष्णूला समर्पित मंदिर समूह म्हटल्या गेला. त्यानंतर बौद्ध धर्मीय यांचा हा मंदिर समूह म्हटल्या गेला. पण.:.....

अनेक साम्राज्य नष्ट झालेत, राजवंश समाप्त झालेत, पण हा पाषाणावर उत्कीर्ण चलचित्रपट आजही आहे. ही एक अजरामर गाथा आहे. जणू स्वतःमध्ये निर्मित ग्रंथ आहे. एक रहस्य आहे.

काही वर्षांपूर्वी जैनगजेट या साप्ताहिकात अंगकोर मंदिर समूहाबद्दल एक लेख आला होता. तेव्हापासूनच या मंदिरांबद्दल मनात अनिवार उत्सुकता होती. खरंच हा मंदिर समूह जैन धर्माचे प्रतिनिधित्व तर करत नाही ना? ही पंचमेरू किंवा नंदीश्वर रचना असावी का? असे अनेक पैलू मनात संचित करून या मंदिर समूहाला मागच्या वर्षी भेट देण्याचा योग जीवनात आला. २५ फेब्रुवारी २०२५ रोजी कंबोडियाच्या भूमीवर पाऊल ठेवले. चौदाशे साल प्राचीन कंबोज राजा! त्याचे राज्य या धरतीवर होते, आणि म्हणून याला कंबोडिया असे म्हटल्या गेले. भारतापासून ४९३३ किलोमीटर दूर, जैन संस्कृतीच्या पाऊलखुणा खरंच आहेत का? या अनुत्तरीत प्रश्नाच्या समाधानार्थ आमचे भ्रमण सुरू झाले. १२व्या शतकातील राजा सूर्यवर्मन याने या प्रचंड मंदिर समूहाची रचना साकारली. याचे काही आकडे पाहण्यासारखे आहे. ५८ लाख मॅट्रिक टन दगड यासाठी वापरल्या गेला. ८० हजार कामगार ४० वर्षे पर्यंत या मंदिराच्या निर्मितीत गुंतलेले होते. १०२४ मीटर लांब ८०२ मीटर रुंद व ४.५ मीटर उंच अशी या मंदिराची दुसरी तटबंदी. या मंदिराचा स्थापत्यशास्त्री आहे पंडित दिवाकर! जवळपास ७२ मंदिरे या परिसरात आहेत. ७२ हा आकडाही तीन २४चे प्रतीक म्हणून आमच्याशी साधर्म्य दाखविणारा आहे. ४०२ एकर परिसरात पसरलेला हा अथांग मंदिर समूह, म्हणजे सूर्यवर्मन राजाचे भव्य दिव्य स्वप्नच! दीड लाख लोक या परिसरात अत्यंत आनंदाने राहत होते. समुद्रमंथनाच्या सुरम्य कल्पनेने या परिसराला वलयांकित केले आहे. या क्षेत्राचे मूळ नाव यशोधरपुर! आकाशाशी स्पर्धा करणारे असे ६४ मीटर म्हणजेच २१३ फूट उंच असे मधल्या मेरू पर्वताचे शिखर ! सहाशे वर्षे ही मंदिरे आपल्या वैभवाने शांततेने व दिमाखाने उभी होती. पण माहित नाही अनेक आक्रमणात हे वैभव दृष्टीआड झाले. याचा मग  मागमूस ही राहिला नाही. अकराशे पन्नास साली सूर्यवर्मन राजाचे निधन झाले. त्यानंतर सत्ता परिवर्तन झाले.

आणि खमेर वंशीय राजाने बांधलेले हे मंदिर पंधराव्या शतकात ओसाड बनले. अनेक झाडाझुडपांमुळे याचे अस्तित्व धोक्यात आले. पण आमचे सुदैव १८६० साली एका फ्रेंच शास्त्रज्ञाला या परिसराचा शोध लागला. व हा परिसर त्याने अनुभवला. व त्याच्या अक्षरशः तो प्रेमात पडला. जगातील एक अद्वितीय, अद्भुत, अकल्पनीय, अनुपम, अलौकिक असं वास्तुशिल्प आपल्याला इथे बघायला मिळते.

मध्यभागी एक सर्वात उंच मेरू व चार दिशेला चार मेरू. मध्यभागी पेक्षा थोडा कमी उंचींचे चार बाजूला चार मेरू. 'चारो मेरू समान बखानो' या

ओळीचा प्रतिभास इथे होतो. फरक, आपण एकाच लाईन मध्ये पाच मेरू मानतो. पण कदाचित ते इथे वेगळ्या पद्धतीने प्रस्तुत झाले असावे. कदाचित त्या काळात तशाच प्रकारची कल्पना पण असावी. मंदिर आणि मधल्या मेरूचे शिखर अशा जागी आहे की २१ मार्च व २३ सप्टेंबर या दोन दिवशी मंदिरांच्या सरळ रेषेत जर उभे राहिले तर तिथेच सूर्योदय होतो. अप्रतिम सूर्योदय जणू सूर्याचा तेजस्वी लाल गोळा आपल्या सर्व किरणांनी भूमंडळाला प्रकाशमान करतो आहे. व त्याचे प्रतिबिंब पाण्यात पडते. निसर्गाची एवढी सुंदर चित्रकारिता बघणे केवळ अविस्मरणीय!

काळाच्या ओघात किंवा भूकंपाच्या धक्क्यातही हा मंदिर समूह सुरक्षित आहे. याचे कारण मंदिर सभोवती असणारे प्रचंड कालवे. या मंदिर समूहाचा पाया या कालव्यातील पाणी आणि त्याखाली असलेल्या वाळूने तोलून धरला आहे. हा देश जवळपास विषुववृत्तावर असल्यामुळे इथे प्रचंड ऊन असतं. जमिनीला तडे जाऊन वास्तु क्षतिग्रस्त होऊ शकते, हा धोका ओळखून पाया सतत पाण्याने व वाळूने ओला राहील ही दूरदृष्टी. स्थापत्याचा एक अनोखा आलेख इथे पाहायला मिळाला.

मंदिर पश्चिमाभिमुख आहे. पण राजा मात्र पूर्व दिशेनेच प्रवेश करत असे व मंदिरात असणाऱ्या वापिकासमान रिक्त कुंभ पाण्याने भरल्या जात असे. मग परत इथे आठवण येते, 'चार सुवापिका जल तेथे' या ओळीची व वाटते की ही नंदीश्वराची रचना तर नाही ना? आमच्या डोळ्यांना जे दिसते त्यापेक्षा त्याचे ड्रोन मधून घेतलेले चित्र जास्त स्पष्टपणे रचना स्पष्ट करते. मोजमाप करतानाची अचूकता, मंदिराला वेढून असणारी तटबंदी, मंदिरांच्या पूर्व-पश्चिम-उत्तर-दक्षिण दिशा पृथ्वीच्या दिशांशी अचूक जुळतात. या सर्व गोष्टी अनुभवल्या की आमच्या पूर्वजांना आम्हाला मानवंदना द्यावीशी वाटते !

मंदिराच्या दुसऱ्या तटबंदी पाशी आम्ही जेव्हा येतो तेव्हा तर थक्क होतो. ही दुसरी तटबंदी सजली आहे ती अनेक पौराणिक कथांनी! इथे आहे महाभारत-रामायण, देव-दानव युद्ध, देवांनी असूरांचा केलेला संहार, अर्जुनाला उपदेश करणारा कृष्ण, रावणाची दशमुख प्रतीमा, भीष्म शरपंजरावर असतानाचे दृश्य, राजाची राजसभा व प्रत्येकाचा दर्जा व त्याचे आसन विशेष. हे सर्व बघण्यासाठी पाच ते सहा तास लागू शकतात. या सर्व शिल्पांमध्ये समुद्रमंथनाचे शिल्प हे ४८ मीटर लांब आहे. एकेक दृश्य बारकाईने या ठिकाणी रेखले आहे. मेरू पर्वताची रवी, वासुकी सर्पाची दोरी समुद्रमंथनातून बाहेर पडलेले १४ निधी सर्वच अपूर्व.

पूर्वेकडील भिंतीवर जे शिल्प आहे त्यावर ९१ असूर आणि ९० देव आहेत व सूर्याची किरणे आणि ही शिल्प यांचा अद्भुत मिलाफ तिथे दिसतो. २३ सप्टेंबर ते २१ डिसेंबर या काळामध्ये असूरांवर क्रमाक्रमाने प्रकाश पडतो. तर २१ मार्च ते २१ जून या काळात एकेका देवावर प्रकाश पडतो.

या मंदिरामध्ये एक गोष्ट आणखी वैशिष्ट्यपूर्ण आहेत. मधल्या मेरूमध्ये एक मीटर लांब व एक मीटर रुंद आणि मेरू एवढ्या उंचीचा असा मध्यभागी एक पोकळ खांब आहे ज्यात सूर्यवर्मन राजाच्या अस्थी ठेवलेल्या आहेत व त्यावर एक दिवस बरोबर वरून डायरेक्ट प्रकाश पडतो. कंबोडिया मध्ये दुसरा महत्त्वाचा मंदिर समूह, म्हणजे बायोन टेंपल. ५४ मिनारे इथे आहेत व यावर चेहरे आहेत. अत्यंत शांत समाधानी आणि तृप्त भाव असलेले हे चेहरे. सगळी चेहरे अगदी सारखी आहेत. ही उत्कीर्ण केलेली नाही तर पाषाण एकमेकांमध्ये फसवून बनवलेली चेहरे आहेत. एखाद्या योगी पुरुषांसारखी ही चेहरे आपल्याला शांतीचा संदेश देत आहे असाच भास इथे होतो. कंबोडियाच्या राष्ट्रध्वजावर पण हाच मंदिर समूह साकारलेला आहेत. शिवाय येथील लोक अत्यंत देशभक्त आहेत. कोणतीही सरकारी इमारत किंवा घर या मेरू पर्वतापेक्षा उंच इथे नाही.

दोन-तीन दिवस फिरल्यानंतर याची फक्त तोंड ओळखत होते. आज मधल्या मेरूला जाण्यासाठी लोखंडी जिना लावलेला आहे. पण त्या काळात शिखराच्या बाहेर आलेल्या पायऱ्या आहेत त्यावरूनच चढ-उतार होत असे. मधल्या मेरुच्या या शेवटच्या पायऱ्या म्हणजे एक आव्हानच होते. पण इच्छाशक्तीच्या जोरावर आम्ही वर गेलो आणि तिथे अक्षरशः आमचे येणे सार्थक झाले असे वाटले. दोन-तीन मुर्त्यांना पिवळे वस्त्र परिधान केलेले आहे. पण त्या प्रतिमा मात्र दिगंबर आहेत. एक प्रतिमा मात्र दिगंबर अवस्थेतच आहे आणि तीही आम्हाला बनारसच्या जन्मभूमीच्या प्रतिमेची आठवण करून देते.

कधी कधी वाटते आमच्या पूर्वजांची विरासत आम्ही जतन करू शकलो नाही. आमची उदासीनता, अनास्था, अनुत्सुकता व आत्मकेंद्रीत वृत्ती यासाठी जबाबदार आहे. आमचे वैभव आमच्या डोळ्या देखत आमच्या हातातून निसटत आहे. यासाठी इतिहास आम्हाला कधीही माफ करणार नाही. कंबोडियाच्या मंदिरात भगवान पार्श्वनाथ स्वामींच्या प्रतिमा दिसल्या याचा अर्थ असाही असू शकतो की त्या काळात जैन धर्म भारताबाहेर पण असावा. आणि शिल्पांबद्दल तर, कालांतराने या भिंतीवर हे शिल्प रेखाटल्या गेले असावे. इतिहास आम्हाला ज्ञात नाही व ज्ञात गोष्टींवरून अज्ञात प्रांतात प्रवेश करणं म्हणजे अंधारात तीर चालविणे आहे. शेवटी म्हणावेसे वाटते, **कालाय तस्मै नमः।**

*****



## शिक्षण, संस्कार आणि धर्मसाधनेचा दीपस्तंभ : स्व.श्री. पानाचंद खोलापुरे गुरुजी

दि. १७ ऑगस्ट २०२६, सोमवारची पहाट कारंजा (लाड) नगरीसाठी एक दुःखद वार्ता घेऊन उगवली. मागील रात्री, म्हणजेच १६ ऑगस्ट २०२६ रोजी, 'जैनांची काशी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या नगरीने आपल्या समाजातील एक धर्मनिष्ठ, विद्वान, संस्कारशील आणि मार्गदर्शक व्यक्तिमत्त्व कायमचे गमावले. जैन समाजाच्या धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनात आपल्या ज्ञानाने, संस्कारांनी आणि मार्गदर्शक विचारांनी मोलाचे योगदान देणारे आदरणीय स्वर्गीय श्री. पानाचंद खोलापुरे गुरुजी यांच्या निधनाने कारंजा नगरीवर शोककळा पसरली.

कारंजा नगरीतील अत्यंत शिस्तप्रिय श्री. मोतीलालजी खोलापुरे आणि स्वभावाने प्रेमळ, शांत व धर्मनिष्ठ सौ. सरूबाई या दाम्पत्याच्या पोटी २७ नोव्हेंबर १९३७ रोजी श्री. पानाचंद यांचा जन्म झाला. घरची परिस्थिती बेताची असली, तरी घरातील धार्मिक वातावरण, शिस्त आणि संस्कार यांनी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची पायाभरणी बालपणा-पासूनच केली.

लौकिक शिक्षण घेत असताना हिंदी विषयात पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण करून हिंदी विषयात तत्कालीन 'पारंगत' ही पदवी त्यांनी प्राप्त केली. शिक्षणाची आवड आणि अध्यापनाची ओढ यामुळे त्यांच्या जीवनाला लवकरच एक सुंदर दिशा मिळाली. १९५५मध्ये स्वनगरीतीलच श्री महावीर ब्रह्मचर्याश्रम हायस्कूल येथे अध्यापक म्हणून त्यांना सेवा करण्याची संधी मिळाली. आणि याच ठिकाणी त्यांच्या जीवनप्रवासाला एक विलक्षण आध्यात्मिक व संस्कारमय वळण मिळाले.

श्री महावीर ब्रह्मचर्याश्रम हायस्कूलमध्ये सेवा करताना त्यांना सहवास लाभला तो परमपूज्य १०८ गुरुदेव श्री समंतभद्र महाराज आणि त्यांचे परमशिष्य न्यायतीर्थ श्रद्धेय श्री. माणिकचंदजी चवरे उर्फ तात्याजी यांचा. या दोन महान व्यक्तिमत्त्वांच्या

सहवासाने श्री. पानाचंद खोलापुरे गुरुजींच्या व्यक्तिमत्त्वाला एक वेगळीच झळाळी प्राप्त झाली. त्यांच्या तालमीत, मार्गदर्शनात आणि संस्कारांत गुरुजींच्या जीवनाला लौकिक शिक्षणाबरोबरच आध्यात्मिक अधिष्ठान लाभत गेले.

प. पू. गुरुदेवांच्या संस्थांचे वैशिष्ट्य म्हणजे, लौकिक शिक्षणासोबत आध्यात्मिक शिक्षणालाही विशेष महत्त्व दिले जात असे आणि आजही ती परंपरा अव्याहतपणे चालू आहे. पर्युषण पर्वाच्या काळात गुरुकुलातील विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी विविध धार्मिक व बौद्धिक उपक्रम आयोजित केले जात. दशधर्मांपैकी प्रत्येकी एकेकाने एका धर्मावर अभ्यासपूर्ण व्याख्यान, सकाळच्या सत्रात मंदिरात तत्त्वार्थसूत्रातील अध्यायावर प्रवचन, प्रसंगी गावातील मंदिरात देखील, विशेष म्हणजे श्रद्धेय तात्याजींच्या उपस्थितीत. याचा परिणाम म्हणजे आपसूकच शिक्षकांचीही विषयाची सखोल तयारी होत असे.

श्रद्धेय तात्याजींच्या मार्गदर्शनामुळे जी काही आवश्यक तयारी आहे, ज्या काही उणिवा असतील त्या दूर करण्याची संधी मिळत असे. या संस्कारमय वातावरणाचा श्री. पानाचंद गुरुजींवर विशेष परिणाम झाला. मुळातच धर्माचे संस्कार लाभलेल्या गुरुजींना संस्कृत आणि स्वाध्यायाची विशेष गोडी निर्माण झाली. पुढे ते तत्त्वार्थसूत्रावर उत्तम प्रवचन करणारे अभ्यासू वक्ते म्हणून परिचित झाले.

स्वगृहाजवळील १००८ भगवान श्री चंद्रप्रभू बालात्कार मंदिरात त्यांचा सायंकाळचा नियमित स्वाध्याय सुरू झाला. त्यांच्या ज्ञानाची, साधनेची आणि धर्मनिष्ठेची ओळख दिवसेंदिवस वाढत गेली आणि संपूर्ण कारंजा परिसरात ते प्रेमाने 'पंडितजी' आणि 'पानाचंद गुरुजी' म्हणून ओळखले जाऊ लागले.

श्री महावीर ब्रह्मचर्याश्रम हायस्कूलमध्ये तब्बल ३९ वर्षे अखंड सेवाव्रत स्वीकारून त्यांनी अध्यापनाचे कार्य केले. ३० एप्रिल १९९८ रोजी ते सेवेतून निवृत्त झाले.

निवृत्ती हा त्यांच्या कार्याचा शेवट नव्हती; उलट त्यांच्या ज्ञानसाधनेला आणि धर्मसेवेला त्यानंतर अधिक व्यापक स्वरूप प्राप्त झाले. निवृत्तीच्या वेळी त्यांनी आपल्या कर्मभूमीला दिलेली एक विशेष भेट म्हणजे सुविचारांच्या पाट्या! आजही शाळेतील त्या पाट्या त्यांच्या शाळेविषयीच्या आस्थेची, संस्कारनिष्ठ कार्यपद्धतीची आणि विद्यार्थ्यांच्या मनावर चांगले विचार रुजविण्याच्या त्यांच्या ध्यासाची साक्ष देत उभ्या आहेत.

हिंदी, इंग्रजी आणि भूगोल हे त्यांच्या अध्यापनाचे प्रमुख विषय होते. मात्र अध्यापक या भूमिकेपलीकडे ते धर्माचे गाढे अभ्यासक होते. क्षत्रचूडामणी या ग्रंथाच्या स्वाध्यायात त्यांना विशेष रस होता. या ग्रंथाचा त्यांनी अनेक वेळा अभ्यास केला होता आणि त्यावरील प्रवचनांमध्येही ते विशेष रस घेत असत.

स्व. पानाचंद गुरुजींचे व्यक्तिमत्त्व अनेक पैलूंनी समृद्ध होते. शिस्तप्रिय शिक्षक, प्रेमळ मार्गदर्शक, धर्माचे गाढे अभ्यासक, संस्कृत व स्वाध्यायाची आवड असलेले वक्ते आणि जिनवाणीच्या सेवेला वाहून घेतलेले साधक या सर्व भूमिका त्यांनी अत्यंत निष्ठेने निभावल्या.

प. पू. १०८ गुरुदेव श्री समंतभद्र महाराज आणि श्रद्धेय तात्याजी यांच्या तालमीत घडलेले हे व्यक्तिमत्त्व आयुष्यभर त्यांच्या संस्कारांची जपणूक करत राहिले. त्यांचे संपूर्ण जीवन त्यागमय, धार्मिक आणि संस्कारपूर्ण वातावरणात व्यतीत झाले. ज्ञानाचा प्रसार, विद्यार्थ्यांवर संस्कार आणि जिनवाणीची सेवा यांनाच त्यांनी आपल्या जीवनाचे ध्येय मानले. हीच त्यांच्या स्मृतीची अमूल्य ठेव आहे. आपल्या शिस्तपूर्ण, आदर्श आणि संस्कारमय जीवनपटाला भावपूर्ण आदरांजली!

# THE MANY NAMES OF *MOHA* : ITS CONNOTATIONS, TRANSLATIONS, AND THE CASE FOR AN UNTRANSLATABLE JAINA CONCEPT — WITH SPECIAL REFERENCE TO PRAKRIT LITERATURE

***Sayyam Jain,*** Research Scholar, Department of Jainology and Prakrit,
Mohanlal Sukhadia University, Udaipur.

यह शोध–पत्र जैन अवधारणा moha को अज्ञान, भ्रम, या माया जैसे सामान्य शब्दों से पर्याप्त रूप से अनूदित न किए जा सकने का तर्क देता है। यह दिखाता है कि ये सभी शब्द अर्थ का केवल एक हिस्सा पकड़ते हैं, जबकि प्राकृत और दिगंबर जैन स्रोतों में moha आत्मा की एक सकारात्मक, कर्म–जनित प्रवृत्ति है, जो ज्ञान और आचरण दोनों को प्रभावित करती है और आत्मा का वास्तविक जगत के साथ गलत संबंध बनाती है।

लेखक ने उपलब्ध भारतीय पर्यायों जैसे avidy, ajna और my तथा अंग्रेज़ी अनुवादों जैसे ignorance, delusion और illusion का शब्दार्थ और दार्शनिक तुलना के आधार पर विश्लेषण किया है। निष्कर्ष यह है कि इनमें से कोई भी शब्द moha की पूरी संरचना को नहीं पकड़ता, इसलिए इसे अनूदित किए बिना ही रखना अधिक उपयुक्त है।

**Abstract.** The Jaina term *moha* is habitually carried over into another vocabulary by one of several near-equivalents — *avidyā*, *ajñāna* and *māyā* among the Indian terms, and "ignorance," "delusion" and "illusion" in English. This paper argues that no one of these is adequate, because each localises the deluded condition in a single faculty or object, whereas *moha*, as fixed in the Prakrit sources and the Digambara scholastic tradition, is a conjunction of four features: it is a positive disposition (*bhāva*) of the soul; conditioned by a real deluding (*mohanīya*) karma of twenty-eight species; two-winged, reaching across both cognition (*darśana-moha*) and conduct (*cāritra-moha*); and relational, the mis-relating of a real soul to a real world. Examining each candidate term against this standard, the paper concludes — by a *via negativa* — that *moha* is best retained untranslated.

**Keywords:** *moha*; Jaina philosophy; Prakrit literature; *avidyā*; *māyā*; delusion; *mohanīya* karma; *darśana-moha* and *cāritra-moha*; translation.

## 1. Introduction: The Problem and the Standard

Before *moha* can be traced through the Prakrit literature or set against the several philosophies, a prior question must be settled: what does the word mean, and what is lost when it is carried over into another vocabulary? Within the Indian languages the term shades into *avidyā*, *ajñāna* and *māyā*; in English it is rendered now as ignorance, now as delusion, now as illusion. These are not idle variants: each carries a model of what goes wrong in the deluded soul, so that to adopt one is already to take a position on the nature of *moha*.

It is well, then, to fix at the outset what *moha* is in the sources, so that the survey has a standard against which to measure. The noun derives from the root √*muh*, "to become stupefied, bewildered or perplexed, to err"; the lexicons gloss it as stupefaction, bewilderment, error, folly, infatuation and delusion (Apte; Monier-Williams), and its Vedic background, the adjective *mogha* ("empty, vain, foolish"), already couples the cognitive with the affective. The *Bhagavad-gītā* traces a ladder from the passions to the ruin of judgment — *krodhād bhavati sammohaḥ*, "from anger arises delusion" (2.63).

The Jaina sources give this double

sense a precise doctrinal form. The *Jainendra Siddhānta Kośa* defines *moha* as *padārtha kā anyathā grahaṇa* — "the apprehending of a thing otherwise than it is" — and preserves the old Prakrit line that fixes the term:

> *davvādiesu mūḍho bhāvo jīvassa havadi moho tti* — "The deluded disposition (*bhāva*) of the soul with regard to substances (*dravya*) and the rest: that is *moha*."

Two things here deserve note. First, *moha* is a *bhāva*, a positive modification of the *jīva*, not a mere absence. Second, its fault is relational: it is the soul's mis-apprehending of substances that are themselves real, not the conjuring of unreal ones. The doctrine of karma sharpens both points. *Moha* is borne in the soul by a distinct deluding karma, the *mohanīya*, reckoned the most consequential of the eight and comprising twenty-eight species — *mohanīyassa kammassa aṭṭhāvīsa payaḍīo* (*Ṣaṭkhaṇḍāgama*; cf. *Gommaṭasāra, Karmakāṇḍa* 36) — which the *Tattvārtha-sūtra* divides into two wings: *darśana-mohanīya*, the deluding of view, and *cāritra-mohanīya*, the deluding of conduct, comprising the sixteen *kaṣāyas* and nine *nokaṣāyas* (8.9). This twofold structure is the crux: *moha* is not one thing but a genus with a cognitive and a conative wing, and it is precisely this joint reach that the candidate-translations, each seizing one wing and dropping the other, cannot hold together. Modern scholarship confirms the weight placed here — Jaini makes the subdual of the *mohanīya* the hinge of the whole ascent of the *guṇasthānas* (Jaini), and Johnson traces how bondage itself came to be located in the *kaṣāyas* of *cāritra-moha* rather than in outward act (Johnson).

The method that follows is lexical and analytical: for each term I give the etymology and dictionary sense, note its use in the tradition that employs it, and ask where it diverges from *moha* as just fixed. That the exercise is worth the trouble is a lesson of the wider scholarship, for Halbfass has shown how readily an Indian term, transposed into a European vocabulary, takes on the receiving tradition's commitments, so that a translation may quietly settle questions the original left open (Halbfass).

## 2. The Indian Near-Synonyms

**2.1 *Avidyā*.** *Avidyā* is the most frequent Indian near-synonym of *moha*, and the most instructive contrast with it. Morphologically it is a privative — *a-vidyā*, "non-knowledge" — and its grammar of absence shapes every use to which it is put: the beginningless concealment of Advaita (Śaṅkara's *adhyāsa*), the first link of the Buddhist chain of dependent origination, and, in Yoga, the "field" of the remaining afflictions — *avidyā kṣetram uttareṣām* (*Yogasūtra* 2.4). Two features set it apart from *moha*. First, its privative grammar: where *avidyā* is at root a lack that the dawning of knowledge removes, *moha* is a positive modification of the soul, conditioned by a real *mohanīya* karma, whose removal is a transformation and not the filling of a gap. Second, its cognitive confinement: *avidyā* names a defect of knowing and answers, at most, to the view-wing of *moha*, leaving the *kaṣāyas* of *cāritra-moha* unaddressed. The relation between the traditions is in fact neatly reversed. Buddhism largely identifies the two, naming the one root-defilement now as *moha* (one of the three unwholesome roots) and now as *avijjā*; the Jaina, by contrast, makes the cognitive defect (*mithyātva*) a *species* of the wider *moha*, whose genus embraces conduct as well as view. To render *moha* as *avidyā* is thus to demote it from genus to species, and from a positive force to a privation.

**2.2 *Ajñāna*.** *Ajñāna* shares the privative form and, for just that reason, is the least adequate single rendering. The decisive distinction is that between *ajñāna* as mere not-knowing and *mithyā-jñāna* as wrong-knowing; on its view-side *moha* is the latter. Jaina epistemology fixes the point: the three ordinary cognitions of an unliberated soul become, in one who holds a false world-view, the three *wrong* cognitions (*kumati*, *kuśruta*, *kuavadhi*) — termed *ajñāna* not because the *mithyādṛṣṭi* lacks cognition but because whatever he cognises is vitiated at its root by his false standpoint (*Tattvārtha-sūtra* 1.31–32). The deluded soul does not merely lack knowledge — it may possess a great deal — but cognises under a standing misattribution, taking the non-self for the self. The fault is one of direction, not of quantity; and *ajñāna*, whose whole sense is quantitative,

cannot register a mis-direction that coexists with abundant learning.

**2.3 *Māyā*.** *Māyā* carries two senses that pull in opposite directions, and *moha* sits awkwardly with each. In its Vedāntic use it is the cosmic power of illusion or appearance — identified already with primal matter, *māyāṃ tu prakṛtiṃ vidyāt* (*Śvetāśvatara Upaniṣad* 4.10), and, in the strong Advaitic reading, projecting a world that is ultimately unreal. In the Jaina lexicon, however, *māyā* is deceit — the third of the four *kaṣāyas*, a conduct-deluding passion (*Tattvārtha-sūtra* 8.10). Neither sense will serve, and for opposite reasons. The Vedāntic sense imports a metaphysics the Jaina rejects, for the Jaina world is real and *moha* distorts the soul's relation to it rather than conjuring an unreal one; the Jaina sense is far too narrow, being but one of sixteen *kaṣāyas*. The first reading makes *moha* too cosmic, the second too small. The scholarship has mapped the word's range closely — Reyna traces it from the Ṛgvedic sense of a god's creative "wile" to the Advaitic principle of appearance (Reyna), and Shastri fixes the mature term as the *anirvacanīya*, "indeterminable," power of concealment (Shastri). It is exactly this indeterminacy that disqualifies *māyā* as a name for *moha*, which is assigned a perfectly determinate status: a real *bhāva* of a real soul, conditioned by a real karma.

## 3. The English Renderings

**3.1 Ignorance.** "Ignorance" is the standard rendering of *avidyā* and *ajñāna*, and it inherits all their privative limitations along with one of its own. It fails on the same two counts — privative where *moha* is positive, merely cognitive where *moha* is two-winged. The added liability is connotative: in ordinary English "ignorance" suggests an innocent or remediable want of schooling, and so trivialises a condition the tradition holds to be the beginningless root of all bondage. To say the soul "wanders through ignorance" invites the misreading that more learning would set it free — but the learned may be the most deeply in *moha*.

**3.2 Delusion.** "Delusion" is the least inadequate of the English options, and the one this study adopts where a gloss is unavoidable. Its advantages are real: unlike "ignorance" it is not privative — a delusion is a positive false state — and it carries an affective colouring that gestures toward the conduct-wing. Yet two features keep it from being an equivalent. First, "delusion" locates the fault in a *belief*, whereas *moha* is a disposition prior to, and productive of, particular false beliefs: the deluded proposition is downstream. Second, the word's most precise modern sense is clinical — in the *Diagnostic and Statistical Manual* a delusion is a symptom, "a fixed belief that is not amenable to change in light of conflicting evidence" (American Psychiatric Association 87) — marking the disordered individual against the sane majority. But *moha* is no pathology; it is the universal condition of the unliberated soul, and the very belief the Jaina calls its root, the identification of self with body, is by the diagnostic norm the baseline of sanity. That the philosophical literature on delusion has itself abandoned the search for necessary and sufficient conditions (Bortolotti) only confirms that a contested clinical term cannot fix the outline of a soteriological concept it was never framed to hold.

**3.3 Illusion.** "Illusion" renders the Vedāntic *māyā* more than the Jaina *moha*, and its difficulties follow accordingly. Its home is the philosophy of perception — the bent stick, the rope mistaken for a snake — and the fault it names lies in the *appearance*, its correction a matter of seeing the object aright. This is precisely what *moha* is not: the fault is not in the world's appearing falsely but in the soul's mis-relating to a world that is exactly as it is. The objects of *moha* — the body, the passions, the possessions — are not illusory but entirely real, and the error lies in the soul's appropriation of them as itself. Matilal shows that the classical Indian analysis of error (*khyāti*) was debated precisely as a question about the object and its appearing, remedied by the *bādha* that shows the object as it is (Matilal); but *moha* is not a *khyāti* to be sublated by a truer cognition — it is a disposition to be dissolved by a transformation of the soul, and the body it fastens on remains, in the end, a body.

## 4. Synthesis and Conclusion: The Fourfold Conjunction and the Case

## for the Untranslated

Each candidate term seizes one facet of *moha* and lets the rest fall away. The privatives — *avidyā*, *ajñāna* and "ignorance" — capture the cognitive lack but miss its positive and conative character; *māyā* and "illusion" capture the illusory note but mislocate the fault, in an unreal world or a false appearance, where *moha* places it in the soul's relation to a real one; "delusion" comes closest, catching the positive and affective colouring, but propositionalises and, in its clinical sense, pathologises a condition that is dispositional and universal. What no single rendering can hold together is the conjunction that the Prakrit sources set down without ambiguity: that *moha* is (i) *positive*, a real *bhāva* of the soul; (ii) *karmically conditioned*, the effect of a real *mohanīya* substance of twenty-eight species; (iii) *two-winged*, reaching across cognition (*darśana-moha*) and conduct (*cāritra-moha*) at once; and (iv) *relational*, the mis-relating of a real soul to a real world. Every translation purchases intelligibility in the target language at the cost of one or more of these four; and a term that can only be had by losing what is essential to it is better not exchanged at all.

The decision to retain *moha* untranslated has, moreover, a warrant beyond the present case. Halbfass documents how rendering the tradition's key terms — *dharma* as "religion," *darśana* as "philosophy," *brahman* as "God" — has repeatedly reshaped each concept in the image of the receiving language (Halbfass); to keep *moha* is to decline, deliberately, just such a reshaping. The connotations surveyed here are thus not interchangeable labels but rival construals, each locating the fault in the object, the proposition, or the absence rather than in the positive, two-winged disposition the Prakrit sources describe. Having fixed, by this *via negativa*, what *moha* is not, one is positioned to set out, from those sources, what it is — the task to which the larger study turns.

## Works Cited


American Psychiatric Association. *Diagnostic and Statistical Manual of Mental Disorders (DSM-5)*. Arlington, VA: American Psychiatric Association, 2013.

Apte, V. S. *The Practical Sanskrit–English Dictionary*. S.vv. "moha," "muh."

*Bhagavad-gītā*. 2.63.

Bortolotti, Lisa. *Delusions and Other Irrational Beliefs*. Oxford: Oxford University Press, 2009. (And "Delusion," *Stanford Encyclopedia of Philosophy*.)

Halbfass, Wilhelm. *India and Europe: An Essay in Understanding*. Albany: State University of New York Press, 1988.

Jaini, Padmanabh S. *The Jaina Path of Purification*. Berkeley: University of California Press, 1979.

*Jainendra Siddhānta Kośa*. Edited by Jinendra Varṇī. New Delhi: Bhāratīya Jñānpiṭh. S.vv. "moha," "mohanīya."

Johnson, W. J. *Harmless Souls: Karmic Bondage and Religious Change in Early Jainism with Special Reference to Umāsvāti and Kundakunda*. Delhi: Motilal Banarsidass, 1995.

Matilal, Bimal Krishna. *Perception: An Essay on Classical Indian Theories of Knowledge*. Oxford: Clarendon Press, 1986.

Monier-Williams, Monier. *A Sanskrit–English Dictionary*. Oxford: Clarendon Press, 1899. S.vv. "moha," "muh," "avidyā," "ajñāna," "māyā."

Nemicandra Siddhānta-cakravartī. *Gommaṭasāra, Karmakāṇḍa*. Translated by J. L. Jaini. Sacred Books of the Jainas, vols. V–VI. Lucknow: Central Jaina Publishing House, 1927.

Patañjali. *Yogasūtra*, with the *Vyāsa-bhāṣya*. 2.3–2.4.

Puṣpadanta and Bhūtabalī. *Ṣaṭkhaṇḍāgama*, with the *Dhavalā* of Vīrasena. Edited by Hiralal Jain et al. 16 vols. Amaravati: Jaina Sāhityoddhāraka Fund, 1939–59.

Reyna, Ruth. *The Concept of Māyā from the Vedas to the 20th Century*. Bombay: Asia Publishing House, 1962.

Śaṅkara. *Brahmasūtra-bhāṣya* (including the *Adhyāsa-bhāṣya*).

Shastri, Prabhu Dutt. *The Doctrine of Māyā in the Philosophy of the Vedānta*. London: Luzac & Co., 1911.

*Śvetāśvatara Upaniṣad*. 4.10.

Umāsvāti. *Tattvārtha-sūtra*. Translated by Nathmal Tatia as *That Which Is*. New York: HarperCollins, 1994.

**विशेष वार्ता –**

## कृतज्ञता ज्ञापन व शोधार्थी निवास उद्घाटन समारंभाचा संक्षिप्त वृत्तांत

श्री महावीर ब्रह्मचर्याश्रम(जैन गुरुकुल), कारंजा (लाड) अंतर्गत गुरुदेव समंतभद्र सेंटर फॉर जैनिझमच्या वतीने दि. २२ व २३ ऑगस्ट २०२६ रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

दि. २२ ऑगस्ट २०२६ रोजी गुरुदेव समंतभद्र महाराज यांचे सत्शिष्य व सर्व गुरुकुल संस्थांचे आधारस्तंभ श्रद्धेय स्व. ब्र. श्री. माणिकचंद्रजी चवरे (तात्याजी) तसेच श्री बाहुबली ब्रह्मचर्याश्रमचे अधिष्ठाता श्रद्धेय स्व. ब्र. श्री. माणिकचंद्रजी भीसीकर यांच्या समर्पित जीवनकार्याच्या गौरवार्थ कृतज्ञता ज्ञापन समारंभ आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमास विविध मान्यवर, विद्वान, सामाजिक कार्यकर्ते व जैन समाजबांधव उपस्थित होते. कार्यक्रमात नित्य अभिषेक–पूजन– प्रवचन यासोबत वेगवेगळ्या तीन सत्रांमध्ये श्रद्धेय तात्याजी व भीसीकर गुरुजी यांच्या व्यक्तित्व व कर्तृत्वावर प्रकाश टाकण्यात आला. सर्वप्रथम या उभयतांचे जीवनदर्शन प्रस्तुत करणारे चित्रण व्हिडिओ फितीच्या माध्यमातून सादर करण्यात आले. तसेच डॉ. सौ. लीनाताई चवरे व सौ. भारतीताई खंडारे यांनी तात्याजी व भीसीकर गुरुजी यांचे जीवन परिचय करून दिले. यानंतर अनेक आमंत्रित वक्त्यांनी तात्याजी व भीसीकर गुरुजी यांच्या समर्पित सेवा जीवनाचे विविध जीवन पैलू सादर केले.

या वक्त्यांमध्ये – ध. सेठ श्री धर्मेंद्रजी रईस(खुरई), श्री राजेन्द्रजी गांधी (मुंबई) श्री.जीवेंद्रजी जडे, (कागल) यांचे ऑडिओ रेकॉर्डिंग, डॉ.रावसाहेब पाटील(सोलापूर), डॉ. श्री. नेमिनाथजी शास्त्री (बाहुबली–कुंभोज), डॉ. श्री. आलोकजी शास्त्री, कारंजा (लाड), श्री. भरतजी भोरे, कारंजा, सुश्री प्रज्ञा डोणगावकर, कारंजा (लाड) श्री. अमलप्रभ चवरे, कारंजा (लाड), श्री. प्रकाश सरोदे, कारंजा (लाड) श्री. प्रकाश टोपरे (पुणे), सौ. वृंदा मेहता (नासिक), सौ. वृषाली संगई (अंजनगाव–सुर्जी), श्री उद्धर चवरे या वक्त्यांनी उभयतांच्या जीवनाचे विविध पैलू भावपूर्ण शब्दांत उलगडून दाखवले.

दि. २३ ऑगस्ट २०२६ रोजी गुरुदेव समंतभद्र सेंटर फॉर जैनिझम अंतर्गत नवनिर्मित विद्वत्/शोधार्थी निवास (श्री कुंदकुंद कहान पारमार्थिक ट्रस्ट मुंबई द्वारा विशेष योगदान प्राप्त), तसेच श्रुतदीपक भवन (गहाणकरी परिवार, नागपूर द्वारा संस्थापित सन्मति जैन ट्रस्ट द्वारा विशेष योगदान प्राप्त) या ग्रंथालयाचा तसेच अन्य दालनांचा उद्घाटन समारंभ उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून श्री. सतीशजी संगई तसेच प्रमुख अतिथी व आमंत्रित मान्यवर म्हणून श्री. राजेंद्रजी गांधी (मुंबई), विदुषी पंडिता विजयाताई भीसीकर, श्री धर्मेंद्रजी रईस (खुरई), श्री. दिनेशजी गंगवाल (वेरुळ), पं. श्री. विरागजी शास्त्री, श्री. प्राजक्तजी मेहता (नाशिक), श्री. भव्यभाई महेता (मुंबई), श्री. प्रकाश नाके (चिखली), श्री. सन्मति भोरे (कारंजा), सौ. विजयाताई व श्री. स्वप्नील नांदगावकर (पुणे) आदि मान्यवर उपस्थित होते.

आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून डॉ. लीना उदय चवरे, केतन उदय चवरे व स्मिता केतन चवरे यांनी अथक परिश्रमातून साकार केलेली गुरुकुल इतिहासाची प्रेरणादायी डॉक्युमेंटरी कार्यक्रमाच्या दोन्ही दिवशी दाखवण्यात आली. त्याला प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

विविध सत्रांचे संचालन व आभार प्रदर्शन श्री. पवन उखळकर, श्री. विनम्र चवरे, श्री. प्रकाश उखळकर, श्री. चिंतामण भूस यांनी केले. हा द्विदिवसीय कार्यक्रम कृतज्ञता आणि ज्ञानोपासनेच्या वातावरणात उत्साहाने संपन्न झाला.

**बाहुबली येथे गुरुदेव समंतभद्र महाराज यांचा ३८ वा समाधीदिवस विविध कार्यक्रमाने संपन्न.**

सोमवार, दि. १७ ऑगस्ट २०२६ रोजी प. पू. गुरुदेव समंतभद्र महाराज यांचा ३८वा समाधीदिवस विविध कार्यक्रमाने उत्साहात संपन्न झाला. यावेळी सकाळी कुंभोजहून आचार्यश्री चंद्रप्रभसागरजी महाराज व क्षुल्लक १०५ वात्सल्यसागरजी महाराज यांचे आगमन झाले.

गुरुदेव समंतभद्र महाराजांच्या प्रतिमेची ऐरावत हत्तीवरून सवाद्य मिरवणूक व आकर्षक चित्ररथ यांची मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर गुरुदेव समंतभद्र महाराजांच्या समाधीस्थळी चरणाभिषेक तसेच गुरुदेवश्री समंतभद्र-पूजन व समाधिशतक ग्रंथाचे पठण करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष, प्रकाशरावजी आवाडे हेही उपस्थित होते.

यावेळी गुरूदेव समंतभद्र महाराज यांच्या ३८व्या समाधीदिवसानिमित्त विनयांजली सभेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी जिंतूरचे डॉ. संदीप आंबेकर हे उपस्थित होते.

सुरुवातीस मान्यवरांच्या शुभहस्ते प्रतिमापूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. विद्यार्थिनींनी मंगलाचरण, स्वागतगीत व गौरवगीत सादर केले. स्वागत, प्रास्ताविक व अतिथी परिचय पर्यवेक्षक डॉ. नेमिनाथ बाळीकाई यांनी केले.

विद्यार्थी मनोगतामध्ये बालवर्गाची परिणीता मगदूम, माध्यमिक विभागामधून पर्वराज पाटील व संस्कार कोथळे यांनी आपले मनोगत सादर केले.

उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते डॉ. नेमिनाथ बाळीकाई लिखित भद्रायण, गुरुकुल पूजापाठ व भद्रपुष्पांजली या पुस्तकांचे विमोचन संपन्न झाले.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी जिंतूरचे संदीप आंबेकर यांनी सन्मती मासिकातील कथांचा चिकित्सक अभ्यास (१९५० ते २०००) या विषयावर पीएच. डी. प्राप्त केल्याबद्दल आपल्या मनोगतामध्ये जैन रामायणाचा अभ्यास करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्रातील विविध तीर्थक्षेत्रांना भेटी देत असताना डॉ. संदीप आंबेकर यांचा बाहुबली येथील समृद्ध ग्रंथालयाशी परिचय झाला. ग्रंथालयातील विपुल ग्रंथसंपदा तसेच 'सन्मती' मासिकाचे जुने अंक पाहिल्यानंतर त्यांच्या संशोधनाला नवी दिशा मिळाली. प्राथमिक शिक्षक म्हणून शैक्षणिक जबाबदारी, कौटुंबिक कर्तव्ये आणि संशोधनाचा अभ्यास यांचा समतोल साधत त्यांनी अथक परिश्रमाने पीएच.डी. पूर्ण केली.

संस्था प्रतिनिधी मनोगतामध्ये महामंत्री दादासाहेब पाटील यांनी परमपूज्य गुरुदेव समंतभद्र महाराजांनी समाजाला शिक्षण, संस्कार, चारित्र्य, व्यसनमुक्ती आणि समाजसेवेची दिशा दिली. त्यांच्या विचारांचा स्वीकार करून संस्कारित व व्यसनमुक्त पिढी घडविणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल, असे प्रतिपादन केले.

आचार्यश्री चंद्रप्रभसागरजी महाराज यांनी आपल्या आशीर्वादामध्ये परमपूज्य गुरुदेव समंतभद्र महाराजांनी समाजाला शिक्षण, संस्कार, चारित्र्य व सेवाभावाची दिशा दिली. विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता जीवनाचे शिक्षण व संस्कार देणे ही शिक्षकांची जबाबदारी असल्याचे सांगण्यात आले. तसेच डॉ. संदीप आंबेकर यांच्या पीएच.डी.च्या ज्ञानसाधनेचा आदर्श घेत संस्थेच्या शाखांमधून संशोधक व विचारवंत निर्माण व्हावेत, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. 'सुस्वभावाची बेरीज, मत्सर-स्वार्थाची वजाबाकी, प्रेमाचा गुणाकार आणि सुविचारांचा वर्ग' हे जीवनाचे सुंदर गणित विद्यार्थ्यांनी आत्मसात करावे, असे मंगल आशीर्वचन दिले.

यानंतर बाहुबली सेवकांची पतसंस्था यांच्यामार्फत सर्व शाखेतील इ.१० वी, १२ वी मधून प्रथम, तसेच बाहुबली शाळेतर्फे एन.एम.एम.एस., ५वी, ७वी व ८वी शिष्यवृत्ती, फाली विद्यार्थी

पुरस्कार व १२ वी सीईटी परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास संस्थेचे पदाधिकारी, शाखांच्या शालेय समितीचे चेअरमन, सदस्य, सर्व शाखांचे मुख्याध्यापक, अध्यापक, अध्यापिका, माजी स्नातक, श्रावक-श्राविका, गुरुकुल विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**बाहुबली येथे महामस्तकाभिषेक सोहळ्याच्या नियोजनासाठी मार्गदर्शन बैठक संपन्न**

गुरुवार, दि. २० ऑगस्ट रोजी आचार्यश्री १०८ चंद्रप्रभसागरजी महाराज व भट्टारक जिनसेन महास्वामी यांचे भक्तिमय वातावरणात भव्य स्वागत करण्यात आले. शालेय विद्यार्थ्यांनी पारंपरिक लेझीम पथकाच्या आकर्षक सादरीकरणातून त्यांचे उत्साहात स्वागत केले.

यानंतर शांतीसागर प्रवचन हॉल येथे श्री १००८ भगवान बाहुबली महामूर्तीच्या महामस्तकाभिषेक सोहळ्याच्या (दि. ८ ते १३ जानेवारी २०२७) नियोजनासाठी मार्गदर्शन बैठक झाली. कार्यक्रमास विद्यापीठाचे अध्यक्ष प्रकाशरावजी आवाडे व महामंत्री डी. सी. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात मंगलाचरण, प्रतिमापूजन व दीपप्रज्वलनाने झाली. संचालक गोमटेश बेडगे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. महामस्तकाभिषेक सोहळा शिस्तबद्ध, भक्तिमय व भव्य स्वरूपात संपन्न करण्यासाठी संस्थेतील सर्व पदाधिकारी, शिक्षक व कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. नांदणी मठ व बाहुबली यांचे ऐतिहासिक, धार्मिक व आध्यात्मिकदृष्ट्या अतूट नाते असून, या परंपरेला पुढे नेण्यासाठी सर्वांनी एकजुटीने योगदान द्यावे, असेही त्यांनी सांगितले.

यानंतर समस्त त्यागीगणांचे पादपूजन संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. अध्यक्ष प्रकाशरावजी आवाडे यांनी धार्मिक विधींसोबत शिक्षण, आरोग्य व समाजसेवेला प्राधान्य देण्याचे आवाहन केले. युवकांमध्ये संस्कार, राष्ट्रभक्ती व सेवाभाव रुजवून त्यांना स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन उपलब्ध करून देण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

नांदणी मठाचे स्वस्तिश्री जिनसेन भट्टारक महास्वामी यांनी आशीर्वचनातून धार्मिक सोहळ्यासोबत समाजहिताच्या उपक्रमांचे नियोजन करण्याचे आवाहन केले. विविध राज्यांतून येणाऱ्या मान्यवरांच्या व्यवस्थेसाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

आचार्यश्री १०८ चंद्रप्रभसागरजी महाराज यांनी समाजातील प्रत्येक घटकाने सेवाभावाने सहभागी होऊन अधिकाधिक लोकांना या पवित्र कार्याशी जोडावे, असे आवाहन केले. श्रद्धा, समर्पण व एकजुटीने कार्य केल्यास महामस्तकाभिषेक सोहळा भव्य, दिव्य व यशस्वी होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी ब्रह्मचर्याश्रमचे कमिटी सदस्य, विद्यापीठाचे पदाधिकारी व विश्वस्त, महाराष्ट्र व कर्नाटकातील विविध शाखांचे अध्यापक, अध्यापिका, शिक्षकेतर कर्मचारी, गुरुकुल विद्यार्थी, माजी विद्यार्थी तसेच परिसरातील श्रावक-श्राविका मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन स्मिता निटवे व प्रदीप धोतरे यांनी केले. मेरी भावनेने या कार्यक्रमाची सांगता झाली.

– श्री. सुदर्शन चौगुले, बाहुबली

*** आत्मसाधनेची अपूर्व सुसंधी ***

**भाद्रपद शुद्ध पंचमी बुधवार दि. १६ सप्टेंबर २०२६ पासून दशलक्षण महापर्व सुरु होत आहे. तरी सर्वांनी आपली शक्ती न लपवता अंतर्बाह्य शुचितेसाठी अहोरात्र प्रयत्नशील रहावे. हा पर्वाधिराज दशलक्षण महापर्व सर्वांच्या मनातील कलुषता दूर करो, ही सद्भावना..!!!**

**क्षमावाणी पर्वानिमित्त ''आम्ही सर्वांना क्षमा करतो, सर्वजण आम्हास क्षमा करोत.''**

# श्री १००८ भगवान बाहुबली महामूर्ती महामस्तकाभिषेक २०२७..... क्षणचित्रे..



कुशल नेतृत्व –
आचार्य १०८ श्री चंद्रप्रभसागरजी महाराज
मंगल निर्देशन–
स्वस्तिश्री जिनसेन भट्टारकजी, नांदणी मठ

## नियोजनाची पहिली बैठक
(गुरुवार, दि. २० ऑगस्ट २०२६)



नियोजनाच्या बैठकीचे दीपप्रज्वलन
करताना उपस्थित मान्यवर



बैठकीचे प्रास्ताविक करताना
अध्यक्ष मा. श्री. प्रकाशरावजी आवाडे





श्री बाहुबली ब्रह्मचर्यश्रम व विद्यापीठच्या वतीने जगद्गुरु परम पूज्य जिनसेन भट्टारक पट्टाचार्य महास्वामीजी यांना भगवान बाहुबली महामूर्ती महामस्तकाभिषेक २०२७ या महोत्सवास त्यांचे मंगल निर्देशन मिळावे यासाठी मा. प्रकाश अण्णा आवाडे यांच्या नेतृत्वाखाली विश्वस्त, कार्यकारिणीचे सदस्य व सर्व शाखांचे मुख्याध्यापक नांदणी मठात गेले असता..(दि. ०८ ऑगस्ट २०२६)





श्री बाहुबली ब्रह्मचर्यश्रम व विद्यापीठच्या वतीने जगद्गुरु परम पूज्य लक्ष्मीसेन भट्टारक पट्टाचार्य महास्वामीजी यांना भगवान बाहुबली महामूर्ती महामस्तकाभिषेक २०२७ या महोत्सवास त्यांचे मंगल निर्देशन मिळावे यासाठी संस्थेचे सर्व विश्वस्त, कार्यकारिणीचे सदस्य व सर्व शाखांचे मुख्याध्यापक कोल्हापूर मठात गेले असता..(दि. ११ ऑगस्ट २०२६)



महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यांक आयोगाचे उपाध्यक्ष मा. श्री. चेतनजी देडिया यांनी रविवार, दिनांक ९ ऑगस्ट २०२६ रोजी बाहुबली अतिशय क्षेत्रास सदिच्छा भेट दिली. त्यावेळी त्यांचे श्री. बाबासाहेब पाटील, श्री. डी. सी. पाटील, श्री. अशोक पाटील, श्री. गोमटेश बेडगे यांचे मार्फत स्वागत करण्यात आले.

RNI No. MAH/MAR/2006/21290/27-9-07 Reg. No. KLR-022/2024-2026 Posted at Bahubali on- 10-09-2026

# प. पू. गुरुदेवश्री समंतभद्र महाराज यांचा ३८वा समाधिदिवस..... क्षणचित्रे..

(विशेष वार्ता पृष्ठ क्र. ४५वर)



प. पू. आचार्य १०८ श्री चंद्रप्रभसागरजी महाराज यांच्या सान्निध्यात गुरुदेवश्रींच्या समाधीप्रसंगी विविध पुस्तकांचे प्रकाशन करताना उपस्थित मंचासीन मान्यवर...



सन्मती मासिकावरील पहिली पीएच.डी. पूर्ण करणारे डॉ. संदीप आंबेकर यांचा सपरिवार सन्मान करताना संस्थेचे विश्वस्त मान्यवर


Merchant Name : BAHUBALI BRAHMACHARAY ASH
UPI ID : schoolbahubali@sbi
BHIM UPI

## नवीन प्रकाशन





**गुरुकुल पूजापाठ**

अभिषेक पाठ, अनेक पूजन, भक्ती, आरती, सामायिक पाठ इत्यादींचा संग्रह आहे.




**भद्रायण**

यामध्ये प. पू. गुरुदेवश्री समंतभद्र महाराज यांचे जीवनकार्य व व्यक्तिमत्त्व याची संक्षिप्त माहिती आहे.




**भद्र-पुष्पांजली**

यामध्ये गुरुदेवश्री समंतभद्र महाराज यांचे पूजन व समाधिशतक व इष्टोपदेश अर्थासह दिले आहे.

विविध पारिवारिक समारंभा-निमित्त बाहुबली गुरुकुलातील विद्यार्थ्यांना सद्दानराशी, पुरस्कार राशी, धर्मिक गतिविधीस प्रोत्साहन देण्यासाठी अथवा बाहुबली संस्थेस देणगी देण्यासाठी किंवा सन्मती मासिकाची वाढीव वर्गणी पाठवून देण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा आणि ट्रांझक्शन आयडी पाठवून द्यावे. जेणेकरून पावती करता येईल. आपल्या देणगीस आयकर सवलत मिळते. आपल्या सर्वांचे सहकार्य मिळावे, हीच सद्भावना...!!

प्रेषक, www.sanmatimasik.com
सन्मति प्रकाशन
पो. बाहुबली,
जि. कोल्हापूर-४१६ ११०
फोन : ९० ४९ ४७ ३४ ३४
E-mail : sanmatimasik@gmail.com

प्रति,

RNI No. MAH/MAR/2006/21290/27-9-07 Reg. No. KLR-022/2024-2026 Posted at Bahubali on- 31-07-2026
प्रकाशक : श्री. गोमटेश बेडगे, मालक : श्री बाहुबली ब्रह्मचर्याश्रम, बाहुबली
मुद्रण स्थळ : शिव इम्प्रेशन्स्, कोल्हापूर. प्रकाशन स्थळ : बाहुबली